॥ [illegible] ॥ [illegible] ॥

॥ श्री सद्गुरु जयराम स्वामी महाराजकी जय ॥ गुरुदेव न्यायरत्न विनोद महाराजकी जय ॥

———X———X———

॥ आरती ॥ कवी - संयोजन

॥ असती कितीक शाहीर शिरोमणी कोणी तसें आशीर्वाद ॥
॥ झाले किंवा होतील परी होणार नाहीं दीक्षित ॥
कै. क्रांतीशाहीर र.ग. दीक्षित चिंचणीकर यांची परंपरा जिवंत ठेवण्याचे दृष्टीनें त्यांच्या स्मारकाचे कार्य व्हावे. श्री. पा. पाटील

देवास (सिनियर) संस्थान येथील राजशाहीर कै. गणेश [illegible] दीक्षित यांच्या पोवाडे, लावण्या, संवाद व कवने यांचा संग्रह. र.ग. दीक्षित.

नमो वक्रतुंडा शंकर तनया, गौरीच्या नंदना ॥ धृ० ॥
चौदा विद्यांचा तूं अधीपती, चौसष्ट कला तेज फांकती,
छत्तीस रागिण्या तव गुण गाती, दैत्यांच्या कंदना ॥ १ ॥
सप्तसुरांते मिळवून गाती, व्यासादिक तव गुण वर्णीती,
अमरवंदना मंगलमूर्ती, करितो मी वंदना ॥ २ ॥
सिध्दीविनायक तूं परमेशा, शरण तुला कवी रघुवीर ईशा,
आशिर्वच द्या सिध्दगणेशा, प्रार्थितसे तुज पुन्हां पुन्हां ॥ ३ ॥
कवी: क्रांतीशाहीर रघुवीर दीक्षित चिंचणीकर

कै. क्रांतीशाहीर, देवास दरबार व सोंडूर राजशाहीर यांचे पोवाडे व गीते
कै. गणेश [illegible] दीक्षित चिंचणीकर

जन्म :- १८ जून १९०२

मृत्यू :- २५ जुलै १९४९

| अ.क्रमांक | पान | कवनांचे नांव |
|---|---|---|
| १) | १) | अनुक्रमणीका |
| २) | २) | उदाहरणांदाखल चरणं |
| ३) | ५) | घोरपडा तो घोरपडा (शृं. लावणी) |
| ४) | ७) | श्रीमंत युवराज संस्थान संडूर शाहीरी आदेश (काव्य) |
| ५) | ९) | श्रीमंत सरदार शितोळे ग्वाल्हेर (पोवाडा) |
| ६) | १८) | कु. जयश्री गणेश दीक्षित इचा (पाळणा) |
| ७) | १९) | कंट्रोलचे दुकान (लावणी) |
| ८) | २२) | पब्लिक इलेक्शन (लावणी) |
| ९) | २७) | शाहिस्तेखानावरील मोहीम (पोवाडा) |
| १०) | ३२) | वीररत्न नेताजी पालकर (पोवाडा) |
| ११) | ३६) | संयोगिता स्वयंवर (पोवाडा) |
| १२) | ४१) | सरदार मल्हारराव होळकर (पोवाडा) इंदोर |
| १३) | ४६) | उपदेशपर फटका (लावणी) संत तुकाराम व शाहीर दीक्षित |
| १४) | ४७) | हिंद तरुणांस संदेश (पद) आली सुबक आली |
| १५) | ४८) | कॅप्टन भाऊसाहेब महाराज पवार (पोवाडा) देवास ज्युनियर. |
| १६) | ७७) | पाळणा (होळकर इंदोर यांचे पैकी) (पाळणा) |
| १७) | ७९) | श्रीमंत युवराज मुरारराव घोरपडे राज्य संडूर (आशीर्वाद) |

| चाल | क्रमांक | [illegible] |
|---|---|---|
| | | (यावहीत असलेल्या चालींचेच क्रमांयांत दिले आहेत.) |
| क्रं. ७ भेदीक — | भे.१ ) | पाचि(मेरा) किल्याच्या ठेविले वीर मोरोपंत पिंगळ्याला, साद्यकृष्णाजी ॥ |
| क्रं. ७ भेदीक — | ३ अ) | प्रियपुत्राचे प्रेत पाहुनी औकानल भडकला, खंडोजी जळून खाक जाहला ॥ |
| चा. क्रं. १ | १ ) | ते वीर जातीवंत खचित, मृत्यूनें होत, अमर जगतांत, देशासाठींच |
| | | प्राण देणार, राष्ट्रासाठींच फांस घेणार, मातृभूमीला शिरें वहाणार ॥ |
| चा. क्रं. ५ ) | ५ ) | आहीरसे खानाची केली फार फुळधाण, जरी आला होता एक लक्ष |
| | | फौज घेऊन, बोटे तोडून खानाला केला फार हैराण, हैराण फार होऊन |
| | | पुणें सोडून, गेला जलदीनं ॥ |
| चाल क्रं. | २ ) | उपदेश रामदासांचा, कथियला त्यांनी दरबारीं ॥ |
| चाल क्रं. | ३ ) | तोरणा घेऊन घातला पाया स्वराज्याचा ॥ |
| चा. क्रं. लगट ) | ४ ) | जिजाऊनं झेंडा पाहीला, रंग हिरवा त्याचा बळखीला काय बोलली |
| | | आपल्या मनाला, ~~~~ तर उद्यें यावं हात धुण्याला प्रतापगडाला ॥ |
| चाल क्रं. १२ गिलच्याची ) | १२) | रामचंद्र म्हणे शरण मी माते आईसारखी तूं मला ॥ |
| चाल क्रं. कराव — | ५/१ ) | नारसिंहापरी आला उग्र भगतासिंग, त्यानें फुंकलं रणशिंग, कृपा करो |
| | | एकलिंग, धरविला मार्ग क्रांतीचा, क्रांतीचा हो, बाटला वीरवृत्तीचा ॥ |
| चा. क्रं. पाळण्याची ) | १५ ) | हालविते जिजाऊ माय, तुला शिवराय धरुनिया हारी, जोजरे नीज यवनारी ॥ |
| चा. क्रं. पाळण्याची ) | १७ ) | देणं एक गड थांबावं, मी पंचारती आणीन ॥(चाल) बोलली अशी |
| | | ती अबला, डोळ्यांतून अश्रू गळला (चाल) ओवाळूनी मगनायाला ~~ त्यावेळां ॥ |
| चाल क्रं. ८ दांगटी ) | ८. दांगटी) | एके दिवशीं आंबे घेऊन, चालला वेगानं, आंबं द्या आंब |
| | | आवाज दिधला, वेषवस्त्रा घेतला एकावाळा, बहिर्जीनाईक |
| | | रंग घेतला ~~~~~~~~~~ परीनाहीं खान त्याला दिसला, गा ॥ |
| चा. क्रं. | १३ ) | हे लग्न नव्हे विघ्न राया आलं माझं मरण, |
| | | ये राया ये धांवून ॥ |
| चा. क्रं. फ[illegible] | १४ ) | [illegible] रायेच[illegible] [illegible] लोकां राया, लागला तिचंच्यापल्यां ॥ |
| चा. क्रं. कराव | ५/५ ) | [illegible] तुझा राज, राखलं ईमान, आम्हीं ईस्लाम |
| | | धर्माचे प्राण [illegible], करा यांचे ताबूत पेंढ्यावा ईसलाम ॥ |

| चाल | क्र. | |
|---|---|---|
| | | ॥ उ[illegible] ॥ |
| चाल | १७) | क्षण एक गडे थांबावें । मी पंचारती आणीन ॥ |
| | | अंतरा:- बोलली असी ती अबला, डोळ्यांतुन अश्रू गळला । |
| | | ओवाळुनीं मग नाथाला । झाली धन्य त्या वेळां ॥ |
| चाल | २४) | धांव प्रभो श्री लक्ष्मीपती या देवाच्यापासून । |
| | | करी मम अब्रू संरक्षण ॥ |
| चाल भेदीक - | ७/३) | काळी कांबळी खांद्यावरती कपाळीं तें गंध, रायाच्या, कपाळीं |
| | | तें गंध । डोई मुंडास पगडबंद ॥ |
| चाल पद | ३४) | आली सुवेळ आली, उठ! हिंदवीर वीर्यशाली ॥ रे ॥ ध्रु० ॥ |
| | | अंतरा) दुर्दैवी हिंद-माता, तुज नित्य हाक देतां, परदास्य बेडी पडता, |
| | | तुजवीण कोण वाली ॥ रे ॥ आली सुवेळ आली ॥ १ ॥ |

॥ सद्गुरु जयराम स्वामी महाराज की जय ॥

सोंडूर संस्थानाधिपती हिंमत बहाद्दर श्रीमंत यशवंतराव महाराज घोरपडे यांचे वाढदिवसानिमित्त तयार केलेले. कार्तीक वद्य पंचमी शके १८५४. मु: सांगली.

## ॥ घोरपडा तो घोरपडा ॥

(कवी - देवासदरबार व सोंडूर राज्यशाहीर ग. द. दीक्षित चिंचणीकर)

॥ १ ॥

(चा. क्र. ७ भेदीक - १)

झाले ही बहू होतील हीबहू परी अरीला ज्याचा घोर बडा ।
असा भोसले वंशी जाहला घोरपडा तो घोरपडा ॥१॥
प्रथम केला उपयोग घोरपडीचा कर्णसिंहानं चढून काडा ।
खेळणा किल्ला सर केला हिंमतीनं म्हणून जाहला घोरपडा ॥२॥
छत्रपती शिवबास खरा ज्यासाठीं मदत देण्या म्हाळोजी खडा ।
संभाजीस देई लष्करी शिक्षण घोरपडा तो घोरपडा ॥३॥
दुराचरणीं राजास उपदेशीं भैरजी तो निस्पृह बडा ।
स्वराज्य रक्षणा लढून प्राण देई घोरपडा तो घोरपडा ॥४॥
पडत्याकाळीं महाराष्ट्रा सांवरून ज्यानं वाजविला चौघडा ।
सरसेनापती संताजी ही घोरपडा तो घोरपडा ॥५॥
नांव ऐकतां ज्याचे, पाणीसुद्धां पिईना मोंगलांचा घोडा ।
कापले कळस दिल्लीपतीच्या तंबूचे घोरपडा तो घोरपडा ॥६॥
निजस्वामीला घेऊन पाठीवर पळवी बहिरजी वीर निधडा ।
सोसले छळ परी पोचवी जिंजीला घोरपडा तो घोरपडा ॥७॥
आया संताजी और बहिर्जी, ऐकतां शत्रू ते धडाधडा ।
धरणीस पडती अन प्राण सोडती घोरपडा तो घोरपडा ॥८॥
टिपू, इंग्रजा ज्याचा दरारा असा मुरारराव शूर बडा ।
चीफ ऑफ गुत्ती म्हणती ज्यां घोरपडा तो घोरपडा ॥९॥
लंगोटे मावळे धरुनी हातीं रणांत गर्जे कडाकडा ।
दानशूर, निस्वार्थी खरोखर घोरपडा तो घोरपडा ॥१०॥

भेदीक क्र. १

निधड्या छाती उघड्या टाकुनी लोळवी शत्रुला गडागडा ।
अस्सल रक्ताचा वंश एकच हा घोरपडा तो घोरपडा ॥११॥
वंशपरंपरा स्वामी निष्ठेचा घालून देई इतरांस पडा ।
राज्य दान करी असा दानशूर घोरपडा तो घोरपडा ॥१२॥
भोजासम शूर, कर्णापरी उदार फडके कीर्तीचा भगवा झेंडा ।
अखिल भारती गाजत कीर्ती घोरपडा तो घोरपडा ॥१३॥
त्याच वंशामधीं संडुराधिपती येई जन्मा हा वीर तगडा ।
हिम्मत बहाद्दर यशवंतराव ते घोरपडा तो घोरपडा ॥१४॥
नररत्नांची खाणच घराण्यांत सांगे इतिहास घडाघडा ।
साक्ष देई युवराज मुरारराव घोरपडा तो घोरपडा ॥१५॥
लहान वयांतच मारी व्याघ्रासी बंदूक उडवी धडाधडा ।
भोसले, घोरपडे एकाच रक्ताचे घोरपडा तो घोरपडा ॥१६॥
व्हावे दीर्घायू, शाहीर प्रार्थितो, प्रभूचरणीं विश्वास बडा ।
जन्म दिनी तव करितो मुजरा धन्य वंश तो घोरपडा ॥१७॥
संडूर राज्याचा हा शाहीर दीक्षित नित्य गाईल तंव पोवाडा ।
थाप डफावर मारुनी जागवील घोरपडा तो घोरपडा ॥१८॥
आले ही बहु होतील ही बहू परी भरील ज्याचा घोर बडा ।
असा भोसले वंशी जाहला घोरपडा तो घोरपडा ॥ १९ ॥

—x—x—x—

पुनर्लेखन दि. १।११।८३. मु. १२।१२।८१ जयगार्दी भवन सदाशिव पुणे ३०

क्रांती शाहीर र. द. दीक्षित चिंचणीकर

दि. ६।१२।१९४२ ॥ शाहिरी आदेश ॥ मु. स्टेट गेस्ट हाऊस सोंडूर

श्रीमंत युवराज मुरारराव घोरपडे संस्थान सोंडूर यांचे १२व्या वाढदिवसा-निमित्त. (कवी:- सोंडूर राज्य व देवास दरबार शाहीर- जी. डी. दीक्षित.)

## शाहिरी आदेश
॥ १ ॥

चा.क्र. ७ वैदीक-शुभ्रो

श्रीमन्मंगला, शारदा वरा, अर्पिता तुज काजा । शतायू करीबा, युवराजा ॥ध्रु०॥

जन्म ज्याचा, शितोळे घोरपडे या पवित्र कुळापनीं, विलसे जो सोंडूर राजांगणीं ॥

रत्न उरसळते, क्षात्रबीज जो, दावित रे बालपणीं, नाम ज्या मुरारराव तेजनीं ॥

चाल अंतरा

॥ जी धरी पाळण्याची दोरी आपुल्या हातीं ॥

॥ तीच करिते राष्ट्रउध्दार वचन निश्चितीं ॥

॥ सध्दर्मा आचरुनी शिक्षण देई संप्रतीं ॥

अशी सु-शीला, सुशिलादेवी, माता ज्या लाभली ।
आम्हांवरी तिचीच कृपासाऊली ॥१॥

इंदूकला जशी, स्वकीय किरणें, प्रीतीसुधा वर्षवी ।
तसें तव तेज आम्हां हर्षवी ॥

चंद्रप्रभेपरी, वाढो दिसादिस, तेज तुझें परोपरी ।
भाव हा दृढसा मम अंतरीं ॥

सद्गुण मंडीत, सौभाग्य अखंडित, आऊसाहेब खरोखरी ।
आशिर्वादार्थ आल्या सत्वरीं ॥

चाल अंतरा

करी वंश प्रकाशीत तूं रत्नदीपापरीं ।
मिळवुनी ज्ञान जा तरुनी भवसागरीं
कार्तीक स्वामींचे कृपाछत्र तुजवरीं

राहो, सततची, लाभो कीर्ती-, तुला हीच प्रभुपदीं ।
आस ही आमुच्या सकळां हृदीं ॥२॥

मंडपशोभा, अपूर्व, भासे, जैसा पुष्पासनीं ।
गीत मंगल वाद्यांचा ध्वनी ॥

राज्याधार हे, थोर मानकरी, जमुनी तव अंगणीं ।
जाहले गुंग गुण गायनीं ॥

देवो दीर्घायू, देवी कालिका, माता यशदायिनी ।
पराक्रम वाढो तव निशिदिनीं ॥

॥ आशीर्वादी आदेश ॥

चा.क्र. ७
तालीक - ३ अ.
अंतरा:

॥ हे बालवीराचे पथक तुला बाहोनीं ॥
॥ इच्छितातो मंगल पहा आज शुभदिनीं ॥
॥ दे सौख्य तयांना प्रेमभाव दाऊनीं ॥
जेवीं लतिका, वृक्षाधारें, सुपुष्प देई जनीं, भूषवीं तुवां तया सद्गुणीं ॥३॥
पळें पळें त्यां, स्मरण ठेऊनी, भगवंताचे मनीं ।
मिळवावी ज्ञानसंपदा ऋणीं ॥
नवं नवं नित शोध लागतीं, चालले बघ जग पुढें
असो दे लक्ष तुझें त्यांकडे ॥
विज्ञानेमधें, श्रेष्ठ पिता, तव यशवंतराव बहुगुणीं ।
तयांचा आदर्श ठेवी मनीं ॥

(चाल अंतरा)

॥ बुध्दीचा विकास विद्या हीच एक करी ॥
॥ नवचैतन्यातें, बा! युवराजा वरी ॥
॥ जग नंदनवन मग भासेल तुज अंतरीं ॥
शरीर दीक्षित, तंव हा आश्रित आदेश देतसे ।
सुमंगल गीत तुझे गातसे ॥४॥

(मिती कार्तिक वद्य द्वादशी (गुरुद्वादशी.) शके १९०५)

॥ दि. 2 । 11 । 1983 ॥ श. द. दीक्षित ॥

॥ श्री सद्गुरु जयरामस्वामी महाराज की जय ॥

श्रीमंत सरदार कृष्णराव मालोजीराव शितोळे राजराजेंद्र
राजा देशमुख रुस्तुम जंगबहादूर साहेब नौबत पंच हजारी
ग्वाल्हेर व श्रीमंत स्नेहलतादेवी देशमुख यांचे विवाहप्रसंगी
(दि. ५।५।१९४३) रचलेला पोवाडा ॥ (मु. संस्थान सोंडूर छत्र.)

कवी- सोंडूरराज्यशाहीर व देवास दरबारशाहीर ग. द. दीक्षित चिंचणीकर

॥ भाग १ ला ॥

चा. क्र. १) तो धन्य धन्य कृष्णराव, मालोजीसुत पहावं, शितोळे जाणावं,
ज्यांसी घाली स्नेहलता माळ, रामराव देशमुखांचीकन्या तेजाळ,
करो दीर्घायु त्यां प्रभू गोपाळ ॥ ध्रु० ॥

चा. क्र. ५) शिवरायासंगें झळकलीं जी क्षात्र घराणीं, त्यामध्यें शितोळेवीरही
होते अग्रणी, मालोजी नांवाचा होता त्यांत नरमणी, तोंच या
शितोळे घराण्याचा, मूळपुरुष त्यांचा, ठेवा तुम्हीं ध्यानीं ॥
भोसले, घोरपडे असती नांवांचे दोन, परि एकच रक्त दोघांचे मी
करीतो कथन, पूर्वीच्या इतिहासाची साक्ष देऊन, या घोरपडे
आणि शितोळ्यांचा, संबंध त्यांचा, पूर्वीपासून ॥

चा. क्र. १) आजचाही देतो दाखला, पहा यावेळां, शाहीर तुम्हांला, महाराणी
जी सोंडूराची, पत्नी घोरपडे यशवंतरावांची, कन्या ती पहा
शितोळ्यांची ॥
मांडीले आदर्श लग्न, बंधूचें जाण, फेडण्या ऋण, भगिनी प्रेमाचे
सोडून अभिमान, खर्च वा हुंडा आणि मानपान, रुसण्याफुगण्याला
नव्हतं तिथं ठाण ॥

चा. क्र. २) त्या शूर शितोळे घराण्यांत । पुढें झाला वीर शिदोजी ॥
ज्याच्या पराक्रमावर खूष । ग्वाल्हेरचे शिंदे महादजी ॥
छत्रपतींची घेऊनी आज्ञा । मुलूखगिरी करण्या जो राजी ॥
जो आधार मराठी राज्याचा । एकाकाळचा वीर रणगाजी ॥

चा. क्र. ३) करी स्वारी उत्तर हिंदुस्तानीं महादजी शिंदा ॥
साहास घेई शिदोजीला पाहून वीर खंदा ॥
समरांत महादजीच्या लाऊन खांद्याला खांदा ॥
मारिल्या लढायान शत्रू केला परागंदा ॥ :—

चा.क्र. १) त्याचा पुत्र लाडोजी जाण, पराक्रमी महान, म्हणून शिंद्यांनं मानिले
त्यांस आपुला हात। आपुली कन्या बाळाबाई ख्यात, देऊनी
केलं त्यांस जामात ॥

चा.क्र. ३) शिंद्यानीं स्थापली दिल्लीस पुन्हां बादशाही ॥
शहा आलम बादशहा बसविला तख्तावर पाही ॥
नामधारी शहा सारीं सूत्रं महादजी घेई ॥
कारभार बादशाहीचा योग्य चालतो कोनाहीं ॥
पहाण्यास नेमिले लाडोजीस त्या ठायीं ॥

चा.क्र. ४ लगट) करीन तो पूर्ण असतांना, स्वतः तख्तावर बसायचं जाणा, नाहीं सुचलं
वीराला दुर्दैव भारतीय जाणा ॥

चा.क्र. १२ तिलक्याची) पार पाडली कामगिरी योग्य तऱ्हेनं लाडोजीरावानं ॥
म्हणून शिंद्यानीं बादशहापाशीं आपलं वजन खर्चून ॥
देवविली जहागिरी लाडोजीचे शौर्य धैर्य जाणून ॥
पानपत प्रांतीं एकशेंवीस गांवचा मुलुख दिला तोडून ॥

चा.क्र. ४ लगट) पर पुढं प्रकार काय झाला, दौलतराव शिंद्यांच्या वेळा, बायजाबाई
पत्नी शिंद्यांची राजकारणीं बोला ॥ इंग्रजी कावा जाणून, आपल्या
पतीस दिलं चेतवून, लढविले इंग्रजा विरुध्द चातुर्यानं ॥

चा.क्र. १) अठराशें अठरा सालाची, वेळ ती साची, आणीबाणीची, हिंदुस्तानच्या
दुर्दैवाचीही खास, पारतंत्र्याचा पडला गळफांस, कारण
काय! ऐका पुढील चौकांस ॥ १ ॥

× —— × —— ×

॥ भाग २ रा ॥

चा.क्र. ६ कराव-१) क्षात्रतेज गेले नव्हतें पुरतें तें विलयास, परी गंज चढला त्यास।
जो तो मानी स्वतःस, स्वतंत्र राजा समयास। इंग्रजानीं कावा साधून,
साधून हा। बोट मयाचं तोंडास लावून ॥

चा.क्र. १) जहागिरीचा तुकडा फेकून, तोंडावर जाण, कांहीं संस्थानं ठेवली नामधारी
जरब देऊन, आधार त्यांचे सर्व तोडून, गुलामी त्यांच्या गळीं बांधून ॥:-

॥ सरकार शितोळे ग्वाल्हेर ॥

चा.क्र. २ ) म्हणून चिडून बायजाबाई । इंग्रजां विरुद्ध नवऱ्याला ॥
लढविते संधी साधून । कोणीही नच ये साह्याला ॥
स्वातंत्र्य पुन्हां वरण्याचे । उपयोग नाहीं पहा आला ॥
गगनांत भरारी मारणाऱ्या । त्या थोर गरुड पक्षाला ॥

चा.क्र. ३ ) परदास्य झाले नाहीं सहज म्हणून वैतागून ॥
केले गमन दोघांनीही राज्यभार सोडून ॥
राज्यांत घातला धुमाकूळ तेव्हां पेंढाऱ्यानं ॥
देवळांतला पुजारी जातां गडबड करावी उंदरानं

चा.क्र. १ ) त्यावेळीं शितोळे बाळाबाई, मुत्सद्दी पाही, तशीच लढवय्यी, सारीं राज्यसूत्रें घेऊन हातांत, केला तिनं पेंढाऱ्यांचा निःपात, राखिले राज्य बंदोबस्तात ॥

चा.क्र. ४ लगट ) माधवजीचे पोटीं आल्याचे, शितोळ्यांची पत्नी झाल्याचे, केले सार्थक बाळाबाईनं साचे, म्हणूनीच दिसते हे राज्य आज शिंद्यांचे ॥
शिंद्यांचा आणि शितोळ्यांचा, प्रेमसंबंध कायम राहीला आजही त्यांचा ॥

चा.क्र. ३ ) झाला रोष इंग्रजांचा बाळाबाईवरी जाणा ॥
म्हणून मुलूख पानिपतचा तो वीर शितोळ्यांना ॥
दिला नाहीं आजपर्यंत त्यानीं तुम्हीं जाणा ॥
माणीक गिळले माशानं तेव्हां त्या क्षणां ॥
मिळणार कसं तें परत पुन्हां शितोळे यांना ॥

चा.क्र. १ ) अशा शूर शितोळे घराण्यांत, ग्वाल्हेर नगरांत, शितोळे वाड्यांत, नांदती आज नांव मालोजीराव, सद्गुणी सुपुत्र तयां कृष्णाराव, येतसे घडून ज्यांचा विवाह ॥ २ ॥

॥ सरदार शितोळे ग्वाल्हेर ॥

॥ भाग ३ रा ॥

चा. क्र. ७ भेदीक १)
हिंदुस्थानावरी राज्य इंग्रजी आले जेव्हां पासून ।
क्षत्रियांच्या हातीं नांगर आला तलवार हातची जाऊन ॥
शेतकऱ्यांची पाहून दैना राव मालोजी कळवळला ।
दैन्य घालवीज प्रजा ही सुखवीन ध्यास लागला जीवाला ॥

चा. क्र. १)
ग्राम सुधारणा करण्याचा, बेत पहा त्यांचा, शेतकऱ्यांसाचा, आरंभ केला प्रत्यक्षच कार्यास, महात्मा गांधींच्या धरून मार्गास, केली सुरवात आणा ध्यानास ॥

चा. क्र. २)
आदर्श सेवासंघ संस्था, केली स्थापन ग्वाल्हेर राज्यांत ॥
जी शेतकऱ्यांचे साठीं, रात्रंदिन करी मेहनत ॥
करुनिया द्रव्यसहाय्य, रक्षिले प्रथम निश्चित ॥
खास जहागिरीचे गांव, पौरी हे तयाचे ख्यात ॥

चा. क्र. ३)
निरक्षरांना केले साक्षर देऊन शिक्षण ॥
दिले देशी धंद्याना त्यांनी उत्तेजन ॥
खादीचे महत्व पटविलें सर्वांना त्यांनं ॥
हातमाग चालू केले घरोघरी चरखा फिरवून ॥
स्वच्छतेचे महत्व सर्वांना समजाऊन ॥
गांव झाले आयुरारोग्यी सुखी संपन्न ॥

चा. क्र. (जोड ४)
वाढवून इतर व्यापार, कमी केला कांहीं कारभार, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविले त्यांनी साचार ॥ शेकडा एकशे पन्नास टक्के जाण, चालीस टक्के कर्ज निवारण, शेतकऱ्यांचे करुनिया त्यानं, बनविले नमुनेदार गांव रात्रंदिन खपून ॥

चाल क्र. १)
गेले देशी धंदे लयाला, तरुण शिकलेला, पण बेकार झाला, कारण नोकरीच्या मागें धांवणार, नोकरीसाठीं सतत फिरणार, उद्योगाकडे लक्ष नाहीं देणार ॥

चा. क्र. (जोड ४)
ग्राम सुधार शिक्षण घेण्यास, आज पहा पौरी गांवास ।
बाहेरून येती विद्वान कितिक सरोस ॥ (२२)

:-

|| [illegible] ||

लगा. ) यावरून योग्यता त्यांची कळेल आपणांस ॥ व्यासंग मोठा विद्येचा, जबर नाद ग्रंथ संग्रहाचा, पुरस्कर्ता संस्कृत भाषेचा, अभिमान मोठा पूर्वजांचा, विद्वान अंध विद्येचा, निर्व्यसनी सच्चा वाणीचा, व्यापार आणि उद्योग मंत्री ग्वाल्हेर राज्याचा ॥ दानशूर खऱ्या दिलाचा, अवतार जणूं कर्णाचा नवीन हाराचा ॥ दुष्टांनाही क्षमा करणार, अपकार कर्त्यावरतीं ही करील उपकार ॥

चा. क्र. १ ) अशा विद्वान पित्याचे पोटीं, जन्मे निश्चिती, पहाया जगतीं, असवली माता लक्ष्मी खास, सद्गुणी अशा कृष्णरावास, ऐकावें पुढील सर्व कवनांस ॥ ३ ॥

|| भाग ४ था ||

चा. क्र. ५ ) अठराशें पंचेचाळीस शके शालीवाहन, शुभतिथी ती आश्विन वद्य पंचमी जाण, असवली लक्ष्मीबाई पुत्ररत्नासी छान, खरोखरीं लक्ष्मी ती साची, शितोळे घराण्याची, घ्यावं ऐकून ॥
आनंद जाहला तेव्हां फार सकळांस, उत्सवाचा थाट दान धर्म केला बारशास, ठेविलें नांव बाळासी कृष्णराव खास, दाऊनी आपल्या बाललीला, तोषवी सर्वांला, कृष्ण भासला, लक्ष्मी मातेस ॥

चा. क्र. १ ) जसा बाळ वाढू लागला, तसतसा त्याला, मातेनं बोला, ओनामा पढविला विरश्रीचा त्यांस, सांगुन पूर्वजांच्या पराक्रमास, जसा जिजाईनं बाल शिवबास ॥

चा. क्र. २ ) जिचे हातीं पाळण्याची दोरी, तीच राष्ट्रातें उध्दारी ॥
म्हण सार्थ केली मातेनें, घराण्याची वाढवून थोरी ॥
दानशूर सु-शील म्हणुनिया, पसरली कीर्ती दूरवरी ॥
पतिव्रता माऊली साची, अतोनात प्रेम प्रजेवरी ॥

चा. क्र. ३ ) शुध्द बीजापोटीं फळें रसाळ तीं गोमटीं ॥
जाणावी स्पष्ट ही थोर साधूंची उक्ती ॥
मर्दानी खेळाची आवड बाळाला पुरती ॥
त्यापरिस शिक्षणांत हुषार इंग्रजी, मराठी ॥
डेक्कन कॉलेजांत मिळवी आज जो कीर्ती ॥ :-

॥ सरदार शितोळे ग्वाल्हेर ॥

चा.क्र. ८ झंपटी ) बॉक्सींगचा खेळ परदेशी, कठीण आपणांसी, पण कृष्णरावासी, आवड फार त्याच खेळांत, जाहला त्यांत पुरा निष्णात, एकोणिसशें एक्केचाळीस सालांत, राव बॉक्सींगच्या सर्व सामन्यांत, चॅम्पीयन आला त्याच कॉलेजात, अपूर्व असा विजय मिळविला त्यांत, ऐका तुम्हीदादा ॥

चा.क्र. ४ लगट ) घोड्यावरती मांड बळकट, निःष्कपटी, निगर्वी खचीत, राही मिसळून गरीब विद्यार्थ्यांत, पितयाचा कित्ता गिरवीत, पातला अजीं सोंडूर राजधानींत ॥

चा.क्र. १ ) ऊजळले भाग्य सोंडूरचे, तिच्या रयतेचे, गरीब गुरिबांचे, कसें तें पुढील चौकीं कळणार, आनंदी आनंद पुढें येणार, ऐका शाहीर दीक्षित सारं गाणार ॥ ४ ॥

o X o

॥ भाग ५ वा ॥

चा.क्र. १ ) जाहला योग्य लग्नास, कृष्णराव खास, थोर पितयास, पत्नी यांस योग्य कशी मिळणार, राखून घराण्याचा कुलाचार, वाढविल आपुली कीर्ती साधार ॥

जाणूनी चिंता पितयाची, कन्या धीराची, राणी सोंडूरची, बोले विनयानं मातापितयांस, वधू निवडीन मीच मनास, पाडीन पार कार्य हे खास ॥

चा.क्र. २ ) जिचे नांव सुशिलाराजे, नांवांपरी सु-शीला गाजे ॥
आपल्या मार्मिक दृष्टींतून, करूं लागली वधू संशोधन ॥
मोठमोठे धनीक संस्थानीक, दाखवती मुलीं आणून ॥
करूं म्हणती हुंडा मानपान, आणि होऊं धन्य आपण ॥

चा.क्र. ४ लगट ) राणीसाहेब म्हणती चिन्ताला, हुंड्याची आशा कोणाला, जो असेल दरिद्री त्याला, पैशाचा लोभी असेल त्याला, मानपान पाहिजे कोणाला, खळखळाट ऊथळ पाण्याला, आमुच्या मान्य घराण्याला, पाहिजे वधू कुलशील संपन्न बाला ॥

चा.क्र. १ ) नागपूर प्रांतचे सरदार, होते मिनिस्टर, पहिले बॅरीस्टर, रामराव देशमुख मराठा समाजांत, मान ज्याना आज अखिल समाजांत, त्यापरीच होता ग्वाल्हेर राज्यांत ॥ (२४) :—

॥ सरदार शितोळे ग्वाल्हेर ॥

चा. क्र. ३) मोठमोठ्या नोकऱ्यां सरकारी ज्यांच्या पायांवरी ॥
ओळण घ्यावया तयार होत्या खरोखरीं ॥
राष्ट्रकार्यासाठीं हा वीर त्याग त्यांचा करी ॥
एकच संस्था काँग्रेस सुखवील देशाला भारी ॥
जाणुनी करितसे कार्य तिचे निर्धारी ॥

चा. क्र. लाट ४) देशासाठीं सोसुनिया हाल, झिजविली तनू बिनमोल, लोकमत ज्यास अनुकूल, असा देशभक्त जाज्वल्य, काँग्रेसचा प्रधान मुंबई प्रांताचा लाल ॥
घरंदाज त्यांच घराणं, जनतेत मान सन्मान, आज ज्यांच्या शब्दावांचून नाण्याचा व्यवहार ग्वाल्हेर राज्यांत चालेना चलन ॥
अशा विद्वान पित्याची कन्या, स्नेहलता परम ती मान्या, स्वरुप सुंदर खरोखर धन्या। सुशिक्षीत, चतुर, विद्वान उपमानच अन्या ॥

चा. क्र. दांगटी ८) निवडिली राणी साहेबाजीं, विचार करुनी, वधू सुलक्षणी, स्नेहलता देशमुखांची समयांस, केली नेमस्त कृष्णरावास, दवडी पावला तिच्या भावास, कार्य म्हणे करीन तुझ्या गांवांस, जाहले मान्य आईवडिलांस, तसेंच त्या बंधू कृष्णरावास, अर्ध्या वचनांत पित्याच्या खास, ऐका ॥

चा. क्र. लाट ४) आजकालचे कांहीं तरुण, शहाणे होती घेऊन शिक्षण, निवडिती वधू स्वतःच आपण होऊन ॥ दोघांचे प्रेम जमण्याला, जाहीं वेळ मुळींच होत्याला। मग कुठला अवकाश लग्नाला, तसाच घटस्फोट घेण्याला, एकदमच तयारी दोघांचीही दोन्हीं कार्याला ॥

चा. क्र. १) विद्वान सुशिला राणी, सद्गुण खनी, विवेकी, विज्ञानी, ठरविला मुहूर्त लग्नाचा, वैशाख (शुध्द) अक्षय्य तृतीयेचा, लाभण्या योग अक्षय्याचा ॥ ५ ॥

×——×——×

॥ सरदार शितोळे [illegible] ॥

॥ [illegible] ॥

चा.क्र. ७ / प्रदीर्घ - ९) मानपानाच्या फाजील रहीला फांटा तयांनीं देऊन ।
मंडप सजविला आपुल्यादारीं सारी नगरीही शृंगारून ॥
विवाहानें संबंध जोडणे अमान्यासाठीं खरें तत्व चि तें ।
मान्य झालें मालोजीरावानां तसेंच देशमुखांनाही तें ॥
अशा रीतीनें विचार एकीचे होतील मराठा समाजांत ।
स्वराज्य मग तें कोणच येईल सांगा आपुल्याहातांत ॥

चा.क्र. १ घराण्याचा फाजील अभिमान, वृथा धरून, लखूजी जाधवानं,
लावला हरताळ दिल्यावचनास, देईना कन्या शहाजीभोसल्यांस,
आला परी योग जुळून समयांस ॥
परी त्याच विवाहापासून, शिवबा जन्मून, केले धर्मरक्षण,
कार्य जाहले उज्वल या समयांस, लाभला छत्रपती तख्तास,
सांगे महाराष्ट्राचा इतिहास ॥

चा.क्र. २) हा तरी होता वर पक्ष । त्यांतून श्रीमंत सरदार ॥
वधूपक्षही थोर सरदार । दोघांचे समान विचार ॥
वधू-वर सुशिक्षित दोघें । प्रीतीसंगम असा होणार ॥

चा.क्र. ३) कुणीं सांगावें यांतून शिवाजीही जन्म घेईल ॥
आणि पुन्हां हिंदुराष्ट्राचा उध्दार होईल ॥
ही आस एक शाहीरांच्या हृदयामध्यें खोल ॥
कृष्ण वृक्षावर वाढो ही स्नेहलता वेल ॥
फल, पुष्पें राष्ट्रासाठीं देवो अनमोल ॥
प्रार्थना हीच प्रभूपदीं शाहीरी बोल ॥

चा.क्र. १७) ती नगरी हर्षली सारी । सोडूर भजा बहू नटली ॥
सु-स्वागत करण्यासाठीं । शृंगार वैभवा उठली ॥
तोरणें गुढ्या झुमारांनीं । स्वागतात गुंग हो झाली ॥
॥ उजळीले भाग्य तें आमुचें ॥ हे बोलची प्रत्येकाचे ॥
॥ ते चरण शितोळे यांचे ॥
लाभले आम्हां या काळीं । ही काया धन्यची झाली ॥१॥

चा. क्र. १७ ) महाराणी अमुची जननी । जी सद्गुण मंडित रवाणी ॥
त्या कृपें हे मंगलकार्य । घडले सोडूर राज आंगणीं ॥
दे दीर्घायू वधू-वरांना । प्रार्थना ही प्रभूचरणीं ॥

चाल ) ॥ महाराज राव यशवंत ॥ घोरपडे क्षात्र कुलवंत ॥
॥ आम्हांसी पूज्य अत्यंत ॥
त्यांच्याच कृपेनं योग हा आला । चिरकाल लाभो आम्हांला ॥ २ ॥

चा. क्र. १ ) प्रार्थना प्रभूचरणांस, देई दीर्घायुष्य, वधू-वरांस, मागणें हेंच
एकचरणांस, शाहीर दीक्षित करुनी जमनांस, संपवी आतां वीरकवनांस ॥
हा काव्यहार सुंदर, मंगल आहेर, अर्पिला थोर, स्वीकारा राजेश्रींनें
सरकार, तुमची पत्नी हीच लक्ष्मी असणार, आम्हीं मग कायआहेर करणार ॥ ६ ॥
॥ ६ ॥

गुरुवार दि. ३।११।६३. ० क्रांतीशाहीर र. द. दीक्षित चिंचणीकर
१२।१२४१ सदाशिव पुणें ३०

॥ सुभाषित ॥

॥ [ तरुण स्त्री पुरुषांचा परस्परांकडला ओढा, केवळ मानसिक असूंच शकत नाहीं. कित्येकदां प्रेमाचा आरंभ बौद्धिक अथवा भावनात्मक असूं शकेल, पण एखाद्या व्यक्ती विषयीं वाटणाऱ्या उत्कट आकर्षणाचा उगम, बुद्धी किंवा भावना यांच्या जननांतून किंवा समाधानांतून होत असला तरी, त्याची परिणती एकमेकांविषयीं वाटूं लागणाऱ्या शारिरीक आसक्तीतच होते. ] ॥

(६५)

॥ श्री सद्गुरु जयराम स्वामी महाराज कीजय ॥

चि. कुमारी जयश्री गणेश दीक्षित जन्म :- मार्गशीर्ष शु॥ १० दशमी

सायंकाळी नवे टाईम ६।५८ जुने टाईम ५।५८ मु. सोमवार [illegible] कराड.

॥ इचा पाळणा ॥

कवी :- देवासदरबार व सोंडूर राज्य शाहीर ग. द. दीक्षित [illegible] (सांगली)

गायीका :- कुमारी कुसुम गोविंद पुजारी (कराड)

(चा. क्र. १५ पाळण्याची) हालवी माय ही सुशिला, पाळणा तुजला, कुमारी जयश्री ।

लाभू दे आम्हां विजयश्री ॥ धृ०॥

किती वेळ खेळशी बाळे, खेळुन वेल्हाळे, झोंप कां नाहीं, नीज गे नीज लवलाही ॥

देशांत होय खळबळ, कठिण ये काळ, म्हणून कां भीती, वाटे तव कोमल चित्तीं ॥

किती स्त्रियां थोर वासान, सोसून अपमान, पारतंत्र्याची, तोडिती बेडी ती त्याची ॥

(चाल) ॥ जर्मनीनें केली स्वारी ॥ हादरली धरणी सारी ॥ म्हणुनी कां जागते स्वारी ॥

(चाल १८) परी बागुलबावा थोर, मातला भारी, नीज गे नीज सुकुमारी ॥१॥

भारता कराया मुक्त, झटती देशभक्त, महात्मा गांधी, सोसुनी आज त्याच्या व्याधी ॥

म्हणुनी कां होती तुज कष्ट, सांग मज स्पष्ट, जयश्री बाळे, राजसे थांबवी चाळे ॥

ती धन्य सरोजिनी देवी, कमला देवी, झटती तुजसाठीं, स्त्रियांच्या उन्नतीसाठीं ॥

(चाल) ॥ तिकडे कां गुंतले चित्त ॥ खळबळ होय चित्तांत ॥ कां झोंप नसे नेत्रांत ॥

(चाल १५) या वयांत घ्यावी निद्रा, पांघरुन पदरा, आईच्या थोरी, नीज गे नीज सुकुमारी ॥२॥

पहा पुजारी आणि दीक्षित, पवित्र वंशात, जनन तव होई, आनंदी आम्ही पाही ॥

औदुंबरी ज्याची वस्ती, अशा जयमूर्ती, दत्त अवधूत, तंव शिरीं धरितस छत्र ॥

तंव पिता राष्ट्रशाहीर, असे जाहीर, थोर ती ख्याती, दरबारीं काय तुज कमती ॥

खास शाहीर देवास दरबार, आणिक सोंडूर, मानसरदारी, पोषाख सह तलवारी ॥

(चाल) ॥ राणी देवासच्या प्रमिलादेवी ॥ सोंडूरच्या सुशीलादेवी ॥ बडोद्याच्या शांतादेवी ॥

(चाल १५) मारिती हांका तुज खास, पहा खेळण्यांस, येये जयश्री, जा घेऊन ती विजयश्री ॥३॥

ती धोत्रें करीत पावन, दूधडी भरून, सदा जी वाही, श्री माता कृष्णाबाई ॥

आजोळीं कृपादृष्टिनें, सदा वरदानें, पाहते आजी, होऊनिया स्वमनीं राजी ॥

कोयना आणखी कृष्णा, हरती भवतृष्णा, संगमावरी, तो जाण कराड नगरी ॥

(चाल) ॥ तंव जन्म होय शुभ दिवशीं ॥ शुध्द दशमी मार्गशीर्षी ॥ बध अस्तमान समयासी ॥

(चाल १५) घे निद्रा आतां छान, ठेऊन समाधान, बाळे साचारी, नीज गे नीज सुकुमारी ॥४॥

नच आले तव गणगोत, समारंभात, भाग नच घेती, म्हणुनी कां नसे तुज शांती ॥

कुणीं नको कुणाचे बाई, जगीं या पाही, असा विपरीत, अनुभव ये मज साक्षात ॥

॥ पाळणा ॥

चाल १५ ) तंव आजी राधाबाई, मिळीमम आई, पुरविल सोस, जच श्रमवीव्यर्थ कायेस ॥

चाल ) ॥ अवधूत दत्त जयमूर्ती ॥ त्रिभुवनांत ज्याचीकीर्ती ॥ असे प्रसन्न आम्हांवरती ॥

नच ठेवी कसलीही चिंता, झोंप सुखें आतां, रात्र होमारी, नीज गे नीज सुकुमारी ॥ ५ ॥

र.द.दीक्षित. ॥ समाप्त ॥ दि. ४।११।८३, नरकचतुर्दशी, पुणें ३०

—o—x—o—

॥ कंट्रोलचे दुकान ॥ ॥ कवी:- क्रांतीशाहीर ॥

॥ गायक ॥ ॥ ग.द. दीक्षित, चिंचणीकर ॥

चा.क्र. ६ कराव - २ ) टक्का गेला रुक्का गेला आली आक्काबाई, शिरली घरामधें पाहीं, यांत चालू

ढीलढाई, इंग्रज, जर्मनी, विशाल, लढतांत आज बहू साल, परी

आमुचीं निघतसे साल ॥

सुवर्णभूमी देश आमुचा असुनी हिंदुस्तान, पडली अन्नाची ती वाण,

तरी वस्त्राची ती जाण, मांडले दुष्काळानें ठाण, आटला पाऊस साली साल,

कधीं पडतो पूर्ण बेताल, एकंदरीत होतीतें हाल ॥

कष्टकरी शेतावरीं शेतकरी दीन, खपे रात्र आणिदीन, गहूं

ज्वारी पिकवी छान, पण मालक व्यापारीच त्यांचे, सारी शेंडी हातीं

परक्यांचे, आम्ही दलाल मात्र कोळशाचे ॥

चा.क्र. ६ कराव-४ ) सरकारानं सारें जाणुनी, सोय केली त्यांनीं, दुकानें काढूनी, ख्रसी

धान्याची, हो, पहा रयतेची ॥

त्यांतही प्रकार एक असा, सांगतो खासा, सारा वशिल्याचा,

हो, बाजार साचा ॥

चा.क्र. ६ कराव ३ ) चोख व्यवस्था केली नेमून योग्य अधिकारी, यांत सुध्दां मारामारी,

लागे पंढरपुरची बारी, चारचार तास तिष्ठत, ऊभें राहती पाऊस

चिखलांत, खरोखरी हाल अत्यंत ॥

तांदूळ नाहीं गहूं नाहीं नाहीं ज्वारी, बाजरी, शिमगा पौर्णिमा

होते साजरी, कस कुठी खाजरी, यांत पहिली अडचण नाण्याची,

आग आग होते अंगाची, पोटांत आग अन्नाची ॥

धान्यापेक्षां घडपड सारी मिळवाया साखर, जरी नसली भाकर,

होतो परक्यांचा चाकर, साखर ज्याविना अडला व्यवहार, चहा

नसतां डोके फिरणार, सारें चहाधीन होणार ॥

चा.क्र. ६ कराव-५ ) व्यापाऱ्यानीं संधी साधून, फसविला जाण, शेतकरी भोळा,

हो, सोण्याचा गोळा ॥ (२९)

:-

॥ कंट्रोल दुकान ॥

चा. क्र. ३) म्हणतीचलाचहाचा गूळ निघाला नविन ॥
चहाबाज राहती गुळाचाच चहा पिऊन ॥

चा. क्र. ६ करावे-२) देशामधें जियं माणसांना अन्न नाहीं, तियं जनावरांना पाहीं, दाणा वैरण कुठून यावी, नाहींत्यांना पोटभर चारा, म्हाती फक्त खाऊनी वारा, त्यांचे पुरतें वाजले बारा ॥ १ ॥

× × ×

॥ भाग २ रा ॥

चा. क्र. ६ करावे २) सारवल्यासाठीं धडपड तशीच घासलेटासाठीं, तुटून पडती गाडीवरती, आपसांत करिती लट्ठालट्ठी, एकमेकांची डोकी फोडिती, आणि काचा रक्त काढीती ॥
ज्यांना कधीं ठाव नाहीं जाणे बाजारीं, फिरती ऊनाड मैनेपरी, लाऊन स्नो, पावडरी, देह नाजूक सुकुमारी, घेऊनी टमरेल हातीं, रांगेत ऊभ्या राहती, ऊनामधें कळी कोमेजती ॥
साठोकला सरकारानें गेले सारेंच पेट्रोल, बसले सार्‍यावर कंट्रोल, दर जिनसी लागले टोल, म्हणती लागले पिकांला टोल, पण खरें निराळेंच टोल ॥

चा. क्र. ६ करावे-६) स्वैंपाक करण्या इंधन, मुळींच मिळेनं, कोळसाही जाण, परक्या व्यापार्‍यांनीं, हो, महाग केला त्यानीं ॥
तोडुनी सारें जंगल, केले मंगल, परक्यालोकांनीं, हो, मोठ्या युक्तीनीं

चा. क्र. ६ करावे-२) सुरु केली धान्यवांटणी करुनिया गणती, बायको पोरं सारींती, रॅशनिंग कार्डावरती, लोकसुध्दां कमी नसती, ब्रम्हदेवाचें कार्य करीती, खोटीं माणसें जन्मा घालती, दुसर्‍याचें धान्य लुबाडीती ॥
नफेबाजीस आळा घालण्या झटते सरकार, देऊन कांहीं अधिकार आपल्या लोकानांही ख्यार, पण त्यांत सुध्दा स्वार्थी कांहीं, घरें भरती भरती आपली आधीं पाहीं, गरिबांचा वाली कुणीं नाहीं ॥
श्रीमंताना पडत नाहीं कशाचीही वाण, पैशास चार पैसे जाण, देऊन धान्य महान, ठेवून भरती धान्याची पोती, गरिबांना मात्र साडेसाती, ऊभी राहिली आजच्या वक्तीं ॥

चा. क्र. ३) जर धान्य शिल्लक मुळींच नाहीं म्हणावे ॥
तर ब्लॅकमार्केटमधें येतें कुठून सांगावें ॥
भाव जादा देता मिळते पाहिजेजितकें हवे ॥
तेंच प्रकार कंट्रोल दुकानांत घ्यानीं आणावें ॥ (२०)

॥ [illegible] ॥

चा.क्र ५
कराव-२

कांहीं अधिकारी वागती प्रामाणिकपणें, गोरगरिबांना जाण असती सुखवाया लागून, पण त्यांचे सुध्दां हाल होती। सारांश अशी आहे स्थिती, बंधूनों वर्णिली किती, लावणी शाहीर दीक्षिती ॥

नाणें सारें गडप झाले नाचती कागदी घोडे, व्यवहार सारा आडे, कोण पाहतो तिकडे, त्यामुळें होती यातना, पावलोपावली प्रश्न पडतोना, पैसा उपास मार जाणा ॥

पुणें १२१२ सदाशिव ३० — र.द.दीक्षित

आश्विन वद्य ३० शके १९०५ (लक्ष्मीपूजन) दि. ४।११।८३.

समाप्ति

॥ सद्गुरु जयराम महाराज की जय ॥

॥ पोवाडा — पक्वान्न इलेक्शन ॥

(कवी:- राष्ट्रशाहीर ग.द. दीक्षित), भाग १ ला ॥ (मिरजीकर जिल्हासांगली)

चा.क्र. ६/२) जागतीक युध्द होतां झाली महागाई, साखर, गहू, मिळना कांही, तांदूळ अदाहेला नाहीं, जपोकाजीस ताळ जापाही, सर्वजातीची पक्वान्नेलवलाही, एकें जागीं जमली नवलाई ॥

ठरवूं म्हणती राज्यपध्दती आपली स्वतंत्र, याची कथा विचित्र, ऐका तुम्हीं सर्वत्र, केकसाहेब इंग्लिश पक्वान्न, साऱ्यांचा खल होऊन, लढविले करते इलेक्शन ॥

चा.क्र. ६/३) देशभक्त अनरसोपंत पाटोळे, तालीम मास्तर लाडोजी गुंडगोळे, बंधमुरांब गोडांबे आले, खाजाशेठ कचोरीही पातले, जनरल घारगे माळी मोपळे, आचार्य मोदकराव गोडबोले, अठराधान्य प्रतिनिधीं कडबोळे, ऊडीदराव आले वगळे, सावळे, भजीभाई हॉटेलकामगारमेळे, कडबूशास्त्री बहू पुरणवाले, बॅरिष्टर घेवर पारशीं आले, देशी ख्रिश्चन जॉर्ज सुदाम मांडे मेले, संगीत चिवडा संपादक आले, लड्डुभैय्या तें मिरगुंडेवाले, शेंदाडसिंग रायते तबलेवाले, स्वयंसेवक राव शंकरपाळे, वकील चिरोटे पापुद्रेवाले, बोबो कथेकरी पापडराव चापट, सांडगे लुक्कडराव बहुतची थीट, मुस्लीम मौलाना बिर्याणी, खानबहादूर पुलावा दया ट्यानीं, प्रसिध्द खवाळदू पॅटीस येऊनी, स्त्रियांतर्फे पहा करंजी कात्रे, प्रसिध्द मराठा पोळी पांढरे, चकलीबाई तीचक्कर वेणी, विधवा अन्नपूर्णा बाई चरणीं, फुग्गाबाई पुरी गुजरीणी, केशर बाई श्रीखंडे नायकीणी, जमल्या साऱ्यानी, या लढ्या आतां इलेक्शनीं ॥

चा.क्र. दांगटी ८) मौलाना साहेब बिर्याणी, उभे राहुनी, हात फिरवूनी, दाढीवरुनिया बोलती सर्वांस, धर्मगुरु मुस्लीमांचा खास, फकिरांपासून बादशहास, प्यार मी, माझा फार सहवास, शिवाय एक हजारोंवर वर्षांस, राज्य आम्हीं केलंय हिंदुस्थानास, म्हणून पाकीस्तान पाहिजे आम्हांस, मीच योग्य अध्यक्षपदास, ऐका तुम्ही दादा ॥ १ ॥

॥ ऐका तुम्ही दादा ॥

॥ श्री ॥

चा.क्र.८ दांगटी) मौलानांचा ऐकतां सवाल, रागाने लाल, जाहले कडबू शास्त्रीसमर्थांस,
मीही धर्मगुरु ब्राम्हणांचा खास, देव होती नम्र आमुचे चरणांस,
म्हणून निवडावे अध्यक्ष मज खास, ऐका तुम्ही दादा ॥
मग उठले ऊर्मिदराव कडबोळे, फिरवूनी डोळे, बोलूं लागले।
प्रतिनिधी आम्ही अठरा धान्याचे, मराठा क्षत्रिय धर्माचे, शरीर
काटक फार आमुचे, काम नाहीं शास्त्रीजी मुल्लाचें, जरी ते गुरु त्यांच्या
धर्माचे, म्हणून मीच व्हावे अध्यक्ष साचे, असावे अनुमोदन मला
सर्वांचे, या विनंती ही दादा ॥

चा.क्र.२) स्वयंसेवक शंकर पाळे बोलती सर्वांस ॥
आम्ही महादेव कोळी प्रिय महादेवास ॥
तुपाच्या यत्न, शंकराबाई यांचा सहवास ॥
त्यामुळे आवडतो मी सर्वांपासून रेकारस ॥
म्हणून निवड करावी माझी अध्यक्षपदास ॥

चा.क्र.१) खानबहादूर फुलावाशेठ, होऊनिया ताठ, उठूनी बोलत, मीच अध्यक्ष व्हावें
आजला, अनुमोदन माझे आहेच मजला, बसाबसा खाली ओरडा झाला ॥

चा.क्र. करावे ६/३) तेव्हां मोदकाचार्य पोट सावरीत, शंकरपाळे यांचे सुपुत्र ख्यात,
त्या वक्रतुंड गणपतीचे मित्र, म्हणती आम्ही ब्राम्हण कोकणस्थ,
म्हणुनी नांव गोडबोले हे सत्य, अध्यक्षपद आम्ही नाहीं मागत,
आमच्या सल्ल्यानेच काम करा नित, विनंती हीच, करा आपण
मान्य ती साच ॥

चा.क्र.३) सर्वानुमतें लागली पुढारी देशमित्रा ॥
निवडिले अध्यक्ष मच्छेंद्र तंदुलनाथ ॥
जाहले सभेचे काम सुरू जोरांत ॥

चा.क्र.८ दांगटी) टाळ्यांच्या कडकडाटांत, तंदुलनाथ, अध्यक्षपदीं आरुढ झाले,
मुसलमानी वॉक आऊट केले, रागांतच दुसऱ्या जागीं बसले, मोदका-
चार्य पुढें आले, प्रास्ताविक भाषण त्यांनीं केले, या ऐका तुम्ही दादा ॥

(भाषण) अध्यक्ष महाराज, आणि बंधु भगिनींनों, आजचा जमलेला स्त्री
समाज पाहून, राजकीय हक्क मागायला आपण लायख झालो यांत
कांहीं शंका नाहीं. आपले मुसलीम बंधू रागाऊन निघून गेले
याबद्दल ही सभा खेद व्यक्त करीत आहे. (23) :—

॥ [illegible] ॥

(भाषण) ख्रिश्चन कवी जॉर्ज सुदाम मोरे हे स्वतःला राज्यकर्त्यांप्रमाणे मानीत असले तरी, हिंदुस्थान हीच आपली मायभूमी असे ते मानतात. त्याबद्दल ही सभा त्यांचे अभिनंदन करीत आहे. आतां मी भाषावर आपल्या देशाचे भाग पाडत आहे. ते पुढील प्रमाणे :—

(चा.क्र. ८ डांगरी) लखनौ, अयोध्या, बिहार पहिला, बंगाल, आसाम भाग दुसरा, पंजाब, पेशावर जाणा तिसरा, राजपुताना, माळवा चौथा पहावा, गुजरात प्रांत पहा पांचवा, वराड आणि महाराष्ट्र सहावा, तामीळ, मद्रास, कर्नाटक सातवा, सर्वांना समान हक्क असावा, ठराव झाला दादा ॥

उठीदराव उभे राहुनी, बोलती गर्जुनी, मराठा समाज मोठा आमचा, इतरां पेक्षां जास्ती सभासदांचा, पाहिजे आम्हां अधिकार जास्तीचा, तोंच काय घडला प्रकार पुढचा, ऐकावे दादा ॥

---

॥ भाग ३ रा ॥

(चा.क्र. ६ कटाव २) बोलू लागले कालमराव आंबटकर डॉक्टर, तेव्हां ऐकावे सत्वर आम्हीं जाणले बरोबर, शंकराचार्यांचा डाव, आतां आम्हीं शहाणे झालो समजावे, पूर्वीचे नाहीं जाणावे ॥ १ ॥

(चा.क्र. ८ डांगरी) आमच्या आंबटपणामुळे, शिवाय आम्हीं काळे, म्हणून ऐबॉर्जिनीज म्हणती आम्हांला, मानिती अस्पृश्य सारे आम्हांला, परंतु ऐका सांगतो तुम्हांला, समाज जरी थोडा आमचा असला, तरी स्वतंत्र मतदार संघ आम्हांला, पाहिजे हाय दादा ॥ १ ॥

वैद्य मुरांबा, गोडांबे साच, आंबाजी लोणचे, आमुच्या जातीचे, असून मिसळती उच्च वर्णात, फितूर झाले यू: त्यांची जगतांत, ऐकून करंजीबाई कान वदतात, असुन आम्हीं देशस्थ ब्राम्हणख्यात, वारिलेत जबरें तुमच्या समाजात, चांभार आवळे कंत्राटदार विरल्यात, त्यांच्याही मुली केल्यात आमच्या लोकांत, अशा या सुधारलेल्या लोकांत, स्वतंत्र मतदार संघ मागण्यांत, चूक डॉक्टरांची द्यावे ध्यानांत, आंबटकर सभा त्याग करतात, ऐका तुम्हीं दादा ॥२॥

(चा.क्र. १) सुरु झाले सभेचे काम, तव्हा एकदम, सांगतो ठाम, सभासद कांहीं हजर नव्हते, तयांचे संदेश आले होते, वाचती अध्यक्ष ध्यानीं द्या ते ॥

(चा.क्र. ८ डांगरी) महान साधू स्वामी रंगराज, लिहितात आज ।(२४)—

॥ [illegible] इलेक्शन ॥

डांगरी ) पाहुनिया आजच्या महागाई खास, दिपवाळी होते कीं नाहीं या
सालास, शंका जबरदस्त येते आम्हांस, शिवाय आम्ही गुंतलो
फार युध्दास, तूर्त नाहीं येणें शक्य आम्हांस, माफ करा दादा ॥ १ ॥
ऐका संदेश जिजीबाईचा, अभाव साखऱ्याचा, तसाच तुपाचा,
म्हणून नाहीं शक्य येणें आम्हांस, ठराव जर झाला कांहीं तो पास,
विसरूं नका कळविण्यास आम्हांस, बिजलीबाई लिहितें ध्यावं
ध्यानास, कूक आट मुळें करें मिळेल येण्यास, कायदेभंग करणें
उचित नव्हे खास, पैहा मॅचेस बंधूनीं सोडावला खास, कारण
नाहीं ठॉकेल त्याच्या पोटास, म्हणून करा माफ एवढ्या सालास,
विनंती ही दादा ॥ २ ॥

X

॥ भाग ४ था ॥

चाल क्र. १ ) त्यावेळीं साऱ्या पंचाननीं, विचार करूनी, बहिष्कार घालुनी,
ठरविली स्वतंत्र राज्यपध्दती, इलेक्शन कैसे लढविती,
ऐकावी त्याची सर्व रीती ॥

जाहला ठराव तो पास, यानंतर एकमतानीं ॥
आणी पुढचा विचार करण्यास, केकासाहेबांपुढें येऊनी ॥

चा. क्र. ८ डांगरी ) इतक्यांत कबाब खान, पॅटीस महाजन, मंडपात जाण,
घुसून मारामारी करूं लागले, हाणा, मारा, तोडा जाद घुमले,
तालीम मास्तर लाडोजी गुडगोळे, करंजीबाईस वांचवण्यास धांवले,
घसरगुंडी होऊन गडगडले, मौलाना बिऱ्याणी धडपडले,
आंबटकर मनांत चरफडले, मोदकाचार्य पलंगाखालीं दडले,
बॅरिष्टर चेवर फक्त सुटले, पापडराव चापट चपटे झाले,
लुखडेराव सांडगे ठार झाले, ऐका तुम्हीं दादा ॥ १ ॥
त्याच वेळीं केकसाहेबाजें, शांत करून, निकाल इलेक्शनचा
काय दिधला, १/३ जागा मुसलमानला, १/२ अस्पृश्यानला,
१/४ मराठ्यांनला, १/२८ ख्रिस्ती लोकांला, १/३० शिखांनाला, इंग्लीश
गट सुशिक्षिताला, मागत नाहीं कांहींच तुम्हांला, सात जागा
म्हणून दिल्या त्यांजला, ऐकावें दादा ॥ २ ॥
(भाषण) "मुसलमांची पाकिस्तानची कल्पना योग्य असले तरी, तूर्त २५ वर्षेपर्यंत
प्रमाणें कारभार कसा चालतो, तें पाहून मग त्याचा विचार करूं. आंबटकरांचे
म्हणणें खरें असले तरी, सरकार स्वतःच त्यांचा उध्दार करूं पहात आहे."

॥ पदरचा नजा ठेवकराज ॥

चा.क्र. ( ) ढंगाडी — सभेचे काम खलास झाले, करमणूक म्हणून तुम्हां कथिले, माफ मला
कराल बाकी सगळे, तुम्ही आतां दादा ॥

चा.क्र. १ ) — जिल्ह पाहून अकल गुंगली, वस्ती चांगली, शहर सांगली, शाहीर
दीक्षित देवास दरबार, मान जरी पट्टा आणि कट्यार ।
माफ करा चूक भूल सरकार ॥ ४ ॥

समाप्त दि. ५/११/८३. पुणे कार्तिक शुद्ध प्रतिपदा. रघुवीर दीक्षित.

॥ श्री सद्गुरु जयरामस्वामी महाराज की जय ॥

॥ पोवाडा :- शाहिस्तेखानावरील मोहीम ॥ (रेकॉर्ड कॉपी)

कवी :- राष्ट्रक्रांतीशाहीर ग. द. दीक्षित चिंचणीकर (सांगली)

॥ मोहीम १ ली ॥

चा. क्र. १) जरी आले होते प्राणावर, तरी बोटावर, निभावले थोर,
शास्ता खानाचा आला होता काळ, परी वेळ नव्हती म्हणून भूपाळ,
देई प्राणदान शिवाजी नृपाळ ॥ धृ० ॥

चा. क्र. २) विजापुरच्या अफझुलखानाला ठार केल्यावर, हादरून गेली
आदिलशाही नवल जसे त्यां फार, झाला चिंतातूर अवरंग
दख्खनचा सुभेदार, धाडिला मामा शास्ताखान, फौज देऊन,
शिवरायावर ॥

चा. क्र. १) अंतरी निराळाच कावा, त्याच्या जाणावा, ध्यानी आणावा,
मामाचा ओढा शहाकडे खास, म्हणून भाचा टपला त्याच्या नाशास,
योजुनीच धाडी शिवबावर त्यांस ॥

चा. क्र. २) मामा मरो कीं मरो शिवराय, परस्परें काढावा कांटा ॥
परी भेटला शठं प्रती शाठ्यं, पहा त्यांस शिवाजी मोठा ॥
जैसे कूं तैसा भेला, शेरा सव्वा शेर एकटा ॥

चा. क्र. ३) काव्यास कावा करण्यास शिवाजी सजला ॥
संभाजी कावजी वीरास सज्ज तो केला ॥
दोघांचा एकांती गुप्त विचार तो झाला ॥
मग उघडपणे शिवराय दावी प्रकाराला ॥

चा. क्र. ४ लगट) संभाजीला फितूर ठरवून, भर रस्त्यावरतीं शिवबानं, चाबकाचे
फटके मारून, पाठीची चामडी लोळवून, गांवभर धिंड काढून,
सैन्यासह दिला हांकलून, अशापरी केलें जाहीर सर्वांना त्यानं ॥

चा. क्र. ५ लगटी) शिवाजीस परोपरी शिव्या देत पळाल्या, खानाकडे गेला संभाजी
कावजी, म्हणतो लई हरामि आहे शिवाजी, विश्वासघातकी महान
पाजी, त्याचा सूड घेईन मी गाजी, गा ऐका तुम्ही दादा ॥

चा. क्र. १) मग संभाजीच्या साह्यानं, शाहिस्ताखान, एक लाख सैन्य,
घेऊन सर करीत साऱ्या मुलखांस, पोंचला येऊन शहर पुण्यास,
करी मुक्काम लाल महालास ॥ १ ॥ (२७)

॥ शाहिस्तेखानावरील मोहीम ॥

॥ मोहीम २ री ॥

चा.क्र. ६ ठराव २) (२) " मैं हूं सैतानका बाप " म्हणे खान, क्या करेगा सैतान, हमे उसकी डर काहेकी, जानता हूं उसकी लायकी, तोड दूंगा हड्डी चुब्बकी ॥ २ ॥

(१) संभाजी कावजी बोले शाहिस्तेखानास, नका राहूं या वाड्यांस, मान्य करा वचनांस, सुतारकीचा वाडा बिनतोड, म्हणून पडलाय असा ओसाड, प्रसंग टाळा अवघड ॥ १ ॥

चा.क्र. १) सिंहाच्या गुहेमधें कोल्हा, खुशाल राहीला, शांत त्यावेळां, बायकां पोरांसह निद्रा घेणार, शेळी वाघदरींत जाऊन रहाणार, वाघ काय तिला जिवंत ठेवणार ॥

खानानं केला बंदोबस्त, सारा दरोबस्त, वाड्या भोवतं, पहाऱ्याला पठाण दोन हज्जार, संभाजी कावजीचे चार हज्जार, होते रजपूत दहा हज्जार ॥

चा.क्र. २) बाकीचे ऐंशी हज्जार, पसरलो चारी बाजूला ॥

ठेऊनी पहारा जागोंजागीं, सारा मार्ग बंद तो केला ॥

खानाच्या परवान्याविण, न ये मुंगी आंत त्या वेळां ॥

चा.क्र. ३) अशासमयीं कारस्थान करी भूप शिवराय ॥

संभाजी कावजीच्या एका नातेवाईकास ॥

बळवून लग्न मांडिलें, वरात आणण्यास ॥

परवाना मिळविला खानाकडून समयास ॥

चा.क्र. ६ ठराव ३) वरात आणण्याचा परवाना मिळवूनी, सारे मावळे तयार होऊनी, नानातऱ्हेचे वेष घालूनी, एक नवरा बाशिंग बांधूनी, तयार होता पहा त्यांतूनी, स्वतः शिवाजी त्यांतच मिसळूनी, चालला शिवाजी शहर पुण्यांत, वाजंत्री कुणी चौघडेवाले, लेझीम काठी हालगी वाले, दशावतारी नाटकवाले, कुणी विदूषक, राक्षस नटले, नाच्या पोरें स्त्री वेषांत, वरात चालली वाजत गाजत, गुप्त हत्यारें होती संगत, दिवट्या, पलिते घेऊन हातांत, आले वाड्यावर, खान होता उभा सज्जावर ॥

चा.क्र. ८ कोरी) पाहिले मावळ्यांचे खेळ, त्यानें एकवेळ, मन झाले घायाळ, तयांतील नाच्या पोर पाहून, लवंडी म्हणे उपर आव धाऊन, परी घाबरला राक्षस पाहून, पोंचली वरात वाड्यांत जाऊन, (२८) :-

॥ आदिलशाहीतील मोहीम ॥

चा.क्र. ८ दांगटी ) सामसूम सारें शहर होऊन, झोपेमध्यें गेलं पुणं मोहून, ऐका तुम्हीं ॥

चा.क्र. १ ) रात्रीचा काळोख घनदाट, अंधार किर्र, परी तो धीट, सर्जा

शिवराय मराठ्यांचा, सुमार रात्रीं एक वाजायाचा, तयार व्हा

ऐका प्रसंग पुढचा ॥ २ ॥

---

॥ मोहीम ३ री ॥

चा.क्र. ७ श्रोदीक-२ ) चोरवाटेनं शिवा गेला वाड्यामधीं पंचवीस मावळा निवडक ।

घेऊन साथीला पूर्ण माहितगार शिरला महालांत बिनधोक ॥

बिबी शेजारीं खान झोंपला पलंगावरती खुशाल ।

तोंच शिवबानं दाढी धरुनिया ओढला न लावली मशाल ॥

ज्याला धरायास आलास वीरा तोच चोर मी शिवराय ।

घे अल्लाचे नांव आतां तूं मार पैगंबराकडे धांव ॥

चा.क्र. १ ) घाबरला शाहिस्ताखान, शिवाला पाहून, ओरडे जोरानं,

"क्या तूंही सैतान शिवाजी है! दगा! दगा! दौडो! दौडो!

पकडो, जल्दी करो! यहीं काफीर शिवाजी है!"

तोंच खरकन पडली बाहेर, शिवबाची विजयी भवानी समशेर,

कराया त्याला मृत्यु आहेर ॥

"आणि आतां मारणार म्हणून हात वरती उचलला!

चा.क्र. ४ लगार ) तों खानाची बीबी धांऊन, शिवाजीचे पाय धरुन, बोलली

त्यास डोळ्यांत पाणी आणून ॥

चा.क्र. १३ ) तूंच पैगंबर भिसमिल्ला तूंच शिवाजी रे महान ।

दे पतीस प्राणदान ॥

तुझें नांव कीर्ती जगांमधीं खास मी राखीन ।

दे पतीस प्राणदान ॥

घाली अपराध पोटीं शिवबा माझ्याकडे पाहून ।

दे पतीस प्राणदान ॥

चा.क्र. ३ ) बीबीची ऐकून प्रार्थना, कळवळे जाणा, शिवाजी राणा,

देण्या जीवदान झाला तय्यार, परी आठवण म्हणुनियाचार,

छाटली उजव्या हाताची बोटं चार ॥

चा.क्र. २ ) जरी आले होते प्राणांवर, तरी निभावले बोटांवर ॥

(२९)

:—

॥ शाइस्तेखानावरील मोहीम ॥

चा.क्र. २) तेवढ्यांत मानून समाधान, खान खिडकींतून हो पार ॥
पण तिकडं दुसऱ्या महालांत, झाला निराळाच प्रकार ॥

चा.क्र. ८ टांगटी) मुकल्याच पहिल्या खळांत, गुंग स्वप्नांत, पलंगावरतं, पोर खानाचा होता निजला, तोंच वेष पालटून कांहीं मावळा, एकदम त्याच्या महालीं शिरला, पलंगावरनं खेचला खालीं त्याला, नंग्या तलवारी दावता भ्याला, भीतीनच त्यानं प्राण सोडला, गा ऐका तुम्हीं ॥

चा.क्र. ४ लाट) सगळीकडं उडाला हाहा:कार, तोबा! तोबा! म्हणती खरोखर, शिवराय गुप्तमार्गानं पडला बाहेर ॥ कोणाला ही पत्ता न लागतां मावळ्यासह स्वार ॥ ३ ॥

॥ मोहीम ४ थी ॥

चा.क्र. १) पोंचला खंदकानजिक, तोंच भयानक, लालभडक, निखारा खंदकात आगीचा लालेलाल, पाहून विचारांत शिवबा कांहींकाळ, पडला कसें जावें ओलांडूनी जाळ ॥
तोंच एक वीर स्वामीभक्त, ब्राह्मण देशस्थ, चिमणाजी ख्यात, पालथा पडला अग्नीचेवर, पाय म्हणे देऊन माझ्या पाठीवर, करावी मात शत्रूचेवर ॥

चा.क्र. २) ब्राह्मणाचा त्याग पाहून, ये गहिंवर शिवबा कंठीं ॥
ज्यांचे पाय आम्हीं वंदावे, कसा पाय द्यावा त्या पाठीं ॥
दुर्वास ऋषीची लाथ, धरी हृदयीं प्रभू जगजेठी ॥
पण राष्ट्रकार्याचे साठीं, दिला पाय तयाचे पाठीं ॥

चा.क्र. ३) पटकन गेला पलिकडे मारुनी उडी ॥
तो तिथें तय्यारच होती कल्याणीघोडी ॥
झाला स्वार आणि दिली टांच तेव्हां ती घोडी ॥

चा.क्र. ४ लाट) भरधांव धाऊं लागली, तुडवीत रान त्यावेळीं, मैदानांतली हरणीं मागली, धन्यापुढें प्राण ही तुच्छ तिला त्या काळीं ॥
पोंचला कात्रज घाटांत, केला शिवानं प्रकार अद्भुत, बैलांच्या शिंगालान् झाडा झुडपांना पोत ॥ पेटवून पळविले बैल रानो माळांत ॥ आणि स्वत: केले प्रयाण सिंहगडावरतं ॥
आग होता शिंगाची बैल, पळूं लागले पूर्ण बेताल, (30) :-

॥ आहिरतेखानावरील मोहीम ॥

चा.क्र. ४ लाट ) जिकडे तिकडे दिवट्या हिलाल, झाडावरही दिसूं लागलं, संभाजी कावजी खानास बोलला बोल ॥

चा.क्र. १२ गिरच्याची ) पहा चालला दिवट्या लावून चोर शिव्या भोसला ॥

चला गाठूंया दौड मारजी साऱ्या सैन्यासह चला ॥

मोठ्या वेगानं खान सैन्यासह करी पाठलागाला ॥

शिवाजी समजूनच मागें बैलांच्या नंदीबैल लागला ॥

चा.क्र. ४ लाट ) पहाटेचा सुमार जंवा झाला, बैलांना फेस बघा आला,
काय म्हणती एकमेकांला, " अरे ! आपण तर जातीचेच बैल !
पण हे नंदीबैल कां आमच्या मागें लागलेत ?
खानानं पाहिलं जंवा बैल, म्हणे शत्रीचेच नंदीबैल, हा सारा
सैतानका खेल, असं म्हणून काढला पळ, सैन्यासह गांठला
त्यांना देश बंगाल ॥ बादशास खजिना धाडिला, कामगिरी
फार अवघड शिवाजीची बोला ॥ सारांश शंका एक छान,
हातीं आलेला शाहिस्तेखान, कां मारला नाहीं शिवबानं,
कायमचा कांटा कां नाहीं काढला साजं ॥ यांत होतं राजकारण,
गुप्त शत्रू होता तो औरंगजेबाचा म्हणून ॥ घरचा शत्रू ठेवला
जिवंत घ्यावं ऐकून ॥

चा.क्र. ९ ) • जैशास तैसे वागले, त्यांत वावगें काय केले, योग्य फळ
दिले, शाहीर दीक्षिता होई आनंद, धैर्य छत्रपतींचं पाहून
हो अंध, म्हणुनिया केला पोवाडा बंद ॥ ४ ॥

पुनर्लेखन दि. १०/११/८३ विष्णु-लक्ष्मी सदन
प्रा. अरुण कुलकर्णी घाटगे कॉलनी कदमवाडी जवळ.

X

॥ श्री सद्गुरु जयराम स्वामी महाराज की जय ॥

॥ पोवाडा :- वीर नेताजी पालकर ( सेनापति ) ॥

कवी-शाहीर :- राष्ट्रशाहीर गणेश दत्तात्रय दीक्षित चिंचणीकर

॥ चौक १ ला ॥

चा.क्र. १ ) धन्य वीर नेताजी शूर, पराक्रमी फार, युद्ध चातूर, जन्मला
हिराचौक गांवांत, अमर झाले नांव इतिहासांत, शाहीर
दीक्षित गातो कवनांत ॥ ध्रु० ॥
बालपणींच खेळ वीराचा, नेताजीरावाचा, नाद कुस्तीचा,
कोणी हरवीना त्यास युद्धांत, असे वीर नेहमीं कां होतात,
धन्य त्यांची माता-पिता जगतांत ॥
नेताजी मोठा जंवा झाला, होता चालला, भगिनी लगनाला,
आला अवचीत यवनी घाला, वीर नेताजी फार लढला,
फिकीर जीवाची नव्हती त्याला ॥
भगिनीची सुटका करून, हल्ला उधळून, आला परतून,
तोंवरींच कळला त्यास समाचार, व्यंकोजी वाघ माजला फार,
नेताजीस पुन्हां पडला वीचार ॥
चा.क्र. ४ ) उठाव व्यंकोजी वाघ हे शूर, पर नीच जातीचा क्रूर, त्यानं दत्तू
पाटलाची पोर, पळवून नेली साचार, अशी वार्ता कळतां सत्वर,
घेऊन तिचा कैवार, गेला तुटून वाघावर, प्रतिज्ञा केली भयंकर,
मारीन वाघाला ठार, अन् काशीची सुटका करून आणीन
माघार ॥ व्यंकोजी बोले पाटलाला, दे काशी माझ्या ऊजला,
घे पैसा आतां या वेळां, पाटलानं सवाल काय केला तेव्हां वाघाला ॥
चा.क्र. १ ) हेसी काशी देईन बगळ्याला, तुला जीचाला, वाघ खवळला,
मारुनी ठार दत्ताजीराव, काशीच्या पातिव्रत्यावरी घाव,
हाय! दुर्दैवे साधीला डाव ॥
चा.क्र. ४ ) उठाव आला घात काशीचा झाला, रानव्यांत नेताजी आला, हर
महादेव गर्जला, चढविला वाघावर हल्ला, दोन धरक्या संग्राम
झाला, वाघ सिंह एक भेटला, डाव करती खेळती कुस्तीला,
पर कोणी हटेना कोणाला पहा त्या वेळीं ॥ ( क्र. ) :-

॥ वीररत्न नेताजी पालकर ॥

चा. क्र. १) खवळला नेताजी वीर, केला प्रहार, वाघाचेवर,
रक्तानं व्यंकू वाघ न्हाला, हाय! आली मूर्छा नेताजीला,
पण वाघ व्यंकोजी होता मेला ॥ १ ॥

---

॥ [illegible] ॥

चा. क्र. १) शिवप्रभू आले तितक्यांत, त्याच जाग्यांत, वाघाचे प्रेत,
पाहुनी तोष झाला चित्तास, असा कोण वीर निपजला रवास,
मारी जो व्यंकोजी वाघास ॥
चहूंकडे दृष्टी फेकली, मूर्ती दिसली, होती बहू श्रमली,
नमन करी नेता शिवचरणांस, मस्तकी ठेवी शिव हस्तास,
ऊठ! नेताजी म्हणे शाब्बास ॥
जे असती खरे गुणीजन, देशालागून, देती जे प्राण,
त्यासी शिव घेई जवळ आपुल्या, योग्य अधिकार देई सकलां,
म्हणून केलं स्वराज्य स्थापनेला ॥
नेताजीला जवळ घेतले, वचन बोलले, सुभेदार केले,
आजपासुन बाळ तुजला, मिळाली साखर जशी दुधाला,
किंवा जसे मोती कोंदणाला ॥

चा. क्र. २) जावळीच्या चंद्ररावानं, फसवून पकडला नेता ॥
साताऱ्यांस डांबला तुरुंगात, तुरी देऊन पळाला पट्ठा ॥

चा. क्र. ३) राजदुर्गावरी नेताजी चालुनी गेला ॥
राजमाचीवर जो हाफिजखान माजला ॥
शिवाजीनं नेताजीस धाडलं पारिपत्याला ॥
लांडग्यानं करावा जसा मेंढीवर हल्ला ॥
तसा मध्यरात्रीं घातला अचानक घाला ॥
हाफिजखानां लावलं पळवून विजय मिळविला ॥

चा. क्र. ४) जेंव्हा शिवा सुरतेला गेला, नेताजी होता संगतीला,
पाहून त्याच्या शौर्याला, आनंद झाला शिवबाला, माझा
उजवा हात बोलला, सरनौबत पदीं नेमून त्याला मिरविला ॥
त्याचवेळीं तळकोंकण, शिद्दीनं केलं हैराण, त्याला करावया
शासन, शिवा चालला सैन्य घेऊन, जातांना राज्य केलं
नेताजीच्या स्वाधीन ॥

 :-

चा.क्र.४ लगट ) नेताजी शूर जरी खरा, उतावीळ बुद्धीचा पुरा, शिवशाही राज्याचा धुरा, वहाण्यास पडला अपुरा, करुनिया शिवाज्ञा चुरा, मिळविण्या पैसा गुजरायचा काढिला दौरा ॥ २ ॥

॥ चाल ५ वा ॥

चा.क्र. ८ ) इकडे औरंगजेबानं तेव्हां करुनिया विचारा, धाडले मिर्झाराजा जयसिंग आणि दिलेरा, शिवशाही नाश करण्याचा करून विचारा, वेढला गड पुरंदर, लढला मुरार, पण हरपला हिरा ॥

चा.क्र. ३ ) शिद्दीचा बंदोबस्त करून शिवा परतला ॥
तो दिसला त्याला राज्यांत धुमाकूळ असला ॥
शिस्तीचा पालनवाला फार कोपला ॥

चा.क्र.४ लगट ) नेताजीला समोर बोलाऊन, अधिकार घेतला काढून, परतोजी गुजरांस देऊन, सरनौबत केलं शिवबानं मोठ्या मानानं ॥

चा.क्र. ३ ) लागले ग्रहण खग्रास जणूं चंद्राला ॥
नेताजी होऊन बेमान मिळे मोंगलाला ॥
तशांतच शिवाजी राजा आला आग्र्याला ॥
औरंगानं नजरकैदेत ठेवलं राजाला ॥
पण तुरी देऊन शिवराय निसटूनी गेला ॥
बादशानं संशयानं कैद केला नेताजीला ॥

चा.क्र. २ ) बादशहा म्हणे नेताजी । हो मुसलमान तूं आजी ॥
जिवदान देण्या मी राजी । नेताजी ठीक वदला जी ॥

चा.क्र. ३ ) नेताजीचा झाला नेताखान पहा त्या वेळां ॥
बादशहानं दिली जहागीरीज घोडा बसण्याला ॥
पण जळे अंतरी ध्यास एक जीवाला ॥
कधीं भेटीन माझ्या प्रीय शिवाजीराजाला ॥
अशा विचारांतच त्याचा डोळा लागला ॥
गुरु मोरयानीं स्वप्नांत दृष्टांत दिला ॥

चा.क्र.४ लगट ) नेताजी उठ या वेळां, जा भेट शिवाजीराजाला, राष्ट्राचा पालनवाला, धर्माचा पालनवाला, तो शिवाजीराजा आला, क्षमा करील खास बघ तुला आज या वेळां ॥

॥ वीररत्न नेताजी पालकर ॥

चा. क्र. १) मग शिवाजीच्या निमित्तानं, घोड्यावर बसून, आला वेगानं, भेटला तरीत शिवाजीराजास, घेतला शुद्ध करून नेत्यास, विद्वानांनीं दिली मान्यता त्यांस ॥

राष्ट्रार्थ देह झिजविला, धन्य जाहला, नेताजी मेला, म्हणूनीच शाहीर गाती गुणगान, स्वराज्याचा सेनापती महान, म्हणूनिया होता ज्यास बहुमान ॥ ३ ॥ पुणें दि. २८।११।८३

॥ पोवाडा :- संयोगिता स्वयंवर (रेकॉर्ड कॉपी)

कवी :- राष्ट्रशाहीर [भाग १ ला] ग.द. दीक्षित चिंचणीकर.

चा.क्र. १) महशूर भरतखंडात, अखिल जगतांत, पृथ्वीराज ख्यात,
पराक्रमी दिल्लीपती सम्राट, वाहवी जो शत्रू रगताचे पाट,
गाजली कीर्तीची दिगंती थाट ॥ धृ० ॥

चा.क्र. ८) पराक्रमी भीमानंतर या हिंदुस्थानांत, पृथ्वीराज चव्हाणच
झाला वीर भरव्यात, युवराज जाणा अजमीरचा शूर अत्यंत,
होता मूर्तीमंत धैर्याचा, पुतळा शौर्याचा, हिंद सत्पूत ॥

चा.क्र. १) म्हणूनीच सारे रजपूत, त्यास मानीत, आपला सम्राट,
परी राजा जयचंद कनोजाचा, असुनिया मावस भाऊ त्याचा,
मानितसे वैरी स्वतःचा ॥

बहू यत्न प्रयत्न केले, त्यानं त्यावेळे, जयचंदानं भले,
पृथ्वीराजाच्या नाश करण्यास, तरी पृथ्वीराज ना टोपे त्यास,
ऐका घडलेला सत्य इतिहास ॥

चा.क्र. २) एक कन्या जयचंदाला, संयोगिता नांवाची थोर ॥
जाहली योग्य लग्नाला, रूपवर फार सुंदर ॥
म्हणून सल्ला घेतला पत्नीचा, तोंच कळला त्यास समाचार ॥
स्वकन्या संयोगिता, पृथ्वीराजास मानिते प्यार ॥

चा.क्र. ३) म्हणूनीच ठरविला बेत करणें स्वयंवर ॥
बोलावले देशोदेशीचें क्षात्र रणधीर ॥
परी नव्हतं आमंत्रण पृथ्वीराजास खरोखर ॥
अपमान त्याचा करण्याचा करून विचार ॥
मातीचा पुतळा त्याचा करून ठेवला देवडीवर ॥

चा.क्र. ४) लगट- मग बोलला आपल्या कन्येला, बाळ! झालीस तूं योग्य लग्नाला,
म्हणुनी मी तुझ्या स्वयंवराचा बेत योजिला ॥

चा.क्र. ८) सांगी जयचंदाचे बोल ऐकून, हिरमुसले मन, कन्येचे जाण, बोलली
काय आपल्या बापाला, बाबा! आधिच मी वर पसंत केला,
पृथ्वीराज चौहाण नांव त्याला, बाकीचे पुरुष पित्यासमान मजला,
ऐकून जयचंद लालेलाल झाला, ऐका तुम्हीं दादा ॥
जयचंद बोलला मग तिला, वाहवा! वाहवा! कार्टे! काय नवरा
पसंत केलास! अगं तो पृथ्वीराज तर माझा पक्का दुष्मन!
कशी मोकलीस पोरी तूं त्याला, काय कन्या देऊं शत्रूला

(३६)

॥ संयोगिता स्वयंवर ॥

"तै कांहीं नाहीं", त्याच्या शिवाय वरावें तुवां इतर कोणाला ॥
संयोगिता बोलली त्यावेळां, बाबा! स्वयंवर माझं करताय कीं
तुमचं? बाबा! मनापासनं वरलं मी त्याला, न. माळ घालीन
देवडी वाल्याला, संयुक्तेचे शब्द ऐकून जयचंद खवळला ॥
चा.क्र.१) जयचंद झाला बेभान, बोले क्रोधानं, असू दे ध्यान, जंवर या
देहांत प्राण असणार, तंवर हा विवाह नाहीं होणार,
ऐका जाहीर सारं गाणार ॥ १ ॥

॥ गाणं २ रा ॥

चा.क्र. ६ कराव-९) व्याकूळ झाली संयोगिता ऐकून सार, जयचंदाचा तो निर्धार,
नाही भावाचा आधार, जसा रुक्मीचा अन्याय रुक्मीणीला,
रुक्मीणीला हो, तसा विजयचंदाचा तिजला ॥
जसा बलराम सक्ती करी सुभद्रेवरतीं, बेफारवारा वेलींवरती,
बाणासूर ऊषेवरती, तसा जयचंद संयोगितेला, गितेला हो,
करी जुलूम द्यावं ध्यानाला ॥
चा.क्र.१) ऊषादेवीस जशी चित्ररेखा, सखी ती देखा, सख्यकरी ऐका,
संयोगिता बोले सखीस आपुल्या, प्राण म्हणे कासावीस झाला,
ऊपाय काय सांग सखे याला ॥
चा.क्र.१४ पाळण्याची) तूं ऐक सखे दुःख करें हे साहूं । कवणातें आतां बाहूं ॥
बद जाऊं कुणा अशासमयीं मी शरण, कोणाचे धरु तरीचरण ॥
रुक्मिणी साठीं धांवला नंदनंदन । मी कोणा करूं वंदन ॥
चा.ब:— ॥ सखी म्हणे संयोगितेला ॥ धाडूनी एका ब्राम्हणाला ॥
॥ पत्रिका पाठवूं त्याला ॥ (पृथ्वीराजाला)
चाल १४ पाळण्याची) तुज साठीं सख्या झुरते मी जशी मेना, आधार कोणीही देईना ॥१॥
चा.क्र.४ ळगट) बोलाविला एक ब्राम्हण, जो चतुर आणि विव्दान, मग त्यांस
संयोगितेनं, पत्रिका दिली लिहून, कशी? काजळाची शाई
करून, असूंनी पूर्ण भिजवून, कशी होती पत्रिका ऐका चित्त देऊन ॥
चा.क्र. १२) मी रुक्मिणी तूं कृष्ण, मी सुभद्रा तूं अर्जून, ये राया ये धांवून ॥
मी दमयंती तूं नळ, मी वेल तूं वृक्ष छान, ये राया ये धांवून ॥
मी मोगरी तूं आम्रवृक्ष, ऊषा रे मी जाण, तूं अनिरुध्द महान ॥
तूं मयूर मी लांडोरी, रे ऐक हे सत्यवचन, ये राया ये धांवून ॥ (३७)

॥ संयोगिता स्वयंवर ॥

चा. क्र. १३ तुझ्यासाठीं कोठीं कोटभाण जमहि येती मेरुन । जावपत्रिका पुसटून ॥
तुझ्या पराक्रमें, चित्राले तुझ्यावरी लोन । ये राया ये धांवून ॥

चा. क्र. २ अशा तऱ्हेचे पत्र घेऊन । दिल्लीस पोचला ब्राम्हण ॥
पृथ्वीराजास भेटून एकांतीं । सारें वृत्त केले निवेदन ॥
ऐकून पृथ्वीराजाचे । आसवांनीं भिरले नयन ॥

चा. क्र. ४ (गद्य) आधींच संयोगितेनं, पत्रिका लिहिली काळजानं, आसूनीं पुसट होऊन, पाहूनी राजाचं द्रवलं अंत:करण ॥ त्यानं ही आपुल्या रक्तानं, लिहूनिया दिलं उत्तर ब्राम्हणाजवळीं त्यानं ॥

चा. क्र. राहाव पूर्ण निर्धास्त, सारा बंदोबस्त, करीन दरोबस्त,
हेतू तव स्वास पूर्ण करणार, सायंकाळीच प्रगट होणार,
ऐका शाहीर सारं गाणार ॥ २ ॥

○

॥ भाग ३ रा ॥

चा. क्र. ७ भंडीक ३ दुसरें दिवशीं मग पृथ्वीराजानं जमविले सारे नरवीर ।
चामुंडराय आणि हाहूलीराय तसा मित्र चांदभाट शाहीर ॥
जयचंदानं राजसूय यज्ञ आज मांडले संयोगिता स्वयंवर ।
देवडीवाला मज करून बसविला केला माझा अपमान घोर ॥
चालूनी जाऊन उधळून लावूं यज्ञ आणखी स्वयंवर ।
संयोगितेला घेऊन येऊं मान्य आहे शास्त्राधार ॥

चा. क्र. १ ऐकून हा विचार राजाचा, मित्र तो त्याचा, जिवा भावाचा,
भाट म्हणे अविचार योग्य नाहीं, सर्व राजांची दळं पाहीं,
जमली असताना एके ठायीं ॥

आपल्या एकट्याच्या राज्याचा, लागेल काय तो पाड ॥
चा. क्र. २ कपटाचा डाव जर केला । तर युक्ती सांगतो बिनतोड ॥
चांदभाटाची ऐकून युक्ती । सर्वही बोलती उघड ॥
हा मार्ग चला आज, राजा । होईल कार्य सफल, अवघड ॥

चा. क्र. ३ भाटाच्या सांग्यापरी त्यांनीं वेष बदलला ॥
चामुंडराय घोड्याचा व्यापारी बनला ॥
हाहूलीराय ज्योतिषी न चांदभाट चेला ॥
घोड्याच्या चाकरीला निवडक लोक घेतला ॥
घडघडा येऊन पोचले सारे कनोजला ॥ ३८

चा.क्र. ४) लाट- चांद भाट दरबारी गेला, आणि बोलला जयचंदाला, राजा!
आम्ही आलो आशिर्वाद द्यायाला, ऐकुनी तुझ्या कीर्तीला,
काय तुझा दरारा लाजवील देवाला ॥
आशिर्वादाच्या निमित्यानं, राजवाडा जाणं, पाहिला फिरून,
चा.क्र. ८) सारंगी दरवाजावरती दिसला पुतळा, चामुंडराय नं पृथ्वीराज बोला,
देवडीवरच होते पहाऱ्याला, चांद भाटानं पृथ्वीराजाला, प्रकार
हा सारा कथन केला, या ऐका तुम्ही दादा ॥
चा.क्र. ४) लाट- पृथ्वीराज तयार होऊन, पुतळ्याच्या मागे दडून, बसला वेष
बदलून, चामुंडराय घोडं घेऊन, जवळच तयार होता जाणं,
ज्योतिषी हाहुलिराय छान, प्रसंगाला होता सावधान,
बातमीदार भाट महान, आसपास फिरत होता मोठ्या चातुर्यानं ॥
यापरी व्यूहरचियला, चला जाऊ लग्नाला चला, कोण
कोण राजं जमलं पाहू लग्नाला ॥
चा.क्र. ३) एकापेक्षा एक जरबीर, दोन रणधीर, करण्या स्वयंवर,
डामडौलानं नटले सांचार, संयोगिता माळ कुणा घालणार,
पाहूया प्रकार काय घडणार ॥
चा.क्र. ६) कराव-३ पाटलीपुत्र तसे सिंध जरबीर, चितोडचा राणा समरसिंह धीर,
राजे जोधपूर आणि जयपूर, कारकाधिपती अन लाहोरकर,
बंगाल ओरिसा आणि [illegible] पार, आणि विक्रमादित्य
परमार, कितीएक ते मुजरी फेट्याचे, कितीतरी तिरप्या
पगडीचे, कोणी चढविले आकडे मिशीचे, कुणी आरामी
लठ्ठ पोटाचे, कोणी पत्यातील राज साचे, लढवय्ये परापरी
भार दागिन्याचे, कोणी जडजवाहीर किंमतीचे, गळ्यात कंठे
हिरे पाचुचे, शिरपेच मराठमोळे तुरे मोत्याचे, असे जरबीर,
मंडपी झाले दाखल ॥
चा.क्र. १) हाती घेऊनिया पुष्पमाला, संयोगिता बाला, लग्न मंडपाला
बंधूसह भीत भीत आली, मंडपात पहा प्रभा फाकली,
मेघात जणू वीज चमकू लागली ॥
चा.क्र. २) एकेकांचे करी वर्णन । बंधू विजयचंद खुलवून ॥
सर्व राजे टक लाऊन । पाहती तिला निरखून ॥
तो माळ कुणा घाली ना । परतली रिता हस्तानं ॥
इतक्यात जयचंदानं । केला सवाल तयानं हसून ॥ ३९

॥ संयोगिता स्वयंवर ॥

चा.क्र. १२) सवायाची
एकही राजा पसंत नाही कोणी माळ गुंफती ॥
तरी देवडीवर पुतळे दोन हे पहा उभे राहती ॥
एक चामुंडराय न दुसरा पृथ्वीराज चव्हाण भूपती ॥
तीच योग्यता त्या दोघांची आहे खास जिंदगीती ॥

चा.क्र. ८) दांगटी
इतक्यांत आला ब्राह्मण, मंडपी जाण, संयोगिता वांकता
नमस्कारास, बोलिजेले आज पत्रिका खास, देणारे तिने
वांचली समयास, पुतळा मागे आहे मी खास, आनंदली
बाला आपल्या मनास, घुटमळे तिथेच जवळ आसपास,
जयचंद होतांच पाठी आज नगारास, तीच तिने घातली माळ
पुतळ्यास, ऐका पृथ्वीराजाचा खास इतिहास, तुम्ही आता दादा ॥
पडतांच गळ्यामध्ये माळ, उडून तात्काळ, पृथ्वीराज तेव्हां प्रगट
झाला, जयचंदाच्या डोळ्यावर फेकला पुतळा, चटकन घोड्यावरी
स्वार झाला, उचलून घेतले संयोगितेला, टांच मग मारली या
घोड्याला, टप टप टप टपा हं गेला, गेला गेला पृथ्वीराज
गेला, संयुक्तेला घेऊन गेला, कांही राजांना आनंद झाला,
"शाब्बास" संयोगिता योग्य पती निवडला, तूं ऐकावे दादा ॥
॥ "बोलो सम्राट पृथ्वीराज चौहाण की जय" ॥

चा.क्र. ४) कटाव
मंडपात गोंधळ उडाला, तलवारींचा खणखणाट झाला,
वाद्यांचा गडगडाट गेला, करी बाण टणटणाटाला, होणा,
मारा, कापा शब्द झाला, लग्नमंडप रक्तें रंगला, समरसिंहानं
पराक्रम केला, पृथ्वीराज लढत लढत गेला, दिल्लीला पार
निघून गेला, या ऐका तुम्ही दादा ॥

चा.क्र. १)
शाहीर दीक्षित मानितो वंद्य, पृथ्वीराज मान्य, कोणीनच अन्य,
गाइले त्याच्या पोवाड्याला, बेंग इंडिया कंपनीला,
शाहीर देवास दरबारच्या झाले ॥
दीक्षित शांती शाहीर, चिंचणीकर, कर्पूरगंगा तीर,
महाराष्ट्रांत वस्तीचे धाम, शहर सांगली तयाचे नाम,
तयाचा स्वीकारा रामराम ॥ ४ ॥

॥ दि. २८।११।८३. र. ह. चिंचणीकर १२।१२८१ सदाशिव
पुणे ३० ॥

|| श्री सद्गुरु जयराम स्वामी महाराज की जय ||

पोवाडा :- मल्हारराव होळकर ( इंदोर ) सुभेदार ||

कवी :- देवासदरबार व सोंडूर राज्य शाहीर ग. द. दीक्षित । चिंचणीकर (सांगली)

(या पोवाड्याचा पहिला चौक मिळाला नाही. पुढील सात चौक लिहीले आहेत.)

|| चौक १ ला ||

॥ मल्हारराव होळकर ॥

॥ चौक २ रा ॥

चा.क्र. ६ कडाव-१) पराक्रम करण्या झाला मल्हारी तय्यार, घेऊन पंचवीस घोडस्वार,
झाला स्वारसा शिलेदार, कदमबांडे यांच्या पथकांत, पथकांत हो,
शौर्याची भारी चिन्हात ॥

तोंच खंडणी वसुली साठीं पेशवा बाळाजी, घेऊन वीर रणगाजी,
माळवा प्रांती जाई राजी, तेव्हां कदमबांडे संगती, संगती हो,
होता मल्हारराव ही लावनीं ॥

चा.क्र. १) वीर पुत्र छावा बाजीराव, होता पिसारह, तेव्हां जाणावें, शिस्त
फार कडक होती त्याची, ऐकावी गोष्ट जवळाईची, मल्हारीच्या
थोर धाडसाची ॥

पेशव्यांची आज्ञा होती सक्त, करूं नये प्रस्त, प्रजा मार्गांत,
रयतेचे करूं नये नुकसान, परी एके दिवशीं ये प्रसंग महान,
ऊपासमारी आली घोड्यांना जाण ॥

चा.क्र. २) मल्हार रावानं तेव्हां, शेतांतला जोंधळा कापून ॥
घोड्यांना घातली वैरण, हे कळले बाजीरावा जाण ॥
ऊसळल्या तरुण रक्ताचा, खवळला फार क्रोधानं ॥
त्यांतील एका शिलेदारा, काठीनें करी ताडण ॥

चा.क्र. ३) भडकला वीर मल्हारराव त्यादिणीं ॥
बोलला बाजीरावास तेव्हां गर्जूनी ॥
"काय आम्हांला खायाला घालून दमडास होय? काठीनं मारतोस?"
एक ठेऊक मारला फेंकून सोनं जोराजीं ॥
हाहाःकार झाला पेशवा गेला क्रुद्ध होऊनी ॥

चा.क्र. ४) लगार परी तेव्हां स्वस्थ बसला, आणि गुप्त बेत ठरविला, घेतो धुंडून
या मल्हारीला (धनगराला), हे कळतां कदम बांड्याला, भेटला तो
बाजीरावाला, समजाऊन सांगितलं त्याला, "धनी, जरा विचार
करा चित्ताला, ज्यानं ठेऊक मारला तुम्हांला, तो काय तुमच्याशत्रूला,
सोडील सांगावं मला, म्हणून करा माफ आजीं त्याला, आणि लावा
राष्ट्रकार्याला, पटला बाजीरावाला, शौर्याची पारख होती
त्याला, त्यानं शांत करून मल्हारीला, वीस हजार रुपये तैनात
रोख दिली त्याला ॥ :—

|| मल्हारराव होळकर ||

|| चौक २ रा ||

चा.क्र. ६ करावं - ९) पराक्रम करण्या आला मल्हारी तय्यार, घेऊन पंचवीस घोडस्वार,
झाला खासा शिलेदार, कदम बांडे यांच्या पथकांत, पथकांत हो,
शौर्याची भारी चिंता ॥

तोंच खंडणी वसुली साठी पेशवा बाळाजी, घेऊन वीर रणगाजी,
माळवा प्रांती जाई राजी, तेव्हां कदम बांडे संगती, संगती हो,
होता मल्हारराव ही त्यावतीं ॥

चा.क्र. १) वीर पुत्र छावा बाजीराव, होता पिसाळला, तेव्हां जाणावं, शिस्त
फार कडक होती त्याची, एकाची गोष्ट जवळाईची, मल्हारीच्या
थोर धाडसाची ॥

पेशव्यांची आज्ञा होती सक्त, करुं नये मस्ती, प्रजा मार्गांत,
रयतेचे करुं नये नुकसान, परी एके दिवशीं ये प्रसंग महान,
ऊपास मारी आली घोड्यांना जाण ॥

चा.क्र. २) मल्हार रावानं तेव्हां, शेतांतला जोंधळा कापून ॥
घोड्यांना घातली वैरण, हे कळले बाजीरावा जाण ॥
ऊसळल्या तरुण रक्ताचा, खवळला फार क्रोधानं ॥
त्यांतील एका शिलेदारा, काठीनं करी ताडण ॥
भडकला वीर मल्हारराव त्यादिनीं ॥

चा.क्र. ३) बोलला बाजीरावास तेव्हां गर्जुनी ॥
"काय आम्हांला खायाला घालून दमलास होय? काठीनं मारतोस?"
एक ठोकळ मारला फेकून त्यानं जोराजी" ॥
हाहाःकार झाला पेशवा गेला क्रुध्द होऊनी ॥

चा.क्र. ४) लगार परी तेव्हां खवळून बैसला, आणि गुप्त बेत ठरविला, घेतो कुटून
या मल्हारीला (धनगराला), हे कळतां कदम बांड्याला, भेटला तो
बाजीरावाला, समजाऊन सांगितलं त्याला, "धनी, जरा विचार
करा चित्ताला, ज्यानं ठोकळ मारला तुम्हांला, तो काय तुमच्याशी भूला,
सोडील सांगावं मला, म्हणून करा माफ आजीं त्याला, आणि लावा
राष्ट्रकार्याला, पटला बाजीरावाला, शौर्याची पारख होती
त्याला, त्यानं शांत करुन मल्हारीला, वीस हजार रुपये तैनात
सुरु दिली त्याला ॥ :-

॥ मल्हारराव होळकर ॥

॥ चौक २ रा ॥

चा.क्र. ६ कटाव-१) पराक्रम करण्या झाला मल्हारी तय्यार, घेऊन पंचवीस घोडस्वार,
झाला खासा शिलेदार, कदम बांडे यांच्या पथकांत, पथकांत हा,
शौर्याची आस चित्तांत ॥
तोंच खंडणी वसुलीसाठीं पेशवा बाळाजी, घेऊन वीर रणगाजी,
माळवा प्रांती जाई राजी, तेव्हां कदम बांडे संगती, संगती हा,
होता मल्हारराव ही त्या वेळीं ॥

चा.क्र. १) वीर पुत्र छावा बाजीराव, होता पित्यासह, तेव्हां जाणावं, शिस्त
फार कडक होती त्याची, एकाची गोष्ट नवलाईची, मल्हारीच्या
थोर धाडसाची ॥
पेशव्यांची आज्ञा होती सक्त, करूं नये त्रस्त, प्रजा मार्गांत,
रयतेचं करूं नये नुकसान, परी एके दिवशीं ये प्रसंग महान,
उपासमारी आली घोड्यांना जाण ॥

चा.क्र. २) मल्हार रावानं तेव्हां, शेतांतला जोंधळा कापून ॥
घोड्यांना घातली वैरण, हे कळले बाजीरावा जाण ॥
उसळल्या तरुण रक्ताचा, खवळला फार क्रोधानं ॥
त्यांतील एका शिलेदारा, काठीनं करी ताडण ॥

चा.क्र. ३) भडकला वीर मल्हारराव त्यादिनीं ॥
बोलला बाजीरावास तेव्हां गर्जूनी ॥
"काय आम्हांला खायाला घालून दमलास होय? काठीनं मारतोस?"
एक ठेवून मारला फेकून त्यानं जोराजी" ॥
हाहाःकार झाला पेशवा गेला क्रुद्ध होऊनी ॥

चा.क्र. ४) कटाव परी तेव्हां स्वस्थ बैसला, आणि गुप्त बेत ठरविला, घेतो सूडून
या मल्हारीला (धनगराला), हे कळतां कदम बांड्याला, भेटला तो
बाजीरावाला, समजाऊन सांगितलं त्याला, पंतजी, जरा विचार
करा चित्ताला, ज्यानं ठेवून मारला तुम्हांला, तो काय तुमच्या शत्रूला,
सोडील सांगावं मला, म्हणून करा माफ आजी त्याला, आणि लावा
राष्ट्रकार्याला, मनी पटला बाजीरावाला, शौर्याची पारख होती
त्याला, त्यानं शांत करून मल्हारीला, वीस हजार रुपये तैनात
रोख दिली त्याला ॥ :-

॥ मल्हारराव होळकर ॥

चा.क्र. ८) डोंगरी
जरी केलं असं साफ दिल, परी तो जाळ, मल्हारराव क्रुद्ध
अंतरास, दावतो म्हणे हिसका माझा पेशव्यास, स्वारीवरनं परत
येतांना त्यास, पेशव्यांचा मुक्काम होता कोल्हापुरास, दावी तिथं
हात मल्हारी त्यास, ऐका तुम्ही दादा ॥

चा.क्र. ३)
ओढ्याच्या काठीं बाजीराव करितसे स्नान ॥
तोंच धरला मल्हारीनं त्याला चारीबाजूनं ॥
बोलला त्याच्या छातीस भाला लावून ॥
तवा मारला ठेचून आज भाला खुपसतो तीक्ष्ण ॥
काय करशील सांग मला जरी वीर तू महान ॥
कौतुक वाटले वीराचे बाजीला छान ॥
म्हणे "शाब्बास वीरा, तूं धन्य माता तव जाण ॥

चा.क्र.४) लगट
तूं जरी लाविला भाला, परि पुरता विचार ना केला, तलवार माझीही
तुला, दाखवली असती याक्षणीं, "पण जाऊं दे", चल सोड व्यर्थ
क्रोधाला, ये बैस करूं मौज जाला, मल्हारी शांत तवा झाला,
तवापासून पेशव्यानीं त्यास भाऊ मानिला ॥ याचा दाखला
घ्यावा ध्यानाला, म्हणत होती पेशव्यांची मुलं काका मल्हाररावला ॥

चा.क्र. ९)
मल्हारीचे पाहूनीया धैर्य, अतुल ते शौर्य, कराया कार्य,
पेशवा धरी तयास हातीं, दिली मग जहागिरी पुढती,
सतराशें वीस सालांत तीं (१७२०) ॥२॥

॥ चौक ३ रा ॥

चा.क्र ७ / केदीक - १)
बादशाहीचा जुलूम भयंकर झाला उत्तर हिंदुस्थानांत ।
जिझिया करानें नासून गेले तेथील सारे रजपूत ॥
बादशाहीला धक्का द्यावया सिध्द जाहला झणीं खास ।
राणा सवाई जयसिंग जयपुरचा जमवुनी साऱ्या सैन्यास ॥
मदत घ्यावी मराठ्यांची याकामी म्हणून भेटण्या मल्हाररावांस ।
धाडून दिला चौधरी इंदूरचा नंदलाल मंडलोई समयांस ॥
नष्ट करावा जर माळवा प्रांतीचा सुभेदार दयाबहादूर ।
साह्य करूं आम्ही सारे आपणा सांगा आपुला विचार ॥

चा.क्र. ९
चाळीस हजार पठाण, वीस हजार महान, पायदळ जाण,
घेऊन जो आहे बंदोबस्तात, आहे माळव्यांत पूर्ण निर्धास्त,
दाऊया त्यास एकदा हात ॥

॥ मल्हारराव होळकर ॥

चा.क्र. १) चालून संधी ये अशी । मल्हार रावासी । म्हणुनिया त्यांसी ।
साथ देण्याला झाला तय्यार । पेशवे वीर मराठे सरदार ।
चालला पेशवा वीर सरदार ॥

चा.क्र. २) चालले माळवा प्रांती । संगे फौज बारा हजार ॥
मल्हारराव होळकर । राणोजी शिंदा जरवीर ॥
आणि तुकोजीराव पवार । तसाच जिवाजी मोठा हुशार ॥
तोंच नंदलाल मंडलोई । भेटला त्या मार्गावर ॥

चा.क्र. ३) बोलला मल्हारराव तेव्हा नंदलालास ॥
एकदम माळवा प्रांती प्रवेश करण्यास ॥
निराळाच मार्ग जर दावाल आम्हां येण्यास ॥
तर दावण्या हात बरं हुरळल त्या दयाबहाद्दरास ॥

चा.क्र. ८ दांगटी) यापरी विचार होऊन । चालले जलदीनं । पण वार्ता ही लागली दयाबहाद्दरास । मराठा येताय माळवा प्रांतास । म्हणुनिया मार्ग रोखून धरण्यास । चालला जाऊन बसला समयास । गुप्त बेत कळला नव्हता पठाण्यांस । फुलशी वीर मल्हारराव स्वारास । भेटला पठाण्या सुभेदारास । ऐका तुम्ही दादा ॥

चा.क्र. ४ लावट) घाटांतून मार्ग बीकट । काढून नंदलाल सकट । वीर मराठा चढला तो घाट । घेऊन फौज आटोकाट । एकदम माळवा प्रांतात । आले धारे जवळ निश्चित । अर्ध्या कोसावर दयाबहाद्दर पडला निश्चिंत ॥ उन्हाळ्याचे दिवस ते खरं । मल्हारराव करी वीचार । ऐषआरामी पठाण हे सारं । घालू छापा भर उन्हांतच गाजवू मल्हार ॥

चा.क्र. ६ कटाव — ३) ऐषआरामी सारे पठाण । भांग गांजा अन दारू पिऊन । पडले होते गुंगीतच जाण । अफू माजूम मस्त होऊन । ऊमा होतपार कपडे काढून । हत्यारं सगळी म्यान करून । तोंच अचानक मल्हाररावानं । छापा घातला फार जोरानं । सपासपा त्या मार देऊन । कैक पाडले त्यांनाच त्यानं । जागे झाले यवन पाहती उठून । वार झाले किती पडले मरून । तोबा तोबा या म्हणती अल्ला । कैसा गनिम ये रे बिसमिल्ला । दौडो दौडो अब हो करबल्ला । झाली धांवपळ । मल्हाररावानं साधली वेळ ॥

चा.क्र. ४ लावट) करुनिया अशी धुळधाणी । निजलेल्यास तसेंच निजवुनी । बसलेल्यास तिथेच बसवुनी । कडव्यासारखे काढले कापुनी । हर महादेव गर्जुनी । तोफखाना हस्तगत केला झडप घालुनी ॥

॥ मल्हारराव होळकर ॥

चा.क्र. १) तों स्वतः दयाबहाद्दर, चार हजार, पठाण घोडस्वार, घेऊन लढण्यास झाला तय्यार, भिडला तंवा त्यांसी राव मल्हार, चालवी जशी वीज तशी तलवार ॥

चा.क्र. ४ (छगर) तीन हजार फौज घेऊन, होळकर मल्हाररावानं, गांठले सुभेदारांत्यानं, हत्तीवरच मारला ठार दयाबहाद्दरजाण ॥

चा.क्र. ३) आनंदी झाला पेशवा तसेंच छत्रपती ॥
म्हणे हाच पुरुष योग्य ठेवा माळवा प्रांतीं ॥
बंदोबस्तास देऊनिया शिंदे, पवार संगतीं ॥
माळव्याचा सुभेदार केले त्यांस निश्चिती ॥

चा.क्र. ४ (छगर) म्हणून आला स्थाईक इंदूरास, राणोजी शिंदा उज्जयनीस, अन् तुकोजी पवार देवासास, तवांपासून तिघांचा स्नेह आहे तोरवास ॥ तो तसाच कायम राहीला, पुढें तिसऱ्या तुकोजी पवाराला, देवासचा सरंजाम दिला, देवी अहिल्याबाईनं भला, मिळवून दिला त्यावेळां, तो स्नेह आजही यावेळां, अत्यंत संगतो दाखवला, श्रीमंत यशवंतराव (होळकर) महाराज विद्यमान बोला ॥ एकोणीसशें बेचाळीसाला, जंवा गेले अमेरिकेला, तंवा इंदूरचा कारभार भला, मोठी पाती देवास विक्रमसिंह महाराजानां दिला. ॥(शिंदे, देवासकरांचे मामा होत.)
[पुढें माधवराव शिंदे ग्वाल्हेरास गेले.]

चा.क्र. १) (तें भाग्य इंदूर नगरीचे, खरोखर त्यांचे, म्हणुनिया साचे, लाभले विक्रमसिंह होळकरांस, शाहीर करी प्रणाम दोन्हीं राजांस, ऐका आतां पुढील सारा इतिहास ॥ ३ ॥

---

॥ चौक ४ था ॥

चा.क्र. ६ कराव-२) उत्तर हिंदुस्थानीं करण्या मुलूखगिरी, पेशवा राघोभरारी, काढीतसे जंगी स्वारी, संगे होळकर मल्हारी, जयाप्पा शिंदे रणधीर, तुकोजी अन् जिवाजी पवार, यशवंतराव जहागीरदार ॥
खंडण्या केल्या वसूल साऱ्या दहशत बसवून, कुठें मित्रत्व जोडून, कुठें युध्दही करुन, परी कुंभेरीचा जाट राणा, पेशव्यांना मुळींच मानीना, खंडणी योग्य देईना ॥

चा.क्र. १) त्यामुळें चिडून दादांनीं, होळकर साह्यानीं, किल्ला वेढूनी, तोफांचा मारा केला घनदाट, हादरला नाहीं तरीही तो जाट, लढवी दिड महिना किल्ला आटोकाट ॥

चा.क्र. २) तोच मल्हाररावावर तेव्हां, दैवानं घातला घाला ॥
खंडेराव पुत्र एकुलता, रणांगणावरी ठार झाला ॥:-

चा.क्र. २) म्हणून घेऊन शस्त्रसंन्यास । मथुरेस निघुनिया गेला ॥
उत्तरकार्य करण्या पुत्राचे । मोहरा इरेला पडला ॥

चा.क्र. ३) आली वार्ता इथून चाळीस पन्नास कोसांवर ॥
बादशाही फौजेचा मुक्काम आहे खरोखर ॥
मल्हारी म्हणे चला गाजवूं एकदां मल्हार ॥
गेला धाऊन चाळीस हज्जार घेऊन दळभार ॥
अचानकच पहाटे छापा घातला घनघोर ॥

चा.क्र. ५ कटाव-३) आधींच जात चैनी ती यवनांची, तशांत वेळ ती साखर झोपेची,
थंडी गुलाबी झुळुक वाऱ्याची। त्यांत स्वारी मल्हाररावाची ।
अवचित पहा त्यांठायीं पोचलीं, बाजार बुणग्यावर तुटून पडली,
बाणांची बहु वृष्टी केली, खाशा तंबूला आग लागली, त्यांतच कोणीं
बातमी दिली, आला मल्हारी पळा भडली, शत्रूला पहा घाई
झाली, कैक जणांची बोबडी वळली, बायकां पोरं टाकून पळाली,
खुद्द सेनानी बहुतची भ्याला, बेगम सोडूनी पळूनीच गेला,
मल्काजमानी नांव तियेला, पेंढाऱ्यां हातीं, गवसली पहा त्यावक्तीं ॥

चा.क्र. १) सौंदर्यरूप यौवनीं, त्यांत मुसलमानीं, मल्काजमानी, गवसली पेंढाऱ्यांच्या
हातीं, नीचानीं छळले तिजला अती, धरुनिया द्रव्य आसचिनीं ॥

चा.क्र. ३) दुष्टानीं तियेला केली पुरती नग्न ॥
योनीचाही आढा घेतला, न लागतां क्षण ॥
ओरडून म्हणे ती आवो मेरे मल्हार भगवान ॥
तूं कहां है बेटा इस वख्त बुरा आया दीन ॥
असं कळतां मल्हारराव आला लाल रागानं ॥
त्वेषानं गेला धाऊन मोठ्या वेगानं ॥
सोडविलें आणीं पेंढाऱ्यांचे हात कलम करून ॥

चा.क्र. लगट ४) द्रौपदीची लज्जा राखण्याला, जसा कृष्ण धाऊनी गेला, तसा तिच्या
जवळ पोंचला, पाहतांच वीर मल्हारी दिङ्मूढ झाला ॥
कमरेचा शेला तिच्या अंगावरतीं फेकला ॥ बाईचा गळा दाटला,
प्रेमाश्रू आले नयनांला, बोलली मल्हाररावांला,
["बेटा! तूं होते हुवे भी मुझपर ऐसा गजब न होना चाहिये था",
लेकिन! खुदाका गजब हो! तों तूं क्या करेगा?]
मल्हाररावानं केलं सांत्वन, बहु मोल वस्त्रं देऊन, माता म्हणून
केलं वंदन, पतीकडे धाडली तिजला इतमामानं ॥ धन्य वीर
मल्हारराव होळकर नव्हता सामान्य ॥ :-

चा.क्र. १) कौरव सेनापती भीष्माचार्य किंवा तो शिव छत्रपती ।
कल्याणीला माता मानी जो धन्य धन्य तो शिवनृपती ॥
फिरंगी सुंदरीस बहीण मानुनी चिमाजीआप्पा देई साडीचोळी ।
तसाच वीर मल्हारराव होळकर मानवता धर्म पाळीं ॥
मोहीमेत या बेगमेची एक रत्नांची फणी सांपडली ।
ऐका तिची किम्मत पहा ती दोन लाख रुपये आली ॥

चा.क्र. १) मल्हार खरा मल्हार, ईश अवतार, जाणा खरोखर, जिंकणे
कठीण काम विकार । जिंकला या मल्हारीनें साधार ।
म्हणून तो देवाहून थोर ॥ ४ ॥

---

॥ चौक ८ वा ॥

चा.क्र. ८) अबदालीनंस्वारी केली पहा हिंदुस्तानावर । म्हणून सदाशिवराव
पेशवा निघाला घ्यावया खबर । पानीपतच्या रणीं संग्रामजाहला घोर ।
संगें मल्हारराव होळकर । जनकोजी शिंदे रण धीर । कृष्णाजी पवार ॥
इब्राहिमखान गारदी होता तोफखान्यावर । सरदार विठ्ठल शिवदेव
विंचूरकर । तसा समशेर बहाद्दर यशवंतराव पवार । गाईकवाड
दमाजी रणशूर । पटवर्धनवीर । कितीक रणधीर ॥

चा.क्र. १) परी भिस्त सारी भाऊची । होळकरांवर त्याची । माहीतगार तोंची ।
पूर्ण या उत्तर हिंदुस्तानास । म्हणून भाऊ बोलला मल्हाररावांस ।
प्रसंग जर बाका आला कधीं खास ॥

चा.क्र. २) तर तुम्हीं बायका मंडळीं । घेऊन बंदोबस्तानं ॥
पोंचवावीं दक्षिण प्रांतीं । आमची भिस्त तुम्हावरीं महान ॥
सर्व धनांत श्रेष्ठ स्त्रीधन । म्हणून केलं पाहिजे रक्षण ॥
केला अंगिकार शब्दाचा । त्याक्षणीं मल्हाररावानं ॥

चा.क्र. ३) विश्वासराव न भाऊ अंबारीत बसले जाऊनी ॥
एकीकडे गारद्यांचा तोफखाना ठेऊनी ॥
चार बाजूस मराठे वीर गोल करुनी ॥
तुटून पडले अबदालीवरी पहा त्या क्षणीं ॥
केली शर्थ पराक्रमाची परी दुष्ट दैवानीं ॥
पडला बंद तोफखाना खान ठार झाला रणीं ॥
जनकोजी झाला घायाळ अती जखमानीं ॥
विश्वास स्वर्गीं गेला छातींत गोळी लागुनी ॥
भाऊ गुप्त झाला गर्दीत पहा त्या क्षणीं ॥ :-

॥ मल्हारराव होळकर ॥

चा.क्र. ३ ) यशवंतराव पवार पाठोपाठ गेला धारुजीं ॥
जाहला अमर खरोखर साऱ्या त्रिभुवनीं ॥

चा.क्र. ४ ) मल्हाररावानं प्रसंग ओळखून, पेशव्यांची आज्ञा मानून, सैन्याची
कोंडी करुन, पांचशें मराठा सैनिक घेऊन, साऱ्यां स्त्रियांना संरक्षण,
देऊन चालला मार्ग कापीत दिल्लीकडे जाण ॥ शत्रूची फळी फोडून
सुरवरुप आला दिल्लीत मोठ्या हिंमतीनं ॥ पांचवली बायकामंडळी
दक्षिणेत त्यानं ॥ मराठ्यांचा झाला विध्वंस, किती मोहरे मुकले
प्राणास, दोन मोतीं गळाली खास, गेलीं स्वर्गीं रत्नें सत्तावीस, कोण
मोजणार मोहरा न खुर्द्यांस तशा समयांस ॥ कांहीं जण वांचले त्यांत,
महादजी शिंदा प्रख्यात, सेनासपा सहस्त्री कृष्णाजी पवार हे ख्यात ॥

चा.क्र. ३ ) घ्यावया सूड पानिपतचा वांचले जे खास ॥
तें कसें सांगीन मी तुम्हां पुढील चौकास ॥
यापरी मल्हाररावानं कठीण समयांस ॥

चा.क्र. १ ) राखिली अब्रू मराठ्यांची, सर्व स्त्रियांची, तसेंच पेशव्यांची,
मल्हारीनं लढून घोर समरांस, दाऊनी रणीं क्षात्रबाण्यास,
म्हणुनिया वंद्य झाला सकलांस ॥ ५ ॥

x—o—o—o—x

॥ चौक २ रा ॥

चा.क्र. १ ) पानपती घोर अपयश, आलें मराठ्यांस, उगपण खास, लागला
जाणा क्षात्रतेजांस, काढला पुढें धुवून सर्वांनीं खास, ऐकावा
पुढील सारा इतिहास ॥
सतराशें बासष्ट साल, रक्षीस भुवनाला, सैन्यासह आला, निजाम
मराठ्यासीं सामना देण्यास, पेशवाही झाला तयार युद्धास,
घेऊनी संगें मल्हाररावास ॥

चा.क्र. २ ) राघोबासंग माधवराव, अठरा वर्षांचा कोवळा पोर ॥
दिसे जणूं छावा सिंहाचा, युद्धासी झाला आतूर ॥
त्यांत चीड होती पानिपतची, मनीं खुपे शल्य जोरदार ॥

चा.क्र. १ ) अंगराज पुत्र वृषसेन, कुरुक्षेत्रीं जाण, पडला तुटून, जसा त्यावनीं
कौरव सैन्यांत, तसेंच दोघे करण्या निजामासी हात, धांवले किती
वीर पाडले समरांत ॥

चा.क्र. लाट ४ ) तिरंदाजीत निष्णात भारी, राघोबादादा भरारी, निजामावर चाल
तो करी, निजामाचा दिवाण विठ्ठल सुंदर हो भारी ॥ लढवय्या
होता खरोखरी, गुंतले दोघं लढण्यांत घोर संगरीं ॥ तितक्यांत
पठाण स्वारानीं, मल्हाररावच्या फौजेवर झणीं, (५१) :—

॥ मल्हारराव होळकर ॥

चा.क्र. ४ लगट ) चढविला हल्ला त्यादिणीं, बेसावध फौज पाहुनी, मल्हाररावलढतसे धैर्य राखुनीं रणीं ॥ पठाणांचा जोर जाहला, दडपली छाती मराठ्यांची पहा त्यावेळां ॥ तशांत पठाणानीं घेरलें दादासाहेबाला ॥

पठाणांची उडवीत हबेलंडी, जरीपटका धरुनीया तोंडीं, हत्ती आला फोडूनिया कोंडी, माधवरावा जवळ उभा राहून अमूं सांडी ॥

जणूं बोले उठा! तुम्हीं धनीं, वय कोवळे लहान अजुनीं, पर आला बिकट प्रसंग यादिणीं, दादासाहेबांस घेरलें शत्रूनीं, असा इशारादेऊन गेला हत्ती निघून तत्क्षणीं ॥ मल्हारराव न माधवराव गेले खवळूनी ॥

चा.क्र. ३ )
धांवला माधवराव पेशवा कोवळा पोर ॥
अर्जुनाच्या भात्यांतून सुटलाजणूं काय तीर ॥
कीं बहिरी ससाणा घालीं झडप पाखरांवर ॥
जणूं झंझावात सुटला तो भयानक थोर ॥
साह्यास धांवला वीर राव मल्हार ॥
पडले तुटून पठाणावर गर्जुनिया हरहर ॥

चा.क्र. ४ लगट ) मल्हारराव बेभान झाला, पानपतचे शल्य हृदयाला, प्राणाची पर्वा नच त्याला, फेकींत लोंब तो भाला, घुसवीत केक हृदयांला, पाडीतो धरणीवर रणीं नाचूं लागला ॥ वीरा शीं वीर भिडताती, शत्रूला धडक मारिती, क्रूर सिंहापरी गर्जती, खणखणाट तलवारीचे होती, पोंचले येऊन दादासाहेबांजवळ निश्चिती ॥ मांडीली रण धुमाळी, आवाजानं बसली कानठीळी, पठाणांची फोडली फळी, पसरली फौज रानोमाळी, अशी दावली त्यानं पठाणांना फिरकी होळकरीं, आधी मुक्त केला राघोबा पेशवा झडकरी ॥

चा.क्र. ८ दांगी ) मग मोठी करुनिया त्वरा, घातला घेरा, निजामाच्या हत्तीस त्रिवर्गानीं, अंबारीच्या दोऱ्या काढल्या कापुनी, होंघाला हात घातला क्षणीं, घाबरला निजाम आपल्या मनीं, ठार म्हणें मारणार यादिणीं, खबारखाज्यांत बसला दडूनी, हो भ्याड तो दादा ॥

चा.क्र. ४ लगट ) चटकन मान हलवून, म्हणे आलो आतां शरण, सुभेदार मल्हारराव द्यावं मला जीवदान ॥

चा.क्र. १ ) घेतला पानिपतचा सूड, असा बिनतोड, देऊनी उधड, लढाई थोर राधरा भुवनास, हाच हेतू त्यांच्याजगण्याचाखास, वंद्य आला वीर सर्वे जगतांस ॥ ५ ॥

॥ मल्हार [illegible] ॥

—०— ॥ अंक ३ रा ॥ —०—

चा. क्र. १ व्यापाराचा करून बहाणा, इंग्रजांनी जाणा, दाविला बाणा,
सुपारीला तागडीचा कांटा, जमवुनी अमीत फौजफांटा,
मराठेशाहीस दिला धक्का मोठा ॥

पसरुनी हळूहळू पाय, घेऊनी सहाय्य, केलं असहाय,
माजवून दुही आम्हां लोकांत, फोडा अन् झोडा युक्तीलढवुनी त्यांत,
घातला हात अयोध्या प्रांतात ॥

सुजा उद्दौला नबाब अयोध्येचा, पराक्रमी साचा, मुत्सद्दी डोक्याचा,
परी इंग्रजापुढं नमला, मागतो मदत मल्हाररावाला,
घालवूं म्हणे आधीं या परक्याला ॥

चा. क्र. ३ ) राक्षसभुवनास आपण निजामाला बडवला जसा ॥
इंग्रजानांही दावचुया हात आपण तसा ॥
आपसांतील तंटे नंतर उकरीत बसा ॥
परसत्ता पोराबाळांना लावील वसवसा ॥
तुम्हीं हिंदू आम्हीं मुस्लीम भेद तो कसा ॥
एकाच खुदाची लेकरं असतानां सहसा ॥

चा. क्र. २ ) एक लाख रुपये मी देतो, जंवा तिथनं कूच कराल ॥
नंतर पन्नास हजार, जंवा विजयश्री वराल ॥
मल्हारराव ठरवुनी बेत, बोलला काय दिवाणास ॥
गंगाधर यशवंत जाणा, विसोबा लांब हा त्यास ॥

चा. क्र. लाट ४ ) चला देऊं साथ नबाबाला, घालवूं टोपीवाल्याला, हा परका येथं
घुसला, कांट्यापरी खोल रुजला, पुढं जड होईल आपणांला,
असा विचार करून मल्हारराव वेगं चालला ॥

चा. क्र. १२ गिलच्याची ) ती बाजूला तीन तुकड्या त्यानं तेव्हां धाडिल्यां ॥
चौथ्या बाजूनं स्वत: इंग्रजी पलटणी त्या वेढील्या ॥
"जय भवानी जय मल्हार" गाजवून त्यानं गोळ्या झाडील्या ॥
"येळकोट येळकोट जय मल्हार" म्हणून तोफा डागल्या ॥
मारा बाणांचा करून इंग्रजी टोप्या कितीक उडविल्या ॥
सात गोऱ्यां पलटणीं सरीसा मराठ्यांनीं कापून काढल्या ॥

चा. क्र. लाट ४ ) चौदाशें गोरे पकडून, बंदुकींचे भारे बांधून, त्यांच्या डोक्यावरती
चढवून, वाजवीत शिंगं शहाजणं, छावणींत आणलं त्यानं, निर्धास्त
मनीं राहून, विजयांत धुंद होऊन, रात्रीला करी आराम सैन्यांसह
जाण ॥

|| मल्हारराव होळकर ||

चा. क्र. ८३ कराव ) गाढ ओयंमधीं सेना मराठी, पाडून गोऱ्यांनीं केली छाती, तोफांचा
बहू मारा करिती, बंदूक गोळ्यां वर्षल्या अती, वीर मराठे गेले
भांबावुनी, डोकें चोळीत उठले खडबडूनी, तोंच पटापट गोळ्यां
लागूनी, आण सोडूनी पडती धरणीं, कोणी म्हणती पाजा पाणीं,
पळूं लागले कांहीं त्यांतूनी, आली मराठ्याची अशी धुळधाणीं,
मल्हाररावानं धैर्य राखुनी, फौजेसह मग कूच करोनी, पोंचला
आग्रावरी येऊनी, यमुनेकांठीं, टाकली छावणीं मोठीं ||

चा. क्र. १४ पाळण्याची ) कसा प्रसंग हा आला उलटा आजी, पुढें धांवे बहिरी ससाणा ||
त्या मागें हो लागे, चिमणी लहान, कशी करणी देवाची पहाना ||
राजहंसाच्या मागें लागे बगळा, किती पळे लध्यानीं आणा ||

चाल ) || भक्षितो हंस तो मोतीं || पहा बगळे ते निश्चितो ||
|| नरकाची चुवळणी करतो ||

चा. क्र. १४ पाळण्याची ) गवसेल कसा मल्हारी हात्याला, "मल्हारी" प्रसन्न जयाला ||

चा. क्र. ४ लगट ) मल्हारराव यमुना तीराला, आला तंवा पूर होता यमुनेला, दोथडीं
प्रवाह चालला, नव्हता उतार मुळींच त्यास पैलथडीं जायाला ||
सारी फौज उभी जाग्याला, अजूं तरी पाठीवर आला, यमुना
उतरून जाण्याखेरीज मार्गनच उरला || मल्हाररावानं पुढें
होऊन, यमुनेची पुजा करून, चोळी बांगडी केली अर्पण,
ओटी भरली खणा नारळानं, "जय यमुना माई जय मल्हार" असं गर्जून ||
फौजेला संग घेऊन, घातला घोडा पाण्यांमधें त्यानं, आश्चर्य
घ्यावं ऐकून, पाणी लागलं कंबरे एवढंच गेला पलीकडे त्यातनं ||
इतक्यांत टोपीकर आला, त्यानं पाहिलं मल्हारी पाण्यातून
पल्याड गेलेला || म्हणून हुकूम दिला सैन्याला, आन् स्वतः
घोडा पाण्यांत घातला, तंवा पाणी जास्त होतं बोला, नाकां
तोंडांत जाऊन कैक घोडा वाहूनी गेला || होडीसारख्या टोप्या
पाण्यावरतं तरंगू लागल्या || तंवा त्यांतल्या मुख्य सायबानं,
डोईची टोपी काढून, मल्हारीला सलाम करून, काय बोलला
ऐका घा ध्यान || "मल्हारी ईज जो मॅन ही ईज दी गॉड ||

चा. क्र. १ ) मथुरेहून कृष्ण गोकुळास, न्यायच्या वक्तास, वसुदेवास,
भांग जरीं दिधली यमुना नदीनं, इथंही तरी दिली हो
यमुनेनं, धन्य मल्हारराव तुम्हीं धन्य || ७ ||

॥ मल्हारराव होळकर ॥

॥ चौक ८ वा ॥

चा. क्र. १ ) मिळविले अपूर्व यश, मोहीमेत खास, परी वसईस, आणि
जाटांच्या करवटीं, मिटविल्या करुन आटाआटी, तंवर झाली
कानांत व्याधी मोठी ॥
एक सारखा ठणका घातला, त्रास जीवाला, वृध्द वयाला,
सहन होईना, म्हणून विसाव्यास, येऊन राहीला आलमपुर्यांस,
जीवाची नव्हती शाश्वती त्यास ॥

चा. क्र. २ ) बिघडतां प्रकृती फार, जाणिले त्यानीं चित्तांत ॥
संपला आपुला डेर, विझणार आतां प्राणज्योत ॥
मरणाची भीती नव्हती, होती एक जिवाला तात ॥

चा. क्र. ६ कटाव- ५ ) काशीस असतां स्वारीवर, तेथील प्रकार, पाहुनी घोर, चीड
यवनांची, यवनांची, आला फार, गोष्ट ती सत्य सांगतो याची ॥
काशीविश्वेश्वराचे देऊळ, पाडून बिनमोल, करुन जाळपोळ, दुष्ट
यवनानीं, यवनानीं, बांधीली मशीद याठायीं ध्यावं होईयानीं ॥
म्हणें मीही मशीद पाडीन, देऊळ बांधीन, पुन्हां स्थापीन, काशी
विश्वेश्वर, विश्वेश्वर, जाणावा खरा धर्मात्मा मल्हारराव थोर ॥

चा. क्र. १ ) तिथले ब्राम्हण म्हणती सुभेदार, बोलला साधार, तुम्हीं साचार,
मशीद पाडून देऊळ बांधाल, त्यांत मात्र आमचे मरण आणाल,
धनीं, वांचवा आमुचे हाल ॥

चाल क्र. ३ ) तुम्हीं जाल दख्खनला आम्हीं इथेंच रहाणार ॥
भोंवतीं यावनीं सत्ता आली शिरजोर ॥
ऐकतां मल्हाररावानें जाणीलें सारं ॥
पुढें कधींतरी पाहीन याचा विचार ॥

चा. क्र. ४ लगट ) परी हेतु पुरा नाहीं आला, म्हणुनीया होती यातना अंतरीं त्याला ॥

चा. क्र. १७ ) याशिवाय दुःख जिवाला, मम पुत्र जसे खंडेराया ॥
कां लिहिला नशिबी माझ्या, पुत्रशोक खंडेराया ॥

चाल अंतरा ) ॥ असं म्हणून मोलरावाला ॥ तुकोजीच्या हातीं दिला ॥

श्रीराम (राम) मुखानें वदून, वीरानं सोडीला प्राण ॥

चा. क्र. २ ) दादासाहेब म्हणती भीष्माचार्य आमुचा गेला ॥
हंबरडा फोडीला देवी अहिल्येनं मोठा ॥
या विधवा दीन अबलेला सोडून कां गेला ॥ (पुढे)

॥ सुभेदार मल्हारराव होळकर ॥

चा.क्र. २४ ) कान्येरम मज पाळून धरियेले पोटाशीं आपण ।
आज दियेलं तुम्हींच सर्व शिक्षण ॥
पती दुःखां विसरले मी ताता, तुम्हांकडे पाहून ।
तुम्हीं ही आजीं केलें स्वर्गारोहण ॥

चाल अंतरा ) ॥ हा बाळ किती पहा सान ॥ हे राज्य सांभाळील कोण ॥
॥ मी विधवा स्त्री, अन तरुण ॥

चा.क्र. १४ ) मग तुकोजीनें केलें त्यांचे सांत्वन ।
म्हणे आवरा शोक दारुण ॥

चा.क्र. ४ लगट ) मग बोलले तुकोजी वचन, काकांच्या आदेशप्रमाणें, मालेरावचं करीन पालन, ही राज्यधुरा सांभाळून, होळकरांची कीर्ती वाढवीन, एकनिष्ठ सेवा करून, त्या वीर तुकोजीरावानं, पाळिलें पितृवचन, पुढें कधीं त्याचा इतिहास तुम्हां सांगीन ॥

चा.क्र. ७ भेदीक - २ ) वंशज नांदती पहा इंदुरास आजही तुकोजींचे ।
दानशूर महाराज तुकोजीराव नांव त्यांचे ॥
गादीवरी पहा राजे यशवंतराव तरुण रक्ताचे ।
सत्य निष्ठ प्रजापालन करती योग्यची रयतेचें ॥

चा.क्र. ३ ) धन्य होळकर मल्हार राव, भीष्म जाणावें, शौर्य अभिनव, नीती धर्माचा पुतळा तो खास, धन्य इंदूर राज्य समयांस, तयाचा लाभो नित्य सहवास ॥
कवी-गणेश राष्ट्र शाहीर, शाहीर दरबार, राज्य सिनिअर, पवार वीरांचे जाणा देवास, तसाच राज्य शाहीर सांडूरास, शाहीरी मुजरा करतो सकलांस ॥ ८ ॥

ग.द. दीक्षित चिंचणीकर

शुक्रवार दि. २।१२।८३. १२।१२८१ जय गांधी भवन सदाशिव पुणे ३०

॥ पोवाडा - श्रीमंत स्वर्गीय खासेराव पवार महाराज राज्य देवास ज्युनिअर ॥ कवी :- देवास दरबार शाहीर ग. द. दीक्षित व घाटे गुरुजी ॥ भाग १ ला ॥ मु. श्रीराममंदीर मुरबाड

चा. क्र. १ ) छत्रपती शिवाजी महाराज, कराया काज, अवतरला साज,
नांव सदाशिवराव परमार, छोटी पाती देवास राज्य छानदार,
तयांचे चरित आज गाणार ॥ धृ० ॥

चा. क्र. ५ ) भारती गाजली जोडी नर नारायणाची, नारायण साक्षि ती
मूर्ती विठोबारायाची, महाभक्ता पुंडलिका साठीं पंढरपुराची,
निशस्त्र प्रतीकाराची, योजना भक्ताची, साधली त्यांची ॥
परी नाहीं पसंत पडली रीत ती नर यांस, म्हणे सशस्त्र प्रतीकारच
देईल यश, ऐकतां हंसून बोलले नारायण त्यास, मृत्युलोकीं जन्म
घेऊन, यत्न करून, पहावें खास ॥

चा. क्र. १ ) मग विष्णू आले शहाजी, नर संभाजी, वडील पुत्र गाजी, आले
महादेव शिवाजी खास, संभाजी न. शहाजीनं त्या वक्तास,
सशस्त्र प्रतिकार केला सरास ॥

चा. क्र. २ ) परी जाणा कर्नाटक प्रांतीं, संभाजीस खान अफझूल ॥
करी ठार विश्वासघातानं, तेंवा पटले तयाला बोल ॥
तय्यारी पूर्ण जनतेची, आणि शस्त्रास्त्रांची होईल ॥
तवहें लरव मोलाचे, जपले तर यश येईल ॥

चा. क्र. ३ ) म्हणूनीच करी शिवराय सशस्त्र प्रतिकार ॥
तेंवा त्याला गांठतां आले यशाचे शिखर ॥
त्याला मदत करती जे त्यांत मुख्य परमार ॥
ऐकावें तयाचे नांव आबू सिंग पवार ॥
कालिकामातेचा होता जयाला वर ॥
तव कुलीं छत्रपती शिवाजी घेईल अवतार ॥
म्हणतील त्यांस भारत धर्मरत्न पवार ॥

चा. क्र. ४ काट ) पुढें ऐका प्रकार काय आला, सोळाशें ऐंशीं सालाला, छत्रपती
गेले कैलासाला, आत्मा शिवस्वरुपी झाला, ध्यानस्थ बसले
त्यावेळां, अवतार घेण्याचा विसर पडला चित्ताला ॥
म्हणून भवानी आदिमातेनं, भंग करणें शंकराचें ध्यान, जोरानं
चालविला यत्न, पण समाधी उतरायचं कांहींच दिसेना चिन्ह ॥
केला धांवा तिनं विष्णुचा, त्यापरिस ब्रम्हदेवाचा, दोघेही धांवले
जाणून प्रसंग महत्वाचा ॥ (पुढे) :-

॥ [illegible] ॥

(लगट) मग मोठ्या खुशी बतीनं, आले भंग शंकराचें ध्यान, मग बोलले विष्णू भगवान, देवा अवतार घेण्याचा समय आता आलाछान ॥
शंकर बोलती सर्वांला, वारंवार जन्माचा भला, कंटाळा आलाय आम्हांला, यापुढें नाहीं घेणार मी अवताराला ॥

चा.क्र. ८ दांगटी) त्याठाणीं ब्रम्हदेव भेले, पुढें जाहले, काय बोलले, देवा! असंम्हणून नाहीं चालणार, अवतार घेणें भाग आम्हीं पाडणार, कारण, जंवा झाला राम अवतार, तंवाच आहे ठरला आपुला विचार, भरताचे प्रेम खरें आनिवार, म्हणून पुन्हां घेईन जंवा अवतार, भरतालाच मोठेपणा देणार, सृष्टी निरिक्षण करून कारभार, करण्याचें ठरलें म्हणून साचार, नर, नारायण आधींच साधार, धाडले मृत्यूलोकीं घेण्या अवतार, मान्य करा देवा ॥

चा.क्र. ४ लगट) मग आले शंकराचे ध्यानीं, म्हणे ठीक आहे जा तुम्हीं निघून येथूनीं ॥
आपआपल्या कामाला चला, मी घेईन अवताराला, कसे झाले अवतार ऐका सांगतो तुम्हांला ॥

चा.क्र. २४) विष्णू हैबतराव पोटीं तो नारायणराव, भरत तो जाणा जिवाजीराव ॥
त्यांचे पोटीं शिव बंधू संभाजी मल्हारराव, शंकर जाणा सदाशीव ॥
जगदंबा जी पार्वती माता घेऊन तेंच नांव, बरजसपती सदाशिव ॥
कार्तिक स्वामी पुत्र जन्मले ते यशवतराव, मोहिनीरूप कोण पहावं ॥
घेऊन जन्मा आली कन्या अलकनंदा नांव, बाईसाहेबमहाराज जाणावं ॥

चा.क्र. ८ दांगटी) ऐका याचं स्पष्ट कारण, मोहिनी रूपानं, विष्णूनी केला भस्मासूर ठार, आनंद तंवा झाला शंकरासीफार, अपत्यप्रेम दाटलें थ्यार, म्हणून आली त्यांच्याच उदरीं साचार, अलकनंदा नांव साक्ष देणार, स्त्रीचे कारण मोहिनीरूप असणार, करते पण खरा पुरुषी कारभार, कारण मूळ विष्णूरूप साधार, विचार करा दादा ॥

चा.क्र. ९) जंवा मोहिनीरूप घेऊन, विष्णू भगवान, चालले जाण, सत्यभामाही संगें येणार, तींच इंदिराराजे दिलदार, शाहीर दीक्षित कवन करणार ॥ ९ ॥

चा. क्र. १ ) इसवी सन अठराशें सत्यांऐंशी, श्रावण महिन्यासी, वद्य नवमीसी, झाला सदाशिव अवतार, वडील बंधू मल्हारराव साधार, चालत आले बंधुप्रेम पूर्वापार ॥

चा. क्र. ६ फराव - १/२ ) व्हिक्टोरीया हायस्कूलांत माध्यमिक शिक्षण, व्ही, व्हीक्टरी जाण, बोल सत्य करून, पुढें इंदूर डेली कॉलेजात, मग अजमीर मेयो कॉलेजात, डेहराडून मिलिटरी कॉलेजात ॥

विजयी झाले महाराज सदाशिवराव, पुढें आला तो विवाह, मारली पार्वतीनें धांव, घेऊन जन्म आंग्रे घराण्यांत, शेवटच्या पुरुषाची ही नात, एकोणिसशें तीन सालांत ॥

चा. क्र. १ ) आले देव इथं जन्मून, कळतां असें जाण, दैत्यही महान, राहू, केतू शनी जन्म घेऊन, आले छळण्यास पहा धांऊन, कारण त्याचे सांगतो घ्यावं ऐकून ॥

चा. क्र. २ ) विष्णूनें मोहिनी रूपांत । राहू केतूचे उडविले शीर ॥
म्हणून केतू मोहिनी रूपें । देवासला घेई अवतार ॥
ऐका नांव प्रभावतीबाई । राहू गोविंदराव मैसूरकर ॥

चा. क्र. ४ लगट ) याचे कारण चंद्राला गिळण्यास, तो अटे पहा रात्रं दिस, शंकराचें भाळीं त्याचा वास, शंकर आले देवासास, सहजची चंद्र आला खास, चंद्राला गिळून टाकण्यास, आला राहू देवास नगरांस, आतां शनी देवाचा ऐका थोडा इतिहास ॥

चा. क्र. ८ दोरी ) पूर्व अवतारीं कैलासावर, घडला चमत्कार, जरा आतां कैलासावरतीं चला, जाऊं शनीदेव समाचाराला, गेला होता शंकराच्या राशीला, म्हणे एक प्रहर येतो भेटीला, शंकरानें कबुली दिली त्याला, न आपण खोल पाण्यामधें लपला, प्रहर तो सहज निघून गेला, शंकर काय बोलले शनीदेवाला, येऊन काय केलंस सांग मजला, शनिदेव तेव्हां हंसून वदला, देवांचेही देव तुम्हीं भ्याला, माझ्या भीतीनें पाण्यांत दडला, आणखी काय करावें सांगा तुम्हांला, आज जरी फसवलं तुम्हीं मजला, पुन्हां जन्म घ्याल अवताराला, तेंव्हा दाखवीन प्रभाव तुम्हांला, या शनीचा दादा ॥

चा. क्र. ३ ) आला पुन्हां शनी तो खानविलकर नांवानं ॥
पवारांच्या दौलतीचा दौलतराव होऊन ॥ पद

॥ [illegible] ॥

छळूं लागला शंकरास पूर्वी ठरल्याप्रमाणं ॥

त्याचा थोडा मासला सांगतो ध्यानं ऐकून ॥

चा. क्र. भेदीक - ७/३) मल्हारराव आन सदाशिवरावाचे अगाध बंधूप्रेम, अलौकिक।

तयामधं बीज कालवून ॥ हो ॥

मल्हाररावाची दासी प्रभावती हाताशीं धरून, खरोखर।

अंध केला मल्हारराव त्यानं ॥ हो ॥

म्हैसूरकर गोविंदराव वकील तो साह्या घेऊन, तयानं।

नाडला सदाशीवराव त्यानं ॥ हो ॥

चा. क्र. १) शनी, राहूकेतूची युती, जमली ध्यान करती, विचार करा चित्तीं।

कायमग छळ कमी कां होणार, मनुष्य कितीकसा सहन करणार

ऐका शाहीर सारं गाणार ॥ २ ॥

—o—×—o—

॥ भाग ३ रा ॥

चा. क्र. भेदीका - ७/१) एकोणीसशें आठ सालीं त्या वकील गोविंदरावानं।

नाहीं कायद्याचे ज्ञान तुम्हां असें बोलून केला अपमान ॥

सदाशिवरावानीं केला निश्चय बॅरिष्टर मी होईन।

पूर्ण करारी बाणा, निश्चयी पुरुष सदाशिवराव महान ॥

रिझर्व केली जागा बोटीवर पाय ठेविला हो त्यानीं।

परंतू शनी देवाची दृष्टी फिरलीन आल्या ह्या अडचणीं ॥

अकस्मात बिघडली प्रकृती, परी निश्चयानच ढकला।

जाऊन उतरले विलायतेंतील भव्य बंदरात लंडनला ॥

चा. क्र. १) ओळखीच्या तेथील मित्रांना, अगोदर जाणं, कळवले होतं त्यांना।

परी शनी महाराजानीं समयास, येऊनच दिलं रिसिव्ह करण्यास।

आली सुरवात इथून संकटास ॥

नच कुठे ओळख पाळख, संगे बालक, पत्नीपण देख।

परस्थळीं कोण कुणाला पुसणार, शंकरराजपुत्र तिथें येणार।

धैर्याचा हा मेरू नाहीं डरणार ॥

चा. क्र. २) कितीतरी आल्या अडचणीं। त्यांत आजारी पडली पत्नी ॥

तशांत रुसले दामाजीपंत, फिरवियली पाठ तयानीं ॥

अशा परिस्थितीत शिक्षण। कसं घ्यायचं सांगा त्यांनीं ॥



:-

॥ स्वारी रोम प्रयाण ॥

(चा. क्र. ३) राजाच्या भावाला पडली द्रव्य टंचाई ॥
ऐकून हंसावें की रडावें समजेना काई ॥
जिथं राजालाच द्रव्याची पडली टंचाई ॥
तिथं कथा काय भावाची ऐका नवलाई ॥
पुढं सयाजीराव गाईकवाड राजानं पाही ॥
अठरा हजार रुपये कर्जाऊ देऊन लवलाही ॥
येतां लक्ष्मी घरीं गेली दूर ती आक्काबाई ॥

(चा. क्र. ४ लगट ४) देवासच्या भावी राजाची, जाणली किंमत त्याची, त्यांना पारख होती गुणाची, सराफाला जैशीं हिऱ्यांची, लढवय्यालागीं शस्त्रांची। किंवा अरबाला घोड्याची, मर्दालाच खरी पवाड्याची, तशी पारख सयाजीरावानां होती माणसांची ॥ म्हणूनीच जगीं झाली कीर्ती अजरामर त्यांची ॥

(चा. क्र. १) विलायतेहून परत येतांना, शनीजें त्यांना, मार्गांतच जाणा, दाविला कसा एका चमत्कार, पियानों कंपनी बोटीनं थ्यार, जायचें ठरविलें त्यांनीं साधार ॥

(चा. क्र. ४ लगट ४) सामान पुढं पाठवून, योग्य वेळीं निघाले घरून, परीपूड्यशनीदेवानं, मोटार ड्रायव्हर रूपानं, बोट सुटल्यावर तासानं, आणली मोटार धक्यावर त्यानं, मग एका फ्रेंच जहाजांतुन, करायचा प्रवास ठरवून, जहाजांत बसले जाऊन, घाणींत होता अग्रणी तो कमरा जाण ॥ त्या फ्रेंच जहाजाची चोरव, आरवरचीच होती जणूं खेप, रिटायर होण्याचीच वेळ तयाची देख ॥

(चा. क्र. १२ मी.) निघाले तेव्हां गरम कपडे होते अंगावरी ॥
कारण, होते बर्फ पडत त्यामुळंच थंडी भारी ॥
लाल समुद्रांतून जातांना आली आग अंगाची पुरी ॥

(चा. क्र. ६ करावं २) समुद्रमंथन केले जेव्हां देव दैत्यानीं, तेव्हां निघाली त्यानुनीं। चौदा रत्नें, त्या मधुनी, अमृता मागोंच हलाहल, आले बाहेर फार जहाल, शंकरानीं आशन केलं ॥
आग झाली शंकराच्या साऱ्या अंगाची, म्हणून मस्तकीं साची, धार वाहते गंगेची, त्यानं दाह शांत करण्याचा, यत्न केला शंकरानीं साचा, इतिहास ध्यानीं घ्या त्याचा ॥
तसाच प्रकार येथें झाला उकाड्याचा त्रास, झाला सरा शिवरावास,

म्हणून शांतता करण्यास, साऱ्या गंगांचा पती सागर, धांवला
तेव्हां खरोखर, कसा घडला ऐका प्रकार ॥
चा. क्र. ४) (लाट- ४) उसळला वारा अवचित, खवळला दर्या अतोनात, केबीनचीखिडकी
एक त्यांत, मोडून पाणीचपाणी आलें आंत, राजाला स्नान घालून
तो जाहला शांत ॥
चा. क्र. १) यापरी कष्ट सोसून, देशालागून, पोचले येऊन, तिथेहि छळण्यास
शनी तय्यार, होता पहा खाजविलकर साचार, गांठले मगत्यानीं
ग्वाल्हेर सरकार ॥ ३ ॥

॥ ... क था ॥

चा. क्र. ६) कटाव- १) ब्रम्हदेव यांच्या सांगण्याप्रमाणें तो शिव, घेऊन सारे अनुभव,
देण्या शिक्षण जाणलें, अति लहान राज्य देवास, देवास हो,
म्हणून केला ग्वाल्हेरी वास ॥
गृहमंत्री राज्याचे होते वर्षे सतरा, केलं उत्तम कारभारा, प्रजा
आणि सरकारा, केले खूप न्यायनीतीनं, नीतीनं हो,
लोकशाहीचं युग जाणून ॥
चा. क्र. १) खुषमस्करे जन, लांचदेणारे, तसेंच घेणारे, तयांचे वारे,
लागूं नच दिले सतरा वर्षांत, त्याची एक कथा छोटीपरखयात,
सांगतो तुम्हां घ्यावी ध्यानांत ॥
एकदा एक बडे जहागीरदार, तयांच्या म्होरं, आले खरोखर,
अपील करण्यास म्हणून, त्यांनीं, लखोटा दिला नोटा घालुनी,
भडकले त्यांत नोटा पाहुनी ॥
चा. क्र. २) दाविला त्वरित पहा त्यांना, तुरुंगाचा मार्ग तो सरळ ॥
असा कोण सांगावा पुरुष, असल्यास एखादा विरळ ॥
सहजची मिळणारा पैसा, पाडितो मनाला भुरळ ॥
चा. क्र. ३) कसें जावे देवाचे भेटीं रिक्त हस्तानें ॥
होते ठाऊक जहागिरदारांस म्हणुनिया त्यानें ॥
हा देव निराळा भेटला त्यांस मुळीं नच मानें ॥
म्हणून जेल त्यास दाविला सदाशिवरावानें ॥
चा. क्र. ४) (लाट- ४) एकोणिसशें सतरा सालांस, पहिली मराठा शिक्षण परिषद भरली
पुण्यांस ॥ तिचे अध्यक्ष म्हणुनी यांस, जनतेने निवडिले खास,
मानुनी संत वचनास, जन मराठा तितुका मिळवावा देशकार्यास ॥

॥ स्मारकांचे प्रकरण ॥

चा.प्रा. ३) यापरी आले नायक मराठ्यांचे समयांस ॥

म्हणूनीच म्हणतो शाहीर अवतारी त्यांस ॥

चा.प्र. ८ सांगती) त्याचवेळीं विचार आला मनीं, पुणें राजधानीं, महाराष्ट्राची असुनीही, अखील मराठ्यांची पुण्यभू ही, विद्येचीन विद्वानांची भू ही, शिवस्मारक येथें नाहीं, केवढी शरमेची गोष्ट ही हाई। बस्स, आतां स्मारक झाल्या विन पाहीं, मुळींच विश्रांती घेणार नाहीं, देतो अजीं स्मारकाची ग्वाही, या ऐकां तुम्हीं दादा ॥

चा.प्रा. ६ कटाव-५) वंशज जे शिवरायांचे, त्यांच्या गणांचे, संस्थानिक आजचे, अनायासें जमले, अहो जमले, शिवस्मारकाचे सुविचार पुढें मांडीयले ॥

शिवाजीचें नांव घेण्याचा, नव्हता काळ साचा, होता आणी-बाणीचा, मग कुठलें स्मारक, कसें होणार त्याचें तो तर हिंदुधर्म तारक ॥

ज्यासाठीं टिळक लोकमान्य, जाहले धन्य, तुरुंगामधें गेले, अहो गेले, तसें धाडस कोणकरणार सांगा त्या वेळे ॥

चा.प्र. ४ लगट) तवा साऱ्या संस्थानिकांनीं, तसेंच मराठा समाजानीं, दोन पाडलेल्या त्या सिंहानीं, जा उमेद केले सकलानीं, इंग्रजी सत्तेचा प्रभाव असा घ्या ध्यानीं ॥ परी नाहीं सोडला धीर, स्मारकाचा पक्का निर्धार, करुनिया कष्ट अपार, छत्रपती शिवाजीचे थोर, उभविले त्यांनीं सुंदर, प्रिन्स ऑफ वेल्स यांचे हस्तें खुद्द साचार ॥ आणि एक कार्य सुमंगल, ग्वाल्हेरांत तयांनीं केलें, स्वातंत्र्यदेवी ती राणी लक्ष्मी सोज्वळ, ज्याजागीं मारली गेली, ज्या जागीं गुप्त जाहली, त्याजागेभंवतीं युक्तीनें बाग बनविली, मग तुळशी वृंदावन, राजानं घेतलं बांधवून, तेंच स्मारक लक्ष्मीचें साक्ष सांगतो खूण ॥ मग राजकवी ताम्ब्यांची, एक कविता खोदवून त्यांची, बसवियली वृंदावनीं साची, देण्यास तुम्हां आठवण राणी लक्ष्मीची ॥

चा.प्र. ३) अशीं स्मारकें उभारीली दोन, मोठ्या हिंमतीनं, मुत्सद्दीपणानं, असा वीर नाहीं पुढती होणार, ज्यानं बसविले इंग्रज येडगार, म्हणून शाहीर कीर्ती गाणार ॥ ४ ॥

(६६)

॥ ऐतिहासिक पवाडा ॥

॥ मेळा - आ ॥

चा. क्र. १) आणि एक सांगतो मासला, शनिचा मेळा, सांगतो तुम्हांला।
भाऊसाहेब युवराज महाराजांचे, आणि राजकन्या अलकनंदाचे।
ठरविले विवाह दोघांचे ॥
होती ईच्छा तयांचे मनांत, दोन्ही ही सार्थ, कार्ये देवासांत,
व्हावी अपुल्याच राज्य अंगणीं, परी रबान विलकर आणी,
अभावती, मोड घातली त्यांनीं ॥

चा. क्र. २) कळविले तयांना दोघांनीं, नाहीं होणार कार्ये देवासांस ॥
निदान पैसा तरी सत्तेचा, मिळणें जरूर या समयांस ॥
परी तो ही मिळेनच कांहीं, म्हणून माधव महाराजांस ॥
केली विनंती कार्ये करणेस, घावी मदत तुम्हीं यावक्तास ॥

चा. क्र. ३) द्यावें रुपये कर्जाऊ म्हणून वीस हज्जार ॥
माधव महाराज माऊली होती करुणासागर ॥
म्हणती सारें ठीक होईल तुम्हीं जका करूं घोर ॥
आला मुहूर्त पक्का पहा पंधरा दिवसांवर ॥
आमंत्रणें गेली ठायीं ठायीं पहा साधार ॥
पण पैसा नाहीं हातीं तयारी कशी करणार ॥

चा. क्र. ४) लगट मगमात करून विचार, मागण्या पैसे सत्वर, दिल्लिला गेले आशेनं धरुनिया धीर ॥ माधवराव शिंदे सरकार, खासकामासाठीं दिल्लीला गेले होतें म्होरं ॥ तिथं गेले सदाशिवराव, दरवाज्यावर दोन तास लागले ऊभें राहावं ॥ दोन तासानं शिंदे सरकार, माधवराव आले बाहेर, परी केला शनीनं जोर, पाहतांच यांना समोर, आठ्यां पडल्या कपाळास थोर, आसीकपणाचे ह्यांवर, बोलले शिंदे सरकार ॥ आतां वेळ नाहीं मज पुढें करीन विचार ॥ जाहले पूर्ण निराश, मग निघून गेले धारेस, पवारांच्या साह्यानें कार्य योजिले मह्रूस ॥

चा. क्र. ८) दांगटी शिंदे सरकारचे घ्यावें दर्शन, विचार असावरून, वाड्यावरी जाण, गेले असतां, त्यांच्या ए.डी.सी.नं, त्यांना एक दिला लखोटा आणून, फोडतांच दिसला चेक त्यातनं, वीस हजार रुपये आहेर म्हणून, दिले त्यांनीं लग्नासाठीं म्हणून, धन्य शनी देवाची कर धन्य, गा ऐका तुम्हीं दादा ॥

चा. क्र. ४) लगट ऐका आणिक एक दाखला, विक्रमावर आळ जसा आला। :-

॥ स्थानीय पवाड ॥

खुंटीवरचा हार चोरला, तसाच यांच्यावरतीही केला, पन्नास हजारचा चेक दाबल्याचा आरोप आला ॥ परी परतून दिलं सर्वाला ॥ तंवा आरोप ठरला पहारखोटा द्यावं ध्यानाला ॥

चा.क्र.१) एकशें चार डिग्रीचा ताप, असतां अंगांत, कर्तव्यकर्मांत, ढळला नाहीं कधीं हा वीर खंदा । अखंडपणें कार्य करी बंदा, म्हणुनिया त्यांसी सकल वंदा ॥ ५ ॥

---

॥ भाग ६ वा ॥

चा.क्र.१) आतां ऐका पुढील प्रकार, सांगतो मी सार, राजर्षी मल्हार, सोपवुनी यांना राज्यकारभार, स्वर्गी गेले संपविला अवतार, एकोणिसशें चौतिसांत निर्धार ॥

चौतिसच्या फेब्रुवारीला, दोन तारखेला, राज्याभिषेक झाला, सदाशिवराव खासेरावास, सिद्ध झाला शिक्षण द्याया सकलांस, झटे नित सुखविण्यास रयतांस ॥

चा.क्र.२) संपताच साडेसाती । कमी झाला शनीचा जोर ॥
टेकले तयानें हात । असा भेटला सोशिक वीर ॥
मग केला कार्यारंभ । प्रजेसाठीं श्रमले फार ॥

चा.क्र.३) सत्ययुग ब्राम्हणांचे त्रेतायुग क्षत्रियांचे ॥
द्वापार वैश्य आणि कली मजूरवर्गांचे ॥
बद्ध केले यत्न शेतकरी सुखी करण्याचे ॥
दिले उत्तेजन विद्या आणि धंद्याला साचे ॥
ठायीं ठायीं काढले कारखाने धोरण व्यापाराचे ॥
लोकमताला मान देऊन कल्याण केले गरिबांचे ॥

चा.क्र.४) (जोट) कल्याण करण्यासाठीं, रात्रंदीन झटले उठाउठीं, शिवबानें नेमले अष्टप्रधान तसंच यानीही मोठी ॥ नेमली अष्टप्रधानांची माला, नेमिली कारभार करण्याला, रयतेची गाऱ्हाणीं ऐकायाला, राजद्वार खुलें ठेवलें चोवीस तास सर्वांला ॥ अस्पृश्यांचा करण्या उद्धार, जातीनें झटले खरोखर, सहभोजन झुणकाभाकर, याची साक्ष खास देणार, स्वदेशीचे तत्व धरोधर, पटविलें तयानीं बरोबर, भरवून खादी दरबार, आधीं केलं मग सांगितलं तत्व तें खरं ॥ हिंदू मुस्लीमांच्या ऐक्याचा, केला यत्न बहूमोलाचा,

॥ खासेराव पवार ॥

लगट ४.) कर बंद केला मालाचा, मिलिटरी अन आळारवाल्यांचा,
पोलीस अन सर्वशारवांचा, पुनर्रचना करून उध्दार केला सर्वांचा ॥
चा.क्र. १) मोठी पाती राजे विक्रमसिंहराव, यांचा स्नेहभाव, राखून जाणावं,
गाजवले भारतधर्मरत्ने नांवा, राज्याला राजा असाच असावा,
करील जो नित्य प्रजासेवा ॥
राजे सयाजीरावानंतर, अनुभवी हुशियार, हेंच एक थोर,
राजे पहा हिंद नरेंद्र मंडळांत, मुत्सद्दी सदाशिवराव ख्यात,
गातो गुणगान पुढील चौकांत ॥ ६ ॥

---

॥ भाग ७ वा ॥

चा.क्र. ५ काव्य ५) एकोणिसशें अेचाळीस सालांस, डिसेंबरास, दोन तारखेस,
युवराज महाराजांना, महाराजांना, संदेश दिला एकांतीं बोलावून त्यांना ॥
सर्वांसाठीं मी थोडं फार कांहीं, कार्य केलें पाही, करावें तुम्हीही,
मार्ग दाऊन, दाऊन, होतो मुक्त आतां मी पुढच्या पिढीचे ऋणांतून ॥
आधुनिक भौतिक शास्त्रांत, बहुत निष्णात, युरोपियन ख्यात,
परी पारमार्थीक, पारमार्थीक, ज्ञान द्यावें तयानीं हिंदूस्थानांतच चोरव ॥
चा.क्र. १) द्यावें त्यांचे भौतीक ज्ञान, सकलांनीं आपण, तेव्हां हिंदुस्थान,
यशाचे शिखर खास गांठणार, नातरीं यत्न व्यर्थ ठरणार,
लयांहून योग्य निशस्त्र प्रतीकार ॥
त्या दृष्टीनें मी थोडासा, प्रयत्न तसा, केला होता खासा,
परी मोठ्या पातीच्या महाराजांनीं, प्रत्यक्ष युध्दांत भाग घेऊनी,
झेंडा पवारांचा फडकवला गगनीं ॥
त्यानीं आफ्रिकेच्या रणांवर, करूनिया थोर, युध्द घनघोर,
दाविले शौर्य जाणा सकलांस, त्यांच्याशीं राखून बंधू प्रेमास,
ठेवा उज्वल आपुला इतिहास ॥
चा.क्र. २४) निर्वाणीचे हे शब्द एकतांच आला कंठ दाटून ।
युवराज महाराज गेले बावरून ॥
अखेरचे दर्शनीं जमले मंत्री, आप्त, सगे, जनगण ।
वाहती अश्रू नेत्रांतुन ॥

॥ रवासेराव महाराज प्रयाण ॥

चा.क्र. २४) महाराजांना बोलती युवराज आले गहिंवरून ।

तात! नका जाऊं आम्हां सोडून ॥

कधीं न बोली। चिंता आपुले धन शिरीं आहे म्हणून ।

तात! नका जाऊं धन सोडून ॥

राज्यभार हा सोडून जातां होईना मज सहन ।

तात! नका जाऊं प्रेमा तोडून ॥

चा.क्र. ३) महाराजानीं धरले पोटाशीं आला गहींवर ॥

म्हणती तुम्हीं कार्तिकस्वामींचे अंश अवतार ॥

शिवाय भगवान मोहिनी रूप विष्णु आहे पाठींवर ॥

पार्वती माय तुम्हां देईल योग्य आधार ॥

मी पुन्हां घेऊनी येईन नवीन अवतार ॥

असें बोलती तोंच आले दिव्य विमान सत्वर ॥

चाल क्र. १) हाय! हाय! विरली प्राणज्योत, पूर्व रूपांत, शिवस्वरूपांत, विलिन झाली, धन्य रवासेराव महाराज, तुम्हांला प्रणाम करुनिया आज, संपवितो कवन दीक्षित कविराज ॥
कवी गणेश दीक्षित शाहीर, राज्य सोडूर, जन. देवास दरबार, मानकरी जरीपट्टा कद्यार, सांगली शहरीं वास करणार, दास या हिंदभूमीच्या प्यार ॥ ७ ॥
(पुनर्लेखन दि. ४।१२।८३. क्रांती शाहीर रघुवीर दीक्षित चिंचणीकर. १२१२४१ जयगांधी भवन सदाशिव पुणें ३०)

## ॥ उपदेश पर - फटका ॥

॥कवी:- संत तुकाराम, आणि, राष्ट्रशाहीर ग.द.दीक्षित चिंचणीकर

चा.क्र.७ भेदीक-६

समजेल तेंची ल्यावें गड्यांनों पचेल तेवढें खावें ।
संत घरासी आले तयासीं कां बोलून शिणवावें ॥
गोड लागला ऊस म्हणुनी कां मुळासकट खावा ।
अन्न नाहीं खायाला म्हणुनी काय स्वधर्म सोडावा ॥
कापड गिरण्या आल्या म्हणून कां चरखा तोडावा ।
प्रीतीचा सोयरा आला म्हणुनी कां बहुत दिवस रहावा ॥
हिंदु-मुस्लीम ऐक्य करण्या कसा इतिहास विसरावा ।
रागें भरला पिता म्हणुनी काय जिवें त्या मारावा ॥
गांवचा मालक झाला त्यानें काय गांवास बुडवावें ।
अंगीं जवानी आली म्हणून काय भलतेंच बोलावें ॥
औषधीं पुस्तकें आलीं म्हणून कां डॉक्टर मारावें ।
भगवें वस्त्र घातलें तयानें काय जनांस भोंदावें ॥
फुकट हिरा मिळाला म्हणून त्याला कथील कां जोडावें ।
वर्तमानपत्रें मिळती वाचायला म्हणून शाहीर कां नाडावें ॥
फुकट मिळाला हत्ती म्हणुनी कां भलत्यानेंच घ्यावा ।
दीप आहे बहु सुंदर म्हणून कां वळचणीस ठेवावा ॥
परस्त्री सुंदर आली म्हणून काय बळेंच भोगावी ।
जिवलग मित्र झाला म्हणुनी काय बाइल मागावी ॥
धर्मास अस्पृश्यता मान्य तरी कां सर्वां ठायीं मानावी ।
मखमली पैजार आली म्हणून कां शिरीं तीं वंदावी ॥
पैसेवाला आहे म्हणून म्हाताऱ्याला कन्या काय द्यावी ।
सोन्याची सुरी आली म्हणून काय छातीत खुपसावी ॥
कापूरवडी आली स्वस्त म्हणून काय पलंगास लावावी ।
सुधारणा झाली फार म्हणून काय लग्नसंस्था मोडावी ॥
व्याजबट्टा घेतो म्हणून काय देणीं बुडवावी ।
शहरें वाढलीं फार तरी कां खेडीं लुटवावी ॥
संत सोयरा झाला म्हणून काय स्नानसंध्या त्यजावी ।
चंदनी लाकूड थंड म्हणून काय उगाळून प्यावें ।
रोज भेटती देव म्हणून कां जगांस दावावें ॥
पाहिजे सैन्याला मांस म्हणून काय गोमाता कापावी ॥

॥ उपदेशपर फटका ॥

(पा. क्र. ७ / अंक ९) सिनेमा नाटकें आली म्हणूनी कां हरिदास बुडवावें ।
वीरकाव्य पोवाडे म्हणून काय भलत्यानेंच गावें ॥
सैन्यासाठीं अन्न पाहिजे म्हणून कां शेतकऱ्यांस लुटावें ।
सत्ता आली आपली म्हणून सारें नाणें कां दडवावें ॥
संत तुकाराम वाणी म्हणूनी काय उपदेश सोडावा ।
शाहीर दीक्षित म्हणे बंधुनों प्रभू तो जोडावा ॥

दिनांक ५।१२।८३ पुणें

॥ हिंद तरुणास संदेश ॥

कवी :- राष्ट्रशाहीर गणेश दत्तात्रय दीक्षित चिंचणीकर (सांगली)

(पा. क्र. ३४) आली सुवेळ आली, ऊठ! हिंद वीर्यशाली ॥ धृ० ॥

॥ दुर्दैवी हिंदमाता ॥ तुज नित्य हांक देतां ॥ परदास्य बेडी पडता ॥ तुजवीण कोण वाली ॥ १ ॥ जो देश मर्द होता ॥ शत्रूंस देई लाथा ॥ तो आज करुण आतो ॥ दुःखाची फोडी किंकाळी ॥ २ ॥ यवनास धूळ चारी ॥ फिरंग्यास जाणी जेरी ॥ गोऱ्यांस शाला भारी ॥ सुरतेस एके वेळीं ॥ ३ ॥ तो शूर शिवबा झाला ॥ हा देश मुक्त केला ॥ देशार्थ प्राण दिधला ॥ तो तूंच एके वेळीं ॥ ४ ॥ अटकेस झेंडा लावी ॥ राघो भरारी पाहीं ॥ अटकेस धाडा नेई ॥ शत्रूंस धास्ती पडली ॥ ५ ॥ पहा मर्द गौरवला तो, गोऱ्यांस काळ दिसतो ॥ शत्रूही थक्क होतो ॥ पाहून युद्ध शैली ॥ ६ ॥ गोऱ्यांस भीती दावी ॥ युद्धांत रणदेवी ॥ कीं चंडिका दिसावी ॥ अशी लक्ष्मी झांशीवाली ॥ ७ ॥ तें धन्य! टिळक बाळ ॥ गोऱ्यांना वाटे काळ ॥ स्वातंत्र्य-देवी माळ ॥ प्रेमानें त्यास घाली ॥ ८ ॥ गांधी महात्मा आपुला ॥ स्वातंत्र्य मार्ग ज्याला ॥ तुम्हांसी दाखविला ॥ पाहून धांव घाली ॥ ९ ॥ स्वातंत्र्य मार्ग कांहीं शोधोनी तूंही पाहीं, त्यावीण दुसरी नाहीं, युक्ती उपाय कसली ॥ १० ॥ देशार्थ देह झिजवी ॥ धर्मार्थ प्राण देई ॥ राष्ट्रीय झेंडा लावी ॥ ही वेळ आज आली ॥ ११ ॥ ती थाप कीं डफाची ॥ अन् साथ तुणतुण्यांची ॥ वाणी गणेश कवीची ॥ रणशिंग साद घाली ॥ रे ॥ आली सुवेळ आली ॥ ऊठ! हिंद वीर्यशाली ॥ १२ ॥

दि. ५।१२।८३ पुणें

॥ श्री सद्गुरु जयरामस्वामी महाराज की जय ॥

कॅप्टन भाऊसाहेब महाराज पवार राज्य देवास ज्युनियर यांचा

॥ पोवाडा ॥

कवी: संडूर राज्य व देवास दरबार शाहीर ग.द.दीक्षित चिंचणीकर (सांगली)

॥ भाग १ ला ॥

चा.क्र. १) धन्य तो वंश परमार, राज्य ज्युनिअर, देवास थोर, लाभले ज्या राजे यशवंत, ज्यांचापरी सदा झाले यशवंत, खरा रणधीर क्षात्र कुलवंत ॥ ध्रु० ॥

चा.क्र. ५) दैत्यांच्या जुलमानें देव जाहले त्रस्त, जमुनिया करती विचार कराया फस्त, दैत्यांना, उपाय काय सांगा देवा दरोबस्त, ब्रम्हदेव म्हणती शंकरांचा, पुत्र तो साचा, करील बंदोबस्त ॥

चा.क्र. १) मग पुन्हां पडला विचार, व्हावया पुत्र, पाहिजे आगोदर, जरूर शंकराचा विवाह करण्यास, म्हणून पार्वतीकडून समयास, करविली तपश्चर्या जंगलास ॥

चा.क्र. २) हिमालय कन्या पार्वती, तीं घाली माळ शंकरा ॥
उभयतांस जाहला पुत्र, कार्तिकस्वामी तो खरा ॥
जो सेनापती देवांचा, दैत्यांचा करितसे चुरा ॥
परी आली तयाला शंका, पित्या विषयीं विचार हा करा ॥

चा.क्र. ३) जो देवांचाही देव जाणा महादेव ॥
त्यां कामवासना असावी, कसें व्हावं ॥
संतप्त होऊन गेले घोर तपार्थी पहावं ॥

चा.क्र. ४ लगट) त्या कर्नाटक प्रांतात, डोंगरांचा किल्ला कडेकोट, निसर्गाचा मजबूत तट, लै झाडी किर्र घनदाट, मानवाचा संपर्क नचतिथं, अशा महाघोर अरण्यांत, डोंगराच्या माथ्यावरतं, कार्तिकस्वामीनीं तपश्चर्येला केली सुरवात ॥

चा.क्र. ३) ज्या भागास आज संडूर राज्य म्हणतात ॥
तिथं यशवंतराव घोरपडे राजे विलसत ॥
युवराज मुरारराव साक्षी शौर्य मूर्तीमंत ॥

चा.क्र. ४ लगट) अशा घोर जंगलच्या रानीं, घातला दंडक कार्तिकस्वामीनीं, पार्वतीमातेविण कुणीं, येऊं नये माझ्या दर्शनीं, तपश्चर्या घोर पाहुनी, तो इंद्र दचकला मनीं, पाताळही हादरलें मनीं, मग इंद्र उर्वशी अप्सरांना संगें घेऊनी ॥ पातला तयासमोर, नाच, गाणें चाले मनोहर, परी दाद नव्हती स्वामीस त्याची साधार,

॥ [illegible] महाराज पवार ॥

चा.क्र. ७ भेदीक-३) आसन घालून पहा बैसला ब्रम्हचारी महान, मुखीं तें हरीनाम स्मरण ॥
कैक वर्षे केली तपस्या नाहीं ऊन तहान, समाधींत नव्हतं देहभान ॥
त्या तेजावर मोहीत आली ऊर्वशी ती जाण। तयांवरी फेकीं मदनबाण ॥
देवाहुनी तो शूरची ठरला जिंकुनिया काम, धन्य कार्तिक स्वामीं धन्य ॥
चा.क्र. ८ डोंगरी) जाहला भंग समाधीचा, भडकला त्यांचा, क्रोध स्वामीचा, रागानं लाललाल आला, पार्वती माते शिवाय बोला, जगांतील इतर सर्व स्त्रियांला, शाप कार्तिक स्वामीनं दिधला, जी स्त्री पाहील माझ्या तोंडाला, सात जन्म विधवापण तिजला, येईल बघा दादा ॥

स्वामींचा शाप ऐकून, गेली भडकून, ऊर्वशीही जाण, विषय भंगाची जखम झाली, तीही मग त्याला शाप वदली, अबला जोंवर अबला राहिली, एकदां जर कां ती सबला बनली, तर ठरेल दहापांचालाही भारी, यातनं ही नाजुक बाब पडली, सूड याचा घेईन कधीं काळीं, हो ऐका तुम्हीं स्वामी ॥

चा.क्र. ७/३) नरकांची खाण असे स्त्री शास्त्रवचन थोर, तियेचा करिसी तूं धिःक्कार ॥
त्याच स्त्रियेच्या मोहामधें तूं गुंतून फसणार, भविष्य मम कधींन चुकणार ॥
ऐकून झाले क्रुध्द स्वामी, तिज जाळून भस्म करणार, तंवर प्रगटले पार्वतीशंकर ॥
चा.क्र. ४ लगट) तैसेच विष्णू भगवान, स्वामीचें करिती शांत मन, पित्याविषयीं शंका घेऊन, तुम्हीं मांडले तप दारुण, अहंकारा आधीन होऊन, पुन्हां यावे जन्म घेऊन, शापातनं मुक्त व्हायला नाहीं ऊपाय याविण ॥
चा.क्र. १) विष्णूची अशी ही लीला, मान्य होई त्याला, पुन्हां जन्मला, संभाजी रूपें शिवाजी उदरांस, ऊर्वशी ही आली सूड घेण्यास, वाघीण होऊन राहिली जंगलास ॥ १ ॥

॥ भाग २ रा ॥

चा.क्र. ७ कराव-३) छत्रपतींचा छावा खरा वीर शंभू बाळ, सूर्य ऊगवता तेजाळ, भासे शत्रूलागीं काळ, सवंगडी घेऊनी संग, जंगलात शिकारीत दंग, बालपणींच खेळे असा रंग ॥
चा.क्र. १) हंबीर मोहिते रणगाझी, महाडिक हरजी, केसकर जोत्याजी, त्रिवर्गास घेऊन गेला जंगलांत, शिरला एका गुहेंत मोठया दिमाखांत, कशाचीच भीती नव्हती चित्तांत ॥
पूर्व जन्मीची ऊर्वशी भली, वाघीण झाली, गुहा तिची झाली, पतीसंगें होती जंगलांत, बछडी तिची दोन खेळती आंत, संभाजी खेळे त्यांचे संगात ॥:-

॥ कॅप्टन भाऊसाहेब महाराज पवार ॥

चा.क्र. २) हंबिरराव आणि महाडीक । जोत्याजी केसकर देख ॥
बसले होते बाहेर । जनावरांच्या पाहण्या रोख ॥
इतक्यांत आली वाघीण । गुहेनजीक पहा बिनधोक ॥
आणिलें तिनें त्या समयीं । कार्तिकस्वामी हा चोख ॥

चा.क्र. ३) गर्जना केली जमिनीवर शेपूट आपटून ॥
एक शिका लावली तोंडास शंभू राजानं ॥
दे धडक्या तया वाघीण मोठ मोठ्यानं ॥
तिची बचडी आली तवा शंभूवरती धांऊन ॥
परी कवळ्या काकडी सारखी टाकली चिरून ॥
आणि दिली गुहेच्या बाहेरी फेंकून ॥

चा.क्र.४ लगट) वाघीणीनें धडक ती दिली, ताडकन शिका फोडलीं, शंभूवर उडी घातली, परी त्यानं धरूनिया जबडा उभीं फाडिली ॥ ईतक्यांत आला तिचा पती, परी जोत्याजीनं निश्चिती, एका बाणांत दिली त्याला गती, वाघीणीची सूडाची आस राहिली चित्तीं ॥ म्हणून पुन्हां जन्म घेऊन, आली पहा तुळशी नांवानं, मोठंपणीं शंभूराजास मोह पाडून ॥ बादशहाच्या हातीं दिले पहा त्याला पकडून ॥ परी अखेर शंभूराजानं, धर्मासाठीं देह अर्पून, पापाचें केले क्षालन, परी पुन्हां पेटून सूडानं, वाघीण पुन्हां जन्मून, खाडक्याच्या वनांत आली ऐका पुढं घा ध्यान ॥

चा.क्र. १) संभाजीही घेई अवतार, पुन्हां साचार, वंश परमार, नांव यशवंत तयाचे खास, अधिपती ज्युनी अर देवास, ऐका आतां पुढील सारा इतिहास ॥

चा.क्र. २) हंबिरराव मोहीते रावसाहेब मोहीते नांवानं ॥
हरजी महाडीक जन्मले हरीऊ नांवानं ॥
जोत्याजी केसकर निळकंठ पवार नांवानं ॥
पुन्हां सारे जमले एकत्र देवासला जाण ॥

चा.क्र. १) उर्वशी घ्यावयासूड, करी अवघड, युद्ध बिनतोड, तयांचे संगें पहा साचार, शाहीर तें पुढील चौकीं गाणार, वीररस पूर्ण त्यांत भरणार ॥ २ ॥

ट X ट

॥ कॅप्टन भाऊसाहेब महाराज पवार ॥

चा.क्र. १) अडतीस सालच्या मे महिन्याला, एकवीर तारखेला, गेले शीकारीला, यशवंतराव, गांठले खांडवा जंगल, क्रूर जनावरांची जिथें दंगल, क्रूर वाघीणीचे करण्या मंगल ॥

चा.क्र. २) पुढची सारी तयारी करण्यास, गेले आधींच निळकंठपवार ॥
मोहितें आणि हरोडे । होते महाराजां बरोबर ॥
हांकयांस आली सुरवात । दणाणून गेले अंबर ॥
महाराज आणी मोहीते । दोघे होते एका माळ्यांवर ॥

चाल क्र. ३) निळकंठराव आणि हरोडे दुसऱ्या माळ्यावर ॥
हांका ऐकून क्रुद्ध आला वनचा राजा व्याघ्र ॥
आला चवताळून झेपूट आपटींत अंगावर ॥
एका बारांत महाराजांनी धाडला स्वर्गांवर ॥

चाल क्र. ४ (उगट) मग गेले दुसऱ्या पार्कांत, खेळेनं क्रीडा करीत, एक विनोद सुचला अवस्मात, कशी घडली ऐका ती मात, मोहीत्यांचा विवाह निश्चित, ठरला होता व्हायचा पुण्यांत, महाराष्ट्राच्या राजधानींत, आठ दिवसांवर होता मूहूर्त, महाराज बोलले थट्टेत, "काय मोहिते तुमचं चित्त तिकडे पुण्यांत गुंतलं असेल?" पण ठेवा पूर्ण लक्षांत, आपण आलोय घोर वनांत, दुर्लक्ष कराल जर यांत, तर इथंच होईल लग्न ठेवा ध्यानांत ॥

चा.क्र. ५ (कटाव-५) आपण सारें क्षत्रिय बाण्याचे, आर्य भूमीचे, चेले शिवबाचे, कर्तव्यासाठीं, अहासाठीं, प्राणाची पर्वा ती काय तयाहून मोठीं ॥
कदाचित जाणे वेळेवर, घडले नाहीं तर, मार्ग सुंदर, बंदूक धाडून, धाडून। उरकुया लग्न पूर्वींची रीत ही छान ॥
मोहित्यानीं केलं उत्तर, देह हा तर, आपल्या पायांवर, अर्पण केला, अहो केला। मग चित्त तरी जाईल कसें पुण्याला ॥

चाल क्र. ५ (कटाव-३) ऐका श्रीमंत तुम्हीं स्वामीकाजीं, सोडून पुत्राचे लग्न तानाजी, सिंहगडावर गेला राजी, तसा वीर छावा शिंदे जनकोजी, चेले तयांचेच आम्हीं फर्जी, प्राण देऊं स्वामीकार्यीं आजीं, नको संस्कार, दासाला हिणवूं खरोखर ॥

चा.क्र. ४ (उगट) मग स्वतंत्र शिकार करण्यास, एक एकटे एका पार्कास, बसले तयार होऊन खास, तो तुळशी वाघीणी बंवास, ओसरती दिसली राजास, तरी मोठा आत्मविश्वास, काढिला बार हमरवास। पण गेला चाटून पोटास, ज्याचा नेम लागणार ठोस।:-

लगर ४) मग आजच कां व्हावं असं, याचं कारण द्यावं ध्यानास,
कामवासना जखम पहिलीच होती हृदयांस ॥ म्हणून तिथें जखम
जाहली, शिवाय स्पर्श सुखावीण, गती मिळेल कोठली ॥ चार
वाजायचा आलासुमार, परतले शिकारी सारं, महाराज म्हणती
अब्दुल शकूर, गोळीनं एक जनावर, आलंय जखमी खरोखर,
त्याचा तपास करावा बरोबर, पण होतं कुठं जनावर ऐकाखरोखर ॥

चा.क्र. १) सुडाची धरुनिया आस, नागापरि खास, होती समयांस,
मोटारीच्या जवळ वाघीण लपली, नागापरीं दंश करायाटपली,
क्रोधाची आग तिनं ओकली ॥ ३ ॥

o — x — o — x — o — x — o

॥ भाग ४ था ॥

चा.क्र. १) आधींच वाघीण चिडलेली, त्यांत आडलेली गोळी, भिडलेली,
पोटाला म्हणून खवळली होती खास, येतां महाराज गाडीच्या आसपास,
धांवली जोरांत सोडून दुसऱ्यांस ॥
महाराजांच्या अंगावर झडप, घातली बेधडक, दाविली तडफ,
पूर्वजन्मींच्या सूडाची आस, घेतला पुरता तयाचा ध्यास,
वैरीण पूर्व जन्मीची खास ॥

चा.क्र. २) राखुनी असंगाव धैर्य, राजानं दाविलं शौर्य ॥
उडी घेतां धरुनी पंजे, मागच्या पायांवर दिधले पाय ॥
केला ठार मारण्याचा यत्न, संचरलें अंगीं तें क्रौर्य ॥
कीती साहस महाराजांचे, आन केवढं अचाट धैर्य ॥

चा.क्र. ३) कुठें माणूस कुठें तें क्रूर जनावर जाणा ॥
असंगाशीं संग न, प्राणाशीं गांठ ध्या ध्याना ॥
हिंमतीनं राजानं राखला क्षत्रिय बाणा ॥
तितक्यांत वाघिणीनं खालीं पाडिलें त्यांना ॥

चा.क्र. ४ लगर) मागचे पाय दिले मांडीवर, दोनी पंजे दंडावर, ठेऊन आता नरडं
घोटणार, पण राजानं करून विचार, वाघीणीच्या जबड्यांत दिला
हात सत्वर ॥ कडकडा हात फोडीला, हाडकांचा जाहला चुरा,
रक्ताचा पूर वाहिला, तितक्यांत हरीडज. मोहिते धांवले त्या वेळीं ॥
त्यानीं विचार केला चित्तांत, जर घालावी गोळी डरक्यांत, तर
दोघेही कामीं येतात, जरा जामिनदारांसकट जावें लागणार तुरुंगांत ॥

:—

॥ नॉटन भाऊसाहेब महाराज पवार ॥

(लगट ४) मग उलट बंदूक धरून, मारिला टोला मोहीत्यानं, तिच्या मस्तकांवरती जाण, हरोड्यानं झेपूर ओढून, मांजरासारखे दूर फेकल्याचा केला प्रयत्न ॥ खाली असतांच महाराजांनी, तिच्या जखमेत पाय घालुनी, पोट फाडण्यास त्यांनी, सुरुवात केली हिंमतीनी, नारसिंह-हिरण्यकश्यपूची पुन्हां उजळणी ॥

(चा. क्रा. १२ जीतच्याची)
मार्गी आला आडवा हरोड म्हणून त्या वाघीणीनं ॥
महाराजांना सोडून तयाचा पाय पकडिला तिनं ॥
तवर मोहित्यानं टोला मारिला तशांत संधी साधून ॥
परी घातला घाला त्याचवेळी तिचेही फुटे दैवानं ॥

(चा. क्रा. ८ दांगटी) त्याचीच उलटी बंदूक, उडाली चक्क, धुम धडाड धडाड वाजला बार, मांडीतून गोळी गेली आरपार, वाहू लागली रक्ताची धार, आवाजानं वाघीण दचकली, फार, पळू लागली तेव्हा सांजार, तोंच महाराजांनी अखेरचा वार, काळजास केले हाणाहाण वार, खुले केले तिला स्वर्गाचे दार, स्पर्श सुखे झाले खमालिनीपार, मुक्त होऊन स्वर्गी गेली ती नार, वाघीण होदाली ॥ ५ ॥

X

॥ भाग ८ वा ॥

(चाल क्रा. ३) मोहित्यांची अवस्था कठीण, समजी त्याजाण, बंदुका पाहून। लढ्ज करण्याचा प्रसंग येणार, पैंची मस्करी अशी होणार, बोला फुलो गाठ जशी पडणार ॥ स्वतःच्या यातना विसरुनी, वेदना सोसुनी, महाराजांनी, जवळ जाऊनी बोलले मोहित्यास, मिळो नवा यशवंत पाठीराखास, घालविले परत तुमच्या लोकास ॥

(चा. क्रा. लगट ४) मोहित्यांनीं खवळ काय केला, "महाराज! तुम्हीं जपावं आपल्या जीवाला, एक मोहित हार जरी झाला, तरी लाख मिळतील आपणाला, आमच्यासारखा घरो करी झाला, तुमच्यासारखा एकच बोला, लाख मरोत परी पाहिजे वाचला ॥

(चा. क्रा. २)
ऐकुनी शब्द मोहित्यांचे, राजांचा गळा दाटला ॥
बोलले काय वीराला, ते बोल द्यावे त्यांजला ॥

(चा. क्रा. ६ कटाव ५) लोक काय म्हणतील आम्हाला, एकट्या मोहित्याला, सोडून तोंडाला परत हा आला, अहो आला, काही दया माया होती का नव्हती ह्याला ॥

१९२

कॅप्टन भाऊसाहेब महाराज पवार ॥

नाराव ८) जसा माझा प्राण प्रिय मला, तसाच इतराला, पशू, पक्षाला, खास
हो आला, अहो अजून, तुम्हां जैसे दाऊ कसे तोंड देवास जगतीला ॥
अहा! धन्य धन्य तुम्हीं मित्र, आजों यथार्थ, वचन केले सार्थ, "ओस
वो बाप जिसका कोंत माईसच्चा, "साथ की जोरू गांठकी जोहेन" हे सच्चा,
"निदान का दोस्त" राजसे अच्छा ॥
चा.क्र. ४ (जारट) मग स्वतः आपल्या हातानं, त्याची जखम धुतली पेट्रोलनं, स्वतः चोरी
तरीच हिंमतीनं, मग मोटारीत बसून, खेड्याच्या दवाखान्यांत
पोचले स्वतः येऊन ॥ खरोखरी मोहिते तुम्हीं धन्य, देवासच्या भावी
राजानं, स्वतःला विसरून, केली तुमची सेवा प्रेमानं, यापरतें
भाग्य तें काय सांगा शोधून ॥
चा.क्र. ३) काळाच्या जबड्यांतून, काढला ओढून, त्यांस राजानं, आणि
त्याच्या भावी पत्नीनें खास, पतिव्रता धन्य वधू समयांस,
आणिली सौभाग्य जगतींस ॥ ८ ॥

॥ भाग ६ वा ॥

चा.क्र. ७ अंक - ९) पूज्य स्वर्गीय खासेराव महाराज असतां विलायतेच्या मार्गावर ।
वाटेंतच गेली खबर तयांना तो मार्सेलीस बंदरावर ॥
मोहिनी रूप विष्णू या संग होत्या पहा बाईसाहेब महाराज ।
त्यांच्या हातीं एक खलिता पडला दाटून आले उर सहज ॥
परी धीराची खरी बाई ती करी मनांमधीं विचार ।
गोष्ट आताच जर सादर केली अशीच पित्याच्या समोर ॥
एकुलत्या एक वीर पुत्राची दुःखद वार्ता ऐकून थोर ।
होईल सारा अनर्थ येथेंच उसळेल दुःखाचा सागर ॥
चा.क्र. १७) युवराज्ञी त्या वेळची, आजची थोर महाराणी ॥
ऐकता शिकारीची वार्ता। मूर्छागत पडली धरणीं ॥
परी निष्ठा, अढळ निर्धार, श्री जगदंबेच्या चरणीं ॥
॥ म्हणे माझा निढळ ॥ हे अखंड सौभाग्य ॥ मम पती दावी सुरख ॥
जिंकील हो काळ काळास, हा माझा पूर्ण विश्वास ॥
चा.क्र. ४ (जारट) जेंवा काळ सारे माइला, बाळ आपला विजय पावला, ऐकूनी
आज्ञा शब्दाला, अमृत वाहती नयनाला, मग म्हणे धन्य आजी
झाले मी त्रिभुवनाला ॥

॥ कॅप्टन मिळसाहेब महाराज पवार ॥

चा. क्र. पाळणा १४)

मम कष्टाचे सार्थक केले बाळा । आज तूं या अखिल भुवनीं ॥
अति आनंदे सर्व दिवस मम गेले । पहा तुझिया गर्भी पासुनी ॥
यशवंत तुझें नांव मीच ठेवियलें । यशवंत खरा जाणोनी ॥
॥ मज उत्तमसें डोहाळे ॥ गंभीरपणीं बघ झाले ॥ तव शिरीं छत्र पाहियलें ॥
मज नच चिंता बाळा तुजविण कांहीं । यशवंत सदा तूं होई ॥ १ ॥

चा. क्र. २)

ऐका तिकडे इंग्लंड नगरींत । पोंचतो जाऊन श्रीमंत ॥
कन्येनें कळवळी वार्ता । युनोनें त्यांना अत्यंत ॥
अंदाज तियेचा चुकला । झाला विकल पिता शोकांत ॥
तोही वीर पुत्राच्या हाता । यशवंताच्या हो यशवंत ॥

चा. क्र. दांगटी ८)

याचा ऐका सत्य दाखला, इंग्लंड नगरीला, खासेरावाला, भेटले सहावे जॉर्ज त्याच वेळा, युवराजांचा गौरव त्यांनीं केला, असा कोण वो सांगा झाला, वाचासी जो मल्लविद्येचा लढला, ऐकून श्रीमंत बोलतो त्याजला, कैक वीर आहेत भारताला, छत्रपती शाहू कोल्हापुरला, अस्वलाशीं कुस्ती खेळणेवाला, विक्रमसिंह पवार मोठ्या पातीला, घेऊनिया हातीं फक्त भाला, घोड्यावरनं डुक्कर मारणेवाला, सोंडूर युवराज पुरार बोला, सर्वांच्या पेक्षां ताण ठरला, दहाव्या वर्षीच वाघ मारला, संताजीराव कापशीं जहागिरीला, सेनापती घोरपडे म्हणती त्याला, जमिनीवरनंच सामना करणेवाला, एका पट्टांत सात जनावरांला, वाघ, वाघीण अन बचड्याजला, पठ्यानं असमान दाखवला, पटाईत सिंहाशीं लढण्याला, तयार हाय दादा ॥

चा. क्र. १)

मोठमोठे युरोपियन, गेले टरकून, धाडून वाघीण, उडत असतांना अंतराळांत, संताजीनीं मारली एका बारांत, शिकारी खरा त्यांस म्हणतात ॥ ५ ॥

---

॥ भाग ७ वा ॥

चा. क्र. १)

महाराज राव यशवंत, दैवत कुळवंत, खरेंच श्रीमंत, जाहले योग्य राज्य करण्यास, समाधान झाले खासेरावांस, तयार झाले निजधामा जाण्यास ॥
एकोणिसशें भेचाळीसाला, डिसेंबराला, दोन तारखेला, संपवुनीं सदाशील अवतार, आनंदवन भुवनीं जाहले स्वार, सिंहासनीं यशवंत आले साचार ॥ (७५) :-

॥ कॅप्टन भाऊसाहेब महाराज पवार ॥

चा. क्रं. २) पूर्व अवतार घ्यानीं घेऊन । झाले आरूढ राज्य तत्कास ॥
साम, दाम, दावुनी दंड । सुखवितील ते भक्तांस ॥
पूर्वीचे बिघडलेले कार्य । सुधारतील यावत्कालास ॥
गादीवर आल्या वरतीं । दाविली चमत्कार सकलांस ॥

चा. क्रं. ३) तो करीतो तयाची कथा ऐका ती कान ॥
तोंडपुंजे एक आले कांहीं सांगण्याकारण ॥
परी राजास आठवले बालपणाचे धोरण ॥
तोंडपुंजास देऊं नये स्थान हे पितृवचन ॥
काय सवाल तयांसी केला ऐका राजानं ॥
ह्या दोन दयाघन कृपाळू भगवंतानं ॥

चा. क्रं. लगट ४) दिले आहेत मजला कान, तसेची नेत्र हे दोन, येण्याची तसदी कां घेतली विनाकारण ॥

चा. क्रं. दांगटी ८) आणिक एक गोष्ट ध्यावी ध्यानांस, सांगतो तुम्हां सत्यभाविकास, एका पोराने पोरीची खास, वेड काढले लावलं तां समयांस, म्हणुनिया शिक्षा दिधली तयांस, तंव कांहीं शिष्ट करून विचारांस, आले शिष्टाई करावयास, ऐकुनिया त्यांच्या सर्व विचारास, राजानं सवाल केला पहा त्यांस, दिलेली ही शिक्षा योग्यच त्यांस, ध्यानीं घ्या दादा ॥

"आणि मी सांगतो तें नीट ऐका! मी राजा आहे. आणि माझ्या राज्यातील सर्व स्त्रियांच्या अब्रूचें संरक्षण करणें, तसेंच प्रजेचे पालन करणें हें माझें आद्य कर्तव्य आहे."

चा. क्रं. ९) धन्य यशवंतराव महाराजे, कॅप्टन साजे, कीर्ती बहु गाजे, धर्मरक्षणा घेतला अवतार, तुम्हाला प्रणाम वारंवार, शाहीराचा मुजरा घ्यावा सरकार ॥

प्रार्थना प्रभूपदीं खास, घावें दीर्घायुष्य, राजकुटुंबास, मागणें नसे दुजें चरणांस, शाहीर दीक्षित दरबार देवास, त्यापरिस सौख्य द्या राज्यांस ॥ ७ ॥ समाप्त

शाहीर रघुवीर दीक्षित चिंचणीकर
१२।१२।८१ जयगांधी भवन सदाशिव पुणे ३०

जन्म दि. १८।८।४४ ॥ आदरसमर्पण ॥ (मु. इगलेबंधू इंगळे ब्रदर्स
॥ श्रीमंत होळकर इंदोर ॥
दिवसा १।५५ जन्मी तरी. —— पाळणा —— उद्यानांत इंदोर

कवी:- ग. द. दीक्षित चिंचणीकर दवास सिनीयर व सांडूर या शाहीर (सांगली)

(चा. श्री. १५ पाळण्याची) जो जो रे जोजो बाळा, सगुण वल्हाळा, राजकुमारा, होळकर वंशउद्धारा ॥

घे निद्रा आतां छान, गाऊं दे गान, पाळणा तुजला, राष्ट्राच्या उद्धाराला ॥

कां जसे झोंप नयनांसी, असा कां हससी, सांग रे बाळा, तुज आनंद कसला झाला ॥

गडगडाट हा तोफांचा, आणि लोकांचा, आवाज घरभर, कां निद्रा पळली तव दूर ॥

चाल-) ॥ ऐकतो ही रणगर्जना ॥ कुणि ऐशा सुकुमारांना ॥ वाटली भीती ती यांना ॥

चाल-) तो बाळ मेहरली सारी, तूंच परोपरी, हससी तूं बाळा, या समयीं कां मनबाळा ॥ १॥

इंग्रज जर्मनी यांचे, महायुद्ध साचें, चाले रंगांत, म्हणुनी कां झोंप नयनांत ॥

ती जसे तुझ्या रे बाळ, हससी साजेल, साहूनी भीती, कां हर्ष पुन्हा हो चित्तीं ॥

आजोळची तुझ्या तीरांना, हिंदवीरांना, घेऊनी साथा, पळविती शत्रूला राया ॥

चाल-) ॥ जरी इंग्रज चिंताग्रस्त ॥ हिंदी प्रजा जाहली त्रस्त ॥ परी करी तयांते परास्त ॥

चाल:- नको चिंता कसली तुजला, अशा उमरीला, शांतता चित्त, जन निद्रा घेई प्रशांत ॥ २॥

ज्या कुळीं राव मल्हार, यशवंत होळकर, झाले नृपश्रेष्ठ, त्या कुळींच तूं वरिष्ठ ॥

आजोबा तव दानशूर, तुकोजीराव थोर, करती ख्याती, या साऱ्या पृथ्वीवरती ॥

तव पिता राव यशवंत, सदा यशवंत, धीम कुलवंत, नवविचारी ही धीमंत ॥

चाल-) ॥ लौकीक आपुल्या घराण्याचा ॥ राखिती खरोखर साचा ॥ मग कष्टी कां हृदयाचा ॥

चाल-) करतात प्रजा पालन, दुष्टदमन, हिंदभूमीचे, कल्याण गोरगरिबांचे ॥ ३॥

स्वातंत्र्य प्राप्त करण्याची, संधी येसाची, हिंद युवकांना, कां येशी संदेश देण्या ॥

युद्धांत होईल या काय, भीती असहाय, वाटते तुजला, वद माझ्या वेड्या बाळा ॥

तो हिटलर झाला मस्त, मुसोलिनी सुस्त, टोजो दरोबस्त, परी गिरवूं तयांची मस्त ॥

चाल-) ॥ तव काका विक्रमसिंह वीर ॥ महाराज दवास सिनियर ॥ सेना सज्ज सहस्त्रो वीर ॥

चाल-) भारताच्या सेवेसाठीं, करून आटाआटी, झटे त्यासाठीं, नको त्याची तुजला भीती ॥ ४॥ ४॥

करण्यास मुक्त देवांना, रामप्रभूजाणा, जन्म माध्यान्ही, जधीं सूर्य तळपे तेजानीं ॥

तव जन्म त्याच समयासीं, हिंदभूमि दिवशीं, भोगिती उषाराजे, आधींच इथें विराजे ॥

चाल-) ॥ उषेमागून येत सूर्य ॥ सृष्टीचें अबाधित कार्य ॥ थांबेल काय अनिवार्य ॥

चाल-) तो उषा सूर्य तूं तोंच, भासरी साच, आज सकलांसी, लागु दे झोंप नयनासीं ॥ ५॥

स्वातंत्र्य प्रिय महात्मा, हिंदभू आत्मा, महात्मा गांधी, देशास्तव सोशी व्याधी ॥

जुनताच जाहला मुक्त, खरा पंडीत, जवाहरलाल, तो हिंद-भूमीचा लाल ॥

पिचतसे अजूनी तुरुंगात, म्हणुन कां चित्त, खिन्न तव झाले, म्हणुनी कां दुःख जाहले ॥

चाल-) ॥ थांबले कां बरें हसणें ॥ हें असे बरें कां रुसणें ॥ सरकारशीं असहकार करणें ? ॥

चाल-) वाटते त्यांनीं का योग्य, आमुचे भाग्य, खरें ना ? हसला, तो खुण पटली हृदयाला ॥ ६॥

॥ पाळणा ॥

(चा. क्र. ९५ पाळण्याची) हिंदूधर्म आणिक जात, कारस्थान समर्थ, स्टेट अतोनात, सावरकर बंधू ख्यात ॥
तव पिता आणि आजोबा, सौभाग्य महाजना, आहेत थोर, ते भाग्य अखील भूवर ॥
या हिंदी जन संख्येत, भर घालीत, सिद्ध ते आले, तव जन्माने या वेळे ॥
चाल- ) ॥ तंत्यांचे कीर्ति वैभव ॥ मिळेल का जाहीं सद्भाव ॥ का उठे हृदयीं तव भाव ॥
चाल- ) नको चिंता काहीं करावी, निरर्थक असली, योग्य समयाला, होईल भाग्य तुझ बाळा ॥ ७॥
तव आजी सौभाग्यवती (महा)राणी चंद्रावती, नसती या स्थानीं, म्हणुनी का रुसते कोणी ॥
का प्रिय पित्याचे खास, बंधू परी खास, देवास सीनियर, महाराज विक्रमसिंह पवार ॥
तव जन्माचे शुभ दिवशीं, आहेत इंदुरासी, म्हणुनी का रुसला, पळ बाळ धरी त्यांजला ॥
चाल- ) ॥ एक पाय देवास नगरीत ॥ तर दुसरा रणक्षेत्रात ॥ परी चित्त इंदोर नगरीत ॥
चाल- ) अशी त्यांची सदोदीत रीत, दीस आज रात, ध्येय ध्यानांत, आणि आप सुखे जिवात ॥ ८॥
तुज ग्रांत जीव बायांचा, म्हणुनिया देवी, शर्मिष्ठा आजी, इंदिरा मांजी ही राजीं ॥
तव माय आणि भगिनी, उषाराजे गुणी, धरुनिया दोरी, देतात झोका परोपरी ॥
राज्य इंदूर तव पाळणा, तुला खेळण्या, नर्मदा तीर, पसरले कितीदूरवर ॥
चाल- ) ॥ या आत शारदाराजे१ ॥ इकडे या सीताराजे२ ॥ त्या तिकडे सुमित्राराजे३ ॥ (सुशीला४)
चाल- ) शिरीं वरद हस्त अहिल्येचा, सती देवीचा, आप सुखकारी, लागुंदे आतां निर्धारी ॥ ९॥
श्रीमल्हारी मार्तंड, आयुष्य उदंड, देऊं दे तुजला, प्रार्थना प्रभू चरणाला ॥
वडिलांचे कीर्ति वैभव, चमकूं दे जीवे, सर्व जगताला, हो आस आम्हा सकलाला ॥
नको चिंता वाटूं आतां, मुली ललतां, लाडक्या बाळा, डोळ्यांला लागो डोळा ॥
चाल- ) ॥ तूं सुपुत्र होळकरांचे ॥ तूं दैवत इंदूर राज्याचे ॥ करी ध्यान खंडेरायाचे ॥
चाल- ) सेवेसी तुझ्या आजी थोर, दीक्षित शाहीर, राहिला जाण, खास तव पितृआज्ञेने ॥ १०॥
(चाल क्र. ९७) ती नगरी हर्षली सारी, इंदूर प्रजा ती नटली ॥
वैभवें आजच्या समयीं, स्वागतास तुझिया आली ॥
या साऱ्या इंदूर राज्यांत, हर्षाची लाट वर उठली ॥
चाल- ) ॥ दीक्षित शाहीर दरबार ॥ देवास आणि सोंडूर ॥ आश्रित देवास ज्युनियर ॥
चाल- ) जी नगरी आवडे देवांस, म्हणूनीच तिथें दे, वास ॥ — ॥ ११॥

शुभेच्छा दि. [illegible], पुणे

॥ श्री सद्गुरु [illegible] स्वामी महाराज की जय ॥

सोंडूर राज्याचे युवराज श्रीमंत मुरारराव घोरपडे यांचे वाढदिवसाप्रसंगी

॥ आशिर्वाद ॥

चा.श्रा.) आजवरीं किती काव्यें केलीं सोंडूर महाराया, युवराजा आशिर्वाद द्याया,
परी उपमा द्यावी तुम्हांला काय आजच्या शुभ समया ॥ १ ॥
शंकर तुम्ही कार्तिकस्वामी बाळ म्हणूं जर, युवराज आपण राव मुरार,
एकस्मशानीं एका जंगलीं तूं राज्य हाकणार ॥ २ ॥
पुत्रची तुमचा भावी काळाचा सम्राट रणधीर, उपमा ही ऋणच बरोबर,
काय द्यावी उपमा राजसा सांगा खरोखर ॥ ३ ॥
राम लक्ष्मण भरत शत्रुघ्न पुत्र तयाचार, तुम्ही दशरथ म्हणूं तर ॥
त्याच रामाच्या वनवासांती पृथ्वीभूमीवर ॥ ४ ॥
चालश्रा.) वाली सुग्रीव [illegible] संगत, वीर हनुमंत, नांदसी सतत,
राजसा हांकीसी राज्य ॥ ५ ॥
ही उपमाही नाहीं सार्थ, घ्यावें ध्यानांत, सांगतो सत्य,
राजसा [illegible] यांत ॥ ६ ॥
चाल श्रा) इंद्रदेव तूं बाळ जयंत असें म्हटलें तर, त्यालाही जिंकणारा वीर,
निर्माण झाला इंद्रजीत तो पराक्रमी फार ॥ ७ ॥
तुम्हां जिंकणारा कोणी नसो या महीभूमीवर, उपमा हाही न बरोबर,
कामा, जिंकणारा कार्तिक स्वामी दैवत तव थोर ॥ ८ ॥
चंद्रगुप्त तूं अशोक युवराज असें म्हटलें जर, अशोक गुप्ताचा जातूं थोर,
पुत्र नव्हे म्हणून ही उपमाही नाहीं बरोबर ॥ ९ ॥
चितोडगडचा सिंह लक्ष्मण अजयसिंह बाळ म्हणे जर जाणून हाकाळ,
विजय भीम [illegible] पाहूं दाविली त्याला त्या वेळ ॥ १० ॥
चा.श्रा.) तूं शहाजी बाळ शिवाजी, म्हणेन जकोजी, असशी तूं गाजी,
राजा अभिमन्यु ॥ ११ ॥
राजे शहाजी नव्हते अभिमानी, म्हणुनि याव्यर्थ, उपमा हीखचित,
आणा ध्यानांत ॥ १२ ॥
तूं राजा श्रेष्ठ दुष्यंत, बाल तो भरत, उपमाही सार्थ,
नाहते जरी यथार्थ ॥ १३ ॥
चाल श्रा.) तरी काळी दासाची योग्यता ज्यासे माझ्याठायीं, ही पण उपमा
योग्य नाहीं, शाळो मी हतबुद्ध राजसा वर्णूं कसें कांहीं ॥ १४ ॥

॥ श्रीमंत युवराज मुरारराव घोरपडे ॥

चा. श्री. ) परी सूर्याला दीपज्योतीजें जसें ओवाळावें, तसें मी तुझ्यामुखें गावें,
तुझें वातूळ आणि कतूळ सुयश चिंतावें ॥ १५ ॥
पुन्हा पुन्हा तेच तेच शब्द आणि तुझेंच रे तुजला, अर्पण करितो मी
आजला, व्हावे दीर्घायू पुत्र पौत्रांसह आस हीच मजला ॥ १६ ॥
क्रांती शाहीर जरी जनीं मी तुमच्या राजनिष्ठ, सेवक स्वराज्य
भाट, वळ आली क्रांतीची सावध होई आता धीट ॥ १७ ॥
यापेक्षां मी काय वदावें सोंडूर महाराजा, मुरारराव युवराजा,
शाहीर दीक्षित मुजरा करी तुम्हां आर्पित जनकाजा ॥ १८ ॥

॥ समाप्त ॥

बुधवार दि. ७।१२-१९८३. मुक्काम द्वारा आर, जी, देशपांडे
१२।१२४१ जयगांधी भवन सदाशिव पेठ पुणें ३०
लेखक:- क्रांती शाहीर रघुवीर दीक्षित चिंचणीकर
अध्यक्ष:- श्री संत शाहीर मंडळ चिंचणी (सांगली)